# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ | अकोला, रविवार ता० २ माहे जून सन १८७८ इसवी. | अंक २२


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केले जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळींचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामेडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## वैद्यप्रकाश.

वैद्यप्रकाश नावाचा नवीन ग्रंथ तयार होऊन आह्माकडे विक्रीस आला आहे. सर्व ग्रंथांत वैद्यक संबंधी सर्व विषय घेतले आहेतच. परंतु सर्प, कुत्रें, उंदीर, विंचू, रोग्यांच्या निदानावर तर फारच उत्तम योजना झाली आहे. ग्रंथाचे भाग तीन केले आहेत. यांतील तात्पर्य लोकांच्या ध्यानांत येण्याकरितां प्रत्येक प्रकरणाचा सारांश येणेंप्रमाणें:–

प्रकरण १. — यांत स्त्रियांच्या जाती व लक्षणें, ऋतुकाल, व नियम गर्भाचीं लक्षणें, व तो गर्भ पोटांत असतां, स्त्री, किंवा पुरुष, अगर नपुंसक ओळखण्याचा प्रकार, गर्भिणीचे नियम, प्रसूतकाळ, पुरुषाच्या प्रकृति, दूतपरीक्षा, वैद्यास शकुन, स्वप्नाचें फळ, वैद्य लक्षण, अष्टविध परीक्षा, असाध्य लक्षण, औषधी आणावयास, करण्यास, रोग्यास देण्यास, व त्यास स्नान करण्यास मुहूर्त, ज्योतिषअभिप्राय, देशकाल लक्षण, दोष प्रकोप कारण. औषधी युक्तायुक्त विचार, व आणावयाचा प्रकार व देण्याचा काल, औषधी प्रतिनिधी सर्व रसांचे गुण, औषधादिकांचें मान, दिनचर्या, आकारीचा व ढाळाचा विधी, सर्व रोग वर्णानुक्रमानें अ पासून ज्ञ पर्यंत, रोगांची उत्पत्ति, त्यांवर औषधी व पथ्य, अपथ्य.

प्रकरण २.— धातूपधातु, रसोपरस, विषोपविषें, व रत्नोपरत्नें, इत्यादिकांची शुद्धी व मारण, भस्में करण्यास पुटें द्यावयाचा प्रकार, [ यंत्रे ] यांत मुशी यंत्रे व त्यांच्या आकृति व पुटें देण्याचा प्रकार, रसायनें, मात्रा, वर्णानुक्रमानें, तसेंच पाक, अवलेह गुटिका, चूर्णें, गुग्गुळ घृतें, तैलें, अनुपान प्रकरण, धातुपुष्टीचीं औषधें, अजीर्ण मंजिरी, पोतविधि, अर्कप्रकाश, कर्मविपाक, इ. वर्णानुक्रमानें.

प्रकरण ३. — यांत सर्व वनस्पतींचे गुणदोष वर्णानुक्रमानें सांगितले आहेत. ह्या एकाच ग्रंथाचें संग्रहानें अनेक ग्रंथांचें श्रय येणार आहे. याची किंमत २०८ दोन रुपये आठ आणे व टपाल हशीलाबद्दल ०२०६ एकूण २०१००६ आह्माकडे पाठविले असतां पुस्तक तावडतोब रवाना करण्यांत येईल. कळावें तारीख १९ मे सन १८७८ इसवी.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## नवीन बुकाची जाहिरात.

( प्रती फार थोड्या काढल्या आहेत घेणारांनीं जलदी करावी. )

### मुंबई हायकोर्टाच्या दिवाणी व फौजदारी सर्क्युलरांचें बूक.

ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति आह्मी तयार केली आहे. ह्यांत आजपर्यंत रद्द झालेलीं सरक्युलरें काढून नवीन आलेलीं सर्व जेथील तेथें घातलीं आहेत. ह्या शिवाय शेवटीं सन १८७७ चा अक्ट १० ह्यांतील कवथे परिशिष्टांतील सर्व नमुने दिले आहेत बूक तारीख १ जून पासून विकत मिळेल. किंमत सरकारी कामगारास फक्त सरकारी कामाकरितां घेणें असल्यास रुपये ३०११ व इतरांना रुपये ४०३ पुण्याबाहेरील लोकांनां टपालाचा व मेण कापडाचा खर्च ०६ पडेल. नाटपेडपत्र घेणार नाहीं. स्टांप पाठविल्या शिवाय उत्तर मिळणार नाहीं. किंमत वगैरे रोख आल्याशिवाय बूक रवाना होणार नाहीं. रुपयास अर्धा आणा बट्ट्याच्या शिवाय टिकिटें पाठवूं नयेत. लवकर मागणी केल्यास मुद्दाम बूक राखून ठेविलें जाईल. बुकाबद्दल सर्व व्यवहार रा. रा. भाऊ गोविंद सापकर ज्ञानचक्षु छापखान्याचे मालक यांजकडे ठेवावा. तारीख ७ मे सन १८७८ इसवी.

व्यंकटराव रामचंद्र वकील.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

राजे जैसे सैन्यहि तैसेच सुनीती ।
तेथें कैची तस्कर दुर्जन कृत भीती ॥
शास्ता जेथें दुष्ट जनाचें खुळ मोडी ।
तेथे व्यापारांतहि होये बहु जोडी ॥५८॥
ह्मणोनि वैश्य क्रयविक्रयामधीं ।
न होति उद्विग्न अधीरही कधीं ॥
त्यांचें स्वकर्माचरणींच चित्त तें ।
उत्साह योगें बहुलादरें रते ॥ ५९ ॥
देशोदेशीं वस्तु ज्या फार रम्य ।
स्वर्गींही ज्या मानवाला अगम्य ॥
त्यांचा तेथें नाहिं कांहींच तोटा ।
पेठांचा त्या यापरी थाट मोठा ॥६० ॥
आश्चर्या दे ती घडामोड मोठी ।
तोट्यालाभामाजि नाहींच कोटी ॥
या चिन्हें जो वैश्य लक्ष्मी न जाणे ।
त्याला आहे मूढवर्गांत जाणें ॥ ६१ ॥
लोढा टेंकुनि रम्य हर्म्य सदनीं
प्रौढाकृती बैसती ।
लोभाचा न विटाळ त्यांस ह्मणुनी
शोभा तयांची अती ।
सत्या ज्यांचि मती स्वजीव गणुनी
अत्यादरें न यती
ख्याती ज्यांचि चतुःसमुद्रजठरीं
न्हाती असे शेटजी ॥ ६२ ॥
आला पुर्जा ओपिले वीस लक्ष ।
गेली हुंडी घेतले तीस लक्ष ॥
आलें लाणें पाहिलें मी समक्ष ।
सांगे वारंवार हें लेखदक्ष ॥ ६३ ॥
वह्यातें कित्येक क्षण न
गमतां नित्य लिहिती ।
दुजे ते खात्यांच्या गढाति रु-
जुवातींत सुमती ॥
कुणी ताळा घेती निरखुनि
जमाखर्च शतशा ।
सचोटीनें कार्यें करुनि ज-
न ते पावति यशा ॥ ६४ ॥
घटामाजी तोडे चढवुनिच
कामाठि खचती ।
परीक्षा नाण्यांची सतत करुनी
कोणि सुकती ॥
उलाघालीला या क्षणहि न
विसांवा प्रतिदिनीं,
अतां त्यांला लक्ष्मी कशि वरद
हे ध्यालचि मनीं ॥ ६५ ॥
नाना द्वीपापासुनी जीं प्रयत्नें ।
जोहारी ते आणिती श्रेष्ठ रत्नें ॥
त्यांची कांती फांकतां सर्व सद्में
सूर्यद्योतें भासतीं जेवि पद्में ॥ ६६ ॥
ठायीं ठायीं मांडिती रत्नराशी,
येती मोठे पारखी त्यांजपाशी ॥
त्यांचे सौदे होति कोट्यावधीचे,
हा धंदा हें त्यांस देणें निधीचें ॥६७॥
कापूस लोंकर तशी मृदुततुसाल ।
रेशीम तेंचि चवर्थे बहुवस्त्रजाल ॥
यां पासुनीच उपजे ह्मणुनि प्रकार ।
वस्त्रांत च्यार गणिती नगिं शिल्पकार
॥ ६८ ॥
कलाबतूंचे बहुधा किनारे ।
छिंदु छड्या बूट अशा प्रकारें ।
संमिश्र होतां मृदु सूक्ष्म वस्त्रें ।
उल्हास देतीं समवर्ण चित्रें ॥ ६९ ॥
ऐशा अमूल्य वसनीं खचिलीं दुकानें ।
होताति विक्रय अणि क्रयही सुखानें
कीं तेथ सत्पर ते असती दलाल
जे लोटित गोप कुडक्या पगड्याहि लाल
॥ ७० ॥
साधे होशी पूरुषस्त्री जनांत ।
ज्याच्या जैसें वस्त्र येतें मनांत ॥
त्याला तैसे तत्क्षणीं देति पेठा ।
वाटे त्यांला कल्पशाखी न मोठा ७१
मोठ्या मैदान जागा प्रतिदिश असती
ज्यांत बाजार मोटा,।
दाटी तेथें जनांची सतत अशिच कीं
रीघ नाहींच तोटा ॥
धान्याचे ढीग शैलासदृश, खवळल्या
अब्धिचा घोष जैसा ।
तैसा तेथें जनाचा निनद खळखळे
नित्य सर्वत्र पैसा ॥ ७२ ॥
मापारी माप देतां परिगणनरवें
गुंगती दीर्घ, माल ।
पृष्ठीं वाहोनि कुब्जाकृति झुलतचि जे
चालती, ते हमाल ॥
हस्ती, मस्तीच त्यांचो अविरत झरतो
घर्म जो चालतांना ।
संमर्दीं स्वस्वकार्यीं कुलजन गणिती
न स्वमानापमाना ॥ ७३ ॥
( पुढें चालू. )

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळीस आपले एखा अंकीं जागा द्याल अशी आशा आहे.

### मानसिक दुःख दुर्निवार्य !

मनुष्यव्यतिरिक्त इतर प्राणीमात्रास मानसिक दुःखानें जितकी बाधा होण्याचा संभव आहे त्यापेक्षां मनुष्यास पुष्कळपट अधिक आहे कारण याला मानसिक शक्तीचा पुरवठा इतरापेक्षां अधिक आहे इतकेंच नाहीं तर मनुष्याचे जीवितास, सुखानुभवास, इहपरत्र कीर्ति मिळविण्यास व शेवट मरणास सुद्धां शारीर व्याधीपेक्षां मानसिक व्याधीच पुष्कळ कारणीभूत होत असावी असें वाटतें.

हल्लीं पाहूं जातां शारीर व्याधीचे निवारण करण्यास समर्थ होण्यासारखे बरेच ग्रंथ झाले आहेत, त्यांचा अभ्यास

करून व अनेक प्रकारें अनुभव घेऊन वैद्य डाक्टर तयार आहेत पण मानसिक व्याधींचें निवारण करणारे लोकांची दिवसें दिवस दुर्मिळता होऊं लागली आहे. व तेणेंकरून अलिकडे या व्याधीचा अधिक प्रसार होऊं लागला आहे.

मानसिक व्याधी जी उत्पन्न व्हावयाची ती ईश्वरदत्त मनोवृत्तीचा भंग अथवा तिला अडथळा झाल्यावाचून सहसा उत्पन्न होत नसेल हें उघड आहे. व तसे प्रकार अलीकडे पुष्कळ घडून येऊं लागले आहेत. यदाकदाचित् कांहीं लोक असे ही सापडतील कीं, त्यांचे मनाचे करवतून दोन तुकडे जरी केले तरी त्यांच्या शरीराच्या सुयंत्रयगतींत काडीमात्र फरक न होतां पशूप्रमाणें त्यांचीं शरीरें निर्धास्त चालतील परंतु कांहीकांचे शरीरास मनोव्याधीपासून असे जबरदस्त धक्के बसतात कीं तेणेंकरून त्यांचे अमोल्य देहसुद्धां बळी जातात. म्हणून शरीरापेक्षांही मनाला धक्का बसणार नाहीं याविषयीं अधिक जपलें पाहिजे व याच कारणास्तव बाल्पदशेंत मुलाचे लळे पुरवावे, हट्ट करीत असल्यास खाऊ वगैरे देऊन त्याची समजूत घालावी, व त्याची मनोवृत्ती प्रसन्न राखावी अशी प्रवृत्ती पडली असावी. नाहींपेक्षां अज्ञान मुलाच्या हट्टासाठीं तऱ्हतऱ्हेनें निरर्थक खर्च करण्याची कांहीं गरज नाहीं; तर त्याचें मूळ एकादि मनोव्याधी उत्पन्न होऊं नये इतकेंच असावें.

अलीकडे हें मान लोकांतून निःशेष झाल्यासारखें झालें आहे. बाप मुलाचे हट्टाची परवा न करितां एक थोबाडांत देऊन समजूत करितो, व राजा प्रजेच्या दाद मागण्यास कांगाळ्या समजून जें करणें तें आपले मनाप्रमाणें करितो. आतां हें उघड आहे कीं जसें बापानें मुलाचे लळे न पुरविल्यामुळें बापाचें कांहीं हलके भाग होत नाहीं तद्वत प्रजेचेंही राजापुढें कांहीं एक चालत नाहीं. पण बालत्वापासून आपल्या पित्याविषयीं नाखुषी उत्पन्न होऊन कायमची मनोव्याधि जडते व तेणेंकरून प्रजा निर्बळ होते, पोटचेंच पोर असून वैर बाळगतें व वेळ प्रसंगीं ज्याचा उपयोग घडणार तेंच अनुपकारासही प्रवृत्त होणार व प्रजाधन नाहींसें होतें म्हणून व शरीरापेक्षां मनच सर्व कार्यांत प्रमुख आहे म्हणून त्याचें संरक्षण आधीं केलें पाहिजे. संभावित व बुधजन आहेत ते शरीरव्याधि बिलकूल मनांत न आणतां मानसिक दुःखानेंच विव्हळ होतात आपल्या तसेंच इतरांच्या मनास निरर्थक इजा देऊं नये. इतकेंच नाहीं तर साधेल तोंवर सर्वांच्या मनोवृत्ती सुप्रसन्न राखल्या पाहिजेत. तेणेंकरून आपल्यासच काय पण सर्व जगास असंख्य फायदे होण्याचा संभव आहे. पत्रविस्तारभयास्तव आतां पुरें करितों. कळावें. तारीख २९ माहे मे सन १८७८ इसवी.

आपला दास रामात्मज.

---

नोटिस.

बिठोबा बल्लद हरी इंगळे रहाणार मौजे मेर परगणे मेहेकर तालुके चिखली जिल्हा बुलडाना यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुमच्याशीं माझें लग्न लागून सुमार १४ वर्षें झालीं या दिवसापासून मला तुम्ही नेऊन नांदवीत नाहीं माझे बापानें पंचमार्फत पुष्कळ वेळा म्हटलें तरी तुम्ही हो मात्र म्हणता परंतु तसें करीत नाहीं व फारकत ही देत नाहीं, त्यामुळें माझा जन्म व्यर्थ जात आहे. अज्ञानपणामध्यें तर माझे बापानें सांभाळ केला व पुढें त्याचे मार्फतीनें कर्ज करून निर्वाह केला पुढें त्याचे वृध्दापकाळामुळें त्यासही कोणी कर्ज देत नसल्यामुळें मी स्वतः दुसऱ्याचें कर्ज करून निर्वाह केला आतां कोणी मला कर्ज ही देत नाहीं व दुष्काळामुळें मोल मजुरीही मिळत नाहीं त्यामुळें व कर्ज झाल्यामुळें माझे फार हाल होतात ते लिहितां पुरेत नाहींत करितां या नोटिशीचे खर्चासुद्धां दहा वर्षांचा आकार च्यार रुपये महिन्याप्रमाणें ४८० च्यारसें ऐंशीं रुपये व शिवाय व्याज दोन रुपयेप्रमाणें नोटिस पावल्यापासून वीस दिवसांत देऊन व नांदविण्याबद्दल तिऱ्हाईती देऊन माझे नांदविण्याची सोय करावी तसें न केल्यास माझेवर कोणतेही प्रकारें तुमचा हक्क चालणार नाहीं व मी दुसरा गंधर्वाचा नवरा करीन हें पक्कें समजावें याबद्दल तुमचें काय म्हणणें आहे तें कळवावें तारीख २९ माहे मे सन १८७८ इसवी.

(सही) रुखमी मर्द बिठोबा इंगळे रहाणार मौजे उमरण, प० मेहेकर ता. मजकूर इचेहातची निशाणी नांगर असे.

---

## पोष्टाकडील जाहिरात

पोस्ट आफिसाचे डिरेक्टर जनरल यांचें आफिस तारीख २१।३।१८७८ इ.

**नोंदलेलें पत्र किंवा पार्सल यांचा विमा उतराविणें असल्यास.**

पत्र अथवा पार्सल मजबुतीनें बंद करावें— जर पत्र असेल तर त्याचे वरील कव्हर (पिशवी) जोरदार असून त्या कव्हराच्या मध्यभागीं व चोहों कोपऱ्यांवर चालू नाण्याखेरीज दुसऱ्या कोणच्याही प्रकारच्या ठशाच्या स्वच्छ मोहोरा कराव्या — पार्सल असलें तर तें साध्या कापडांत, मेणकापडांत किंवा जस्ताच्या डब्यांत बंद करावें व कापडांत किंवा मेणकापडांत बंद केलें तर त्याच्या शिवणीवर तीन इंचाहून कमी अंतरावर सदर प्रमाणें मोहोरा कराव्या.

तिकिटें लावून हशील अगाऊ भरावें— (पत्र असल्यास नोंदलेल्या पत्राचें हाशील द्यावें— पार्सल असल्यास पार्सलाचे हाशील द्यावें) पत्याच्या जवळच वरच्या अंगास आंतील मालाची किंमत आंकड्यांनीं व अक्षरीं दाखल करावी. ती अशी "किंमत रुपये (२१७) दोनशें सत्रा.

नोंदलेलीं पत्रें घेण्याच्या नेमलेल्या वेळाच्या आंत पत्र अथवा पार्सल पोस्ट आफिसाच्या खिडकींत द्यावें व त्याजबरोबर आंतील मालाच्या जातीचा व किंमतीचा प्रतिज्ञालेख व खालीं लिहिलेल्या दराप्रमाणें विम्याची फी द्यावी—

विम्याची फी

| मालाची लिहून दिलेली किंमत | | | |
|---|---|---|---|
| १० रु. हून अधिक नसेल तेव्हां | | १ | आणा |
| २५ | ,, ,, | २ | आणे |
| ५० | ,, ,, | ४ | ,, |
| ७५ | ,, ,, | ६ | ,, |
| १०० | ,, ,, | ८ | ,, |
| व प्रत्येक ज्यास्त १०० रुपये किंवा शंभर रुपयांच्या भागास | | ८ | ,, |

पोस्ट आफिसांतील पावतींत विम्याची भरपाई दिली जाईल,

प्रतिज्ञालेखाचा नमुना.

आम्ही पाठविणार प्रतिज्ञापूर्वक असे लिहून देतों कीं, हें पत्र (किंवा पार्सल) मेजर जी. एच. प्रचांटली, १९ वी पलटण हुजार्स, मथुरा. या पत्यांचें ह्यांत जिनस आहेत ते येणेंप्रमाणें:—

| | | |
|---|---|---|
| सोन्याची आंगठी किंमत | | ११० |
| व नोट | ५० | |
| नं. ई/१२ ४६५६९ | | २० |
| | एकूण | १३० |

सही व तारीख.

नाणीं, दागिने इत्यादि मौल्यवान पदार्थ विमा उतरल्या खेरीज पत्रांतून किंवा पार्सलांतून पाठविण्याकरितां घेण्याची पोस्ट आफिसास कायदेनें मनाई आहे.

पार्सलांतील मालाची किंमत ज्याच्या नांवाचें पार्सल असेल त्याजपासून वसूल करून मालकास देण्यांत यावी असे असल्यास— पार्सल बंदोबस्तानें बंद करावें व त्यावर सदरीलु विमा उतरण्याच्या पार्सलावर मोहोरा कशा कराव्या हें लिहिलें आहे त्याप्रमाणें मोहोरा कराव्या मग तें नोंदलेल्या पत्रांच्या वेळा सांगितल्या आहेत त्यांत खालीं दिलेल्या तपशिलाच्या टांचणांसहित पोस्ट आफिसाच्या खिडकींत नेऊन द्यावें.

पाठविणाराचें नाव व पूर्ण पत्ता.

ज्याच्या नांवचें पार्सल असेल त्याचें नांव व पूर्ण पत्ता.

ज्याच्या नांवचें पार्सल असेल त्याजपासून वसूल करून घेण्याची मालाची किंमत, टपालांत दिल्याची तारीख.

पार्सलाचें हाशील अगाऊ किंवा मागून मर्जीस येईल त्याप्रमाणें द्यावें.

ज्याच्या नांवचें पार्सल असेल त्याजपासून वसूल होण्याची रकम व मालकास रकम कशी मिळेल ह्याबद्दलची अवश्य माहिती हीं पोस्ट आफिसांतून जी पावती मिळेल तींत दिलेलीं असतील.

नोंदलेलें पत्र किंवा पार्सल ज्याच्या नांवचें असेल त्याजकडून पोंहोंच मिळावी असें असल्यास— एक आण्याच्या किमतीचीं ज्यास्त तिकिटें नोंदलेल्या पत्रावर किंवा पार्सलावर लावावीं व नोंदलेलीं पत्रें देण्याच्या वेळांत तें पत्र किंवा पार्सल पोस्ट आफिसच्या खिडकींतून द्यावें व त्या बरोबर लेखी किंवा तोंडजबानी पाठविणाराचें नांव व पूर्ण पत्ता कळवावा — पोस्ट आफिसांतून मिळालेल्या पावतीवरून पोंहोंच येणें आहे असें समजेल.

पत्र वगैरे टपालांत टाकल्याचा दाखला पाहिजे असल्यास— पत्र वगैरे वर जो पत्ता लिहिलेला असेल त्याची नक्कल एका कागदाच्या तुकड्यावर किंवा वहींत करावी व तिजवर अर्ध्या आण्याचें टपालचें तिकिट लावावें, ज्या डाकेनें तें पत्र वगैरे जावयाचें असेल ती बंद होण्याच्या नेमलेल्या वेळाच्या निदान अर्धा तास पूर्वी तें पत्र वगैरे त्यावरील पत्याच्या नक्कले सहित पोस्ट आफिसाच्या खिडकींत आणून द्यावें. पत्र वगैरे टपालांत टाकल्याबद्दलच्या दाखल्याबद्दल पत्याच्या नकलेवर पोस्ट आफिस शिक्का मारून देईल ह्या दाखल्यावरून सदर्हू पत्र वगैरे टपालांतून जातांना कांहीं विशेष सुरक्षितपणा येईल असें नाहीं; हा दाखला पत्र वगैरे टपालांत टाकल्याबद्दलचा मात्र आहे. तसल्या पत्र वगैरेची व्यवस्था लखोट्याच्या पेटींत टाकलेल्या इतर पत्र वगैरे प्रमाणेंच होईल. ही कानु नोंदलेलीं पत्रें व पार्सलें ज्याबद्दल पावत्या देण्यांत येतात त्यांस लागू नाहीं.

---

# वऱ्हाडसमाचार

मिती जेष्ठ शुध्द १ शके १८००

---

## पैशाचा व अकलेचा उपयोग

मनुष्याला चांगली अक्कल असणें व जवळ विपुल पैसा असणें ही मोठी ईश्वरी कृपेची देणगी होय. पण तेवढ्या देणगीनेंच केवळ जगतांतील सर्व व्यवहार सुरळीत होत नाहींत. ईश्वरीकृपेनें त्या मिळालेल्या पैशाचा व अकलेचा उपयोग सर्व गोष्टींत विचारपूर्वक झाला पाहिजे. अविचारानें त्या दोन्ही उत्तम देणग्यांचा भलत्या प्रकारें उपयोग केला तर तीच ईश्वरीकृपा विकोपास जाऊन मनुष्याच्या सर्व पुरुषार्थाचें मातेरें व दुर्लौकीक होऊन जातो. याजकरितां कोणीही द्रव्यानें मदांध होऊन ती विफल करूं नये व शहाणपणानें फुगून निरुपयोगी होऊं नये. ईश्वरानें मनुष्यास जी पुष्कळ संपत्ता दिलेली असते ती केवळ त्याच्या स्वतःकरितांच नव्हे. मनुष्याला वेतावाताच्या अन्नाच्छादनाला फारसें द्रव्य लागतें असें नाहीं, व ईश्वरानें उत्पन्न केलेलीं आपलीं बहुत भावंडें दरिद्रीही आहेत तेव्हां सधन लोकांच्या पैशाचा त्यांच्या स्वतांला व इष्टमित्रांनां उपयोग होऊन दुनियेंतील अनाथा दुर्बळांसही उपयोग व्हावा व असें झालें तर सर्व लोक त्या धनवानास चाहतात व त्याचें बरेंच इच्छित त व तेणेंकरून सर्वांचा बाप परमेश्वर तोही त्या धनवानावर सदोदित आपल्या कृपेचें छत्र ठेवितो. शहाणपणाचीही गोष्ट अशीच आहे. शहाण्यानें

आपल्या शहाणपणाचा आपणास उत्तम उपयोग करून घेऊन अविद्वान, अक्षरशत्रू, व साधे भोळे असेही लोक या जगांत पुष्कळ आहेत, त्यांना सन्मार्गास लावण्यास, ज्ञानप्रकाशित करण्यास, व योग्य सल्ला मसलती देण्यास निरालस्य व निष्कपटपणें झटावें व तेणेंकरून साऱ्या जगताचें चांगलें व्हावें असा ईश्वरी संकेत दिसतो. व त्यास अनुसरून जे धनवान व ज्ञानवान वागतात ते धन्य होत व तशांची आपणास फार गरज आहे व ईश्वरकृपेनें तसे पुष्कळ निपजावे असें आह्मी सर्वकाळ इच्छितों.

सदरील प्रकार उत्तमतेचा झाला. व उत्तमता सर्वांस साधणे कठीण आहे; ह्मणून परोपयोगीं तितकें झटणें झालें नाहीं तर आपणास तरी त्या पैशाचे व अकलेचे योगानें विशेष सुख, निर्भयता, निष्कळंकता व योग्यता सर्वकाळ राहील व आपलें त्या योगानें कांहीं वाईट व्हावयाचें नाहीं एवढी सावधगिरी तरी सर्वकाळ ठेवावी, हा मध्यम प्रकार आहे व हा मनुष्य मात्रास अवश्यक आहे. यांत अलौकीकपणा जरी कांहीं नाहीं, तरी कलंक लागण्यासारखा कमीपणाही नाहीं. बाकी तिसरा प्रकार ह्मणजे द्रव्य बानानें व शहाण्यानें आपला पैसा व अक्कल पसरून त्यांच्या मोहांत इतरांनां गुंतवून आपले पाशांत आणावें व अन्यायानें त्यांचें सर्वस्व हरण करावें व आपली अपकीर्ति करून घेऊन सर्वांचे तोंडून छीः थू ह्मणवून घ्यावें हा प्रकार अत्यंत निंद्य होय. अशानें तो पैसेवाला व अकलवाला असतां ही सर्वकाल संकटांत व भयांत असतो व त्याचें जिणें सर्वांस केवळ भारभूत व पापरूप वाटतें सबब अशा मार्गाचें सहसा कोणी अवलंबन करूं नये व त्यांत परमेश्वर राजी नाहीं असें आह्मी निक्षून सांगतों.

साधु सत्पुरुष व्यवहारमार्गात आसक्त न होतां देशोदेश हिंडून लोकांस सन्मार्ग दाखवितात, विद्वान् लोक-ग्रंथ करून, व व्याख्यानें देऊन लोकांचे उपयोगी पडतात, उदार द्रव्यवान लोक लक्षावधि-रुपये विद्यालयाकडे, व धर्मादायाकडे लावितात, देवालयें शाळा, व विहिरी बांधितात हा त्यांना मिळालेल्या ईश्वरी देणगीचा सदुपयोग आहे. व ते गृहस्थ पहिल्या कोटींतील आहेत. इतर लोक बेताबातानें व अब्रूनें वागून आपले शहाणपणाचा व द्रव्याचा आपणास उपयोग करून घेतात व कोणाचे अध्यामध्यांत शिरत नाहींत. ते मध्यम ह्मणजे द्वितीय कोटींतील होत. व द्रव्यवान व शहाणे असून गैरअब्रूदार व हटेल असतात ते कनिष्ठ ह्मणजे तिसरे कोटींतील होत.

कालच्या उर्दूअखबार वर्तमानपत्रांत आह्मी वाचिलें कीं, मुर्तिजापुरचे रा. रा. वामनराव गोविंद जमादार यांस मारामारीचे खटल्यांत येथील तहशिलदाराकडून १९ दिवसांचे कैदेची चूक शिक्षा झाली व त्याचे बंधु तिर्थरूप रा. रा. गोविंदराव जमादार यांस १०० रुपये दंडाची शिक्षा झाली. हें ऐकून आह्मास फार वाईट वाटलें. हे जमादार लक्षाधीश आहेत व उत्तम शहाणे आहेत, पण यांच्या कर्तबगारीनें अनेक प्रकारचीं खटलीं यावर वारंवार उत्पन्न होतात.

या सात आठ महिन्यांत तीन फौजदारी मुकदमे यांवर झाले, असें ऐकण्यांत आलें आहे. व या पूर्वींही अनेक लंच्चांडें यांवर आलेलीं आहेत. हरप्रसंगीं वादाचा विषय पांच पन्नास रुपयांचा असला तरी त्यांत यांच्या तर्फे बारिस्टर व नामांकित वकील येऊन कित्येक हजार रुपये यांचे खर्च झाल्याशिवाय रहात नाहींत. उर्दूअखबार कर्ते आमच्या प्रिय बंधूनीं लिहिलें आहे कीं, केवळ वकिलांचे व बारिस्टरांचे खर्चा करितां आज पावेतों यांचे तीस चाळीस हजार रुपये खर्च झाले असावेत. हें खरें असेल काय? अरेरे! काय हा पैशाचा उपयोग! व काय ही लक्षाधीशाची अब्रू! तीन पिढ्यांचे नामांकित जमादार व शेंपन्नास लोक ज्यांच्या पदरीं नोकर त्यांनीं कैदखान्यांत जेथें चोर, मांग, रामोशी, छिनाल व बिसनी लोक जड जड बेड्या पायांत बाळगून वास करितात तेथें त्यांच्या सोबतीस शिक्षा भोगण्याकारितां जावें यासारखें लाजिरवाणें या जगतांत दुसरें कोणतें आहे? सबब उर्दूअखबार कर्त्यांनीं त्यांस जो बोध केला आहे तो प्रांजलपणें त्यांनीं गृहण करावा व असे प्रसंग येण्याचे टाळावे असें आमचेंही मत आहे. आजपर्यंत त्यांनां भांडणांत यश येत होतें व दंडावरच जात होतें पण आतां कैदपर्यंत व बहुधा मरणापर्यंत मजल आली तेव्हां त्यांची सद्दी फिरली असें ह्मणणें भाग होतें. सबब त्यांनीं ईश्वरेच्छा ओळखावी व तदनुरूप वर्तन ठेवावें व या लिहिण्याचा राग मानूं नये असें आह्मी त्यांस विनंतीपूर्वक कळवितों. नामांकित घराणीं मुळांत थोडीं आहेत सबब आहेत तितक्यांनीं आपला नामांकितपणा कायम राखणें पैशाच्या व त्याच्या स्वताच्याही भूषणाकारितां त्यांस अवश्य आहे असें आह्मी समजतों व तसें त्यांनीं ही समजावें असें इच्छितों.

## वऱ्हाड.

आह्मास लिहिण्यास अतिशय वाईट वाटतें कीं उमरावतीस अव्वाची असून आफिशियेटिंग असिस्टंट कमिशनर झालेले खानबहादुर नवाब शाबुद्दीन साहेब कालच्या शनिवारच्या मागील शनिवारीं ह्मणजे मेच्या २५ वे तारखेस संध्याकाळीं तापाचे आजारानें मरण पावले. हे गृहस्थ अर्काटच्या नवाब साहेबांच्या घराण्यांतील होते. सन १८७३ सालीं हे इकडे आले व आल्या दिवसापासून उमरावतीसच हे कामावर होते. अव्वाची असतां हे काम चांगलें करूं लागले असें पाहून वरिष्ठांनीं यांस आफिशियेटिंग असिस्टंट कमिशनर केलें होतें. हे अगदी तरुण असून स्वभावानें फार चांगले होते. व ईश्वरानें त्यांस जगविलें असतें तर कालेंकरून चांगले उदयास आले असते. यांच्या मरणानें उमरावतींच्या बहुत लोकांस फार दुःख झालें, त्यांस एक मुलगा आहे.

आतां ही आफिशियेटिंग असिस्टंट कमिशनरची जागा कमिशनर साहेब कोणास देतात तें पहावें. रा. रा. भीमरावजी व मे. एदलजी बाहिमनजी हे उभयतां अव्वाची या जागेस उमेदवार असून हुशार व लायख आहेत. पण आमचे ऐकण्यांत असेंही आहे कीं हैदराबादेस एक अव्वाची आहेत त्यांचे नांव यांच्या वर आहे सबब त्यांसच ही जागा मिळण्याचा अधिक संभव आहे.

---

आमचे प्रिय बंधु इलिचपुरचे, वऱ्हाडमित्रकर्ते यांनीं, चवथ्या क्रमिक पुस्तकाच्या अन्वयार्थाचें नवीन पुस्तकावर आलेल्या दोन चार पत्रांस आह्मी स्थल न दिल्याबद्दल मागें जें लिहिलें आहे त्याजबद्दल, असें ह्मटलें आहे कीं जर आह्मास तो विषय घ्यावयाचा नव्हता तर तशा मतलबाचें थोडे दिवसांपूर्वीं एक पत्र आह्मी कां छापिलें? खरेंच तसें एक पत्र आमच्या एका अंकांत आलें आहे. पण तें आमच्या संमतीनें आलें नाहीं व आह्मी कांहीं दुःख प्रसंगानें ५।६ महिने बाहेरगांवीं दूर गेलों होतों त्या अवकाशांत हंगामी एडिटरकडून त्यास स्थल मिळालें आहे हें आह्मी आपल्या प्रिय बंधूस कळवितों. बाकीचे त्यांचे विचार आह्मांस अगदी मिळून आहेत याबद्दल आह्मी संतोष मानितों.

---

नगरच्या नाटकगृहाच्या आगीनें गेल्या आठवड्यापावेतों एकंदर ६२ मनुष्यें मरण पावलीं व ४१ अजून भाजल्यानें आजारी आहेत. मे महिन्याच्या सुटींत वऱ्हाडांतून इकडील कित्येक मास्तर तिकडे गेलेले असल्यामुळें मोठी काळजी होती व शेवटास त्या पैकीं रा. रा. मार्तंड रंगनाथ जळगांव तालुक्यांत जामोद एथें असलेले मास्तर त्या दंडाक्यांत सांपडून मरण पावले असें वर्तमान आलें आहे त्याबद्दल आह्मांस दुःख वाटतें. व बाकी सर्व सुरक्षित आहेत याबद्दल संतोष वाटतो.

---

उमरावतीचे डिपुटी इजुकेशनल इन्स्पेक्टर रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण शास्त्री बापट गेले रविवारीं एथें आले होते व ते आज परत जाणार.

---

खामगावच्या रजिस्टर कारकुनावर एक फौजदारी मुकदमा एक रुपया लांच मागितल्याबद्दल झाला होता पण ते दोषानिर्मुक्त होऊन सुटले. त्यांत साक्षीकरितां खामगावचे तहशिलदार रा. रा. भास्कर महेश्वर लेले एक दिवस एथें आले होते.

---

ट्रेनिंग कालेजाचे प्रिन्सीपाल रा. रा. निळकंठराव नारायण भट सुटीमध्यें पुण्यास गेले होते ते परवाचे दिवशीं एथें आले व कालपासून त्यांचें कालेज सुरू झालें.

---

आह्मास लिहिण्यास संतोष वाटतो कीं अकोल्यास काटनप्रेस (कापुस दाबण्याचें यंत्र) होण्याची सिदता झाली. नेळारीची युरोपियन व्यापारी कंपनी सभापती यांचे तर्फेनें एक गृहस्थ एथें आले होते. त्यांनीं या कामाकरितां मठांतील रामदास बुवा यांचें जें शेत स्टेशनाजवळ नैर्ऋत्य भागास आहे व ज्यांत विहिरही आहे तें ५०० रुपयांस खरेदी घेतलें. आतां कारखाना लवकर येईल. व तेणेंकरून एथील व्यापारास बरीच तेजी येईल.

---

देऊळगावराजा एथून आह्मांस एक पत्र आलें आहे त्यांत एप्रिल महिन्यांच्या १९ व्या तारखेस तेथें शाळेतील मुलांस व मुलींस बक्षिसें वाटण्याचा समारंभ झाल्याची तपशिलवार हकीकत लिहिली आहे. तीवरून समजतें कीं त्या प्रसंगीं तेथें निबंध वाचले व संभाषणें झालीं. व मुलामुलींनीं कविता ह्मटल्या बक्षिसानंतर संस्थानचे वहिवाटदार रा. रा. दाजी नारायण करंदीकर यांनीं मिठाई वाटली. देऊळगावास आमचे चाणाक्ष व हुशार मास्तर रा. रा. नारायण प्रभाकर परांजपे हे आहेत व त्यांनीं इतर ठिकाणाप्रमाणें आपल्या कर्तबगारीनें तेथीलही शाळा चांगली सुधारली आहे असें कळतें व तेणेंकरून आह्मांस फार संतोष वाटतो.

---

अकोल्यास पाण्याचें दुर्भिक्ष्य अतिशय झालें आहे व पाऊस पडण्यापूर्वीं कित्येक लोक पाण्यावांचून जीवितास मुकतील यांत संशय नाहीं असें प्रसिद्ध झालेलें भयंकर वर्तमान खरें आहे कीं काय याविषयीं आह्मी शोध केला तेव्हां समजलें, कीं सालाबादपेक्षां पाणी कमी झालें आहे खरें व तें कांहीं भागास लांबून आणावें लागतें परंतु जीवितसंशयाची भीति बाळगण्यासारखी त्याची स्थिति मुळींच नाहीं. मे. दस्तुर बाहिमनजी साहेब प्रत्यहीं सर्व पाण्याच्या जागा पाहून कधीं कधीं पाणी मोजवितात त्यावरून आह्मास समजलें आहे कीं दक्षिणेस गोसाव्याचे विहिरीस भरगर्दीत पाणी ६ फूट, तहशिली जवळील विहिरीस पाणी ९ फूट, लकडगंजाजवळील विहिरीस ७ फूट व अकलकोट बाजूकडील व पुलाखालील विहिरीस पांच पांच फूट पाणी भरगर्दीत ह्मणजे सकाळच्या ८ वाजतां असतें. योरल्या धरणांतून पाणी घेण्यास मोकळीक आहे व कांहीं लोक तेथूनही पाणी आणितात. आतां इतकें खरें आहे कीं श्रम अधिक आहेत पण दुर्भिक्ष्य नाहीं. व अशाच आशयाचा तहशीलदाराकडून म्युनिसिप्यालिटीस रिपोर्ट झाला आहे कीं पाण्याच्या तजविजीकरितां ९२ रुपये खर्च झाले हे पुरे आहेत व पाणी बरसात लागेपर्यंत पुरेसें आहे आतां नवीन कांहीं तजवीज करण्याची जरुर नाहीं.

## वर्तमानसार.

सर लुईस पेली यांनीं विलायतेस आणखी सहा महिन्यांची रजा घेतली.

खिलात पावेतों तारायंत्र नव्हतें तें गेले महिन्याचे १९ वे तारखेपासून सुरू झालें.

सुरतेच्या दंग्याच्या प्रसंगीं तेथील पारशी लोक व मुसलमान लोक नेकीनें वागले याबद्दल मुंबईचे गवरनर साहेबांनीं संतोष प्रदर्शित केला आहे.

इंग्लिश लोकांची सर्व प्रकारचीं तारवें एकंदर ६०० आहेत, व युद्ध प्रसंगीं तीं सर्व उपयोगीं पडण्यासारखीं आहेत. ज्या तारवांच्या बाजूच्या व खालच्या लोखंडी पत्र्याची जाडी साडेचार फुटी आहे अशी ३६ तारवें आहेत; या पेक्षां जाड्या पत्र्याची पंधरा आहेत. दुसऱ्या तऱ्हेचीं असलीं तारवें ५ आहेत. या एकंदर ५६ तारवांवर ८०० मोठमोठाल्या तोफा आहेत. या पेक्षांही मोठमोठालीं लढाऊ तारवें तयार होत आहेत. लहान बोटी व तारवें हीं वरील संख्येंत धरलेलीं नाहींत. सदरील तारवांवर लढणार ६० ०० लोक असल्याचें कळतें.

मुंबई व कलकत्ता या शहराप्रमाणें लंडन शहरांत रस्त्यावरील दिवे धुराचेच होते. हल्लीं असें कळतें कीं, त्या शहरीं धुराच्या ऐवजीं उजेडाकरितां गल्ल्यांतून विद्युल्लतेचा उपयोग करणार. व ही नवी तऱ्हा सिद्धीस जावी म्हणून लंडन एथें बरीच खटपट चालू असल्याचें कळतें.

पंजाबांत एका मनुष्यास त्यानें आपली बायको मारल्याबद्दल काळे पाण्याची शिक्षा मिळाली. त्यावर अपराध्यानें अपील केलें आहे. अपीलांत फाशीची शिक्षा व्हावी असें अपिलन्टानें मागणें मागितलें आहे.

ब्रह्मदेशचे राजे बुध गयेस एक मोठें देवालय व धर्मशाळा बांधित आहेत देवळाची उंची १५० फुटी असून एकंदर खर्च, ४,००,००० रु० होणार म्हणून कळतें.

आसामापैकीं, लक्ष्मीपुर नांवाचे प्रांतांत दरवर्षास तेथील लोक नदींतील वाळू धुवून सुमारें दहा शेर सोनें पैदा करतात.

रसायनादि शास्त्रांचा आमच्या इकडेस चांगला प्रसार व्हावा म्हणून महानंदलाल सरकार यांनीं महत प्रयास करून कलकत्यास एक सभा स्थापन केली आहे, व त्या सभेचा खर्च चालावा म्हणून बराच मोठा फंड जमा केला आहे. दर आठवड्यांत या सभेंत शास्त्रीय विषयाचे संबंधानें व्याख्यानें होत असतात. व्याख्यानें देण्यास ज्या यंत्रांचें साहित्य लागतें तीं सभेनें एकदम विकत घेऊन टाकावीं म्हणून बाबू काली कृष्ण ठाकूर यानीं त्या सभेस २५,००० रु. दिले. शिवाय दरसाल वर्गणी बद्दल सभेस ३०० रुपये देण्याचें कबूल केलें आहे.

एक लांब दोरी घेऊन तिच्या दोन शेवटांस दोन नळकांडीं लावून त्या पैकीं एकांत कांहीं शब्दाचे उच्चार केले असतां ते शब्द दोरीचे दुसरे शेवटाशीं जो मनुष्य असतो त्यास ऐकूं येतात. या यंत्रास इंग्रजींत टेलिफोन म्हणतात. तारायंत्राचें हें छोटें भावंड सबब यास सूत्रयंत्र म्हटल्यास चालेल. या सूत्रयंत्राचा दोन हजार फुटापासून ३ कोस पावेतों उपयोग होतो असा अनुभव आहे. एका फ्रेंचानें अनुभवार्थ २१ मैल पर्यंत हें यंत्र लाविलें होतें परंतु इतक्या लांब ऐकूं जात नाहीं असें सिद्ध झालें.

एका पत्रांत लिहिलें आहे कीं, युनैटेड स्टेट्स मध्यें मोठमोठ्या शहरांत व्यापाऱ्यांच्या हपिसांतून या सूत्रयंत्राचा फार उपयोग करतात. खालचे मजल्यापासून अखेरचे मजल्यापर्यंत या यंत्राचा उपयोग केला असल्यामुळें कांहीं निरोप अथवा मजकूर खालचे मनुष्यास वरील मनुष्यास कळविणें असल्यास चिठी अथवा दुसरा मनुष्य पाठवावा लागत नाहीं. श्रीमंत लोकांचीं एकाच गावांत दोन घरें असल्यास या यंत्राचा त्यांत सहज उपयोग करतां येईल.

## छापण्याची कला.

छापण्याची कला ही प्रथम चीन देशांत सुमारें सन १००० मध्यें सुरू झाली. पुढें इंग्लंडांतून कांहीं मिशनरी सुमारें सन १२०० त चिनांत गेले होते तेव्हां त्यांनीं तिकडून ती कला आणली; आणि पुढें ती सन १४७५ त इंग्लंडांत सुरू झाली. त्यांत दिवसानुदिवस फारच सुधारणा होऊन ती कला पूर्ण दशेस आली आहे. सन १४८३ मध्यें लंडनांत छापण्याचे ४ कारखाने होते पुढें ते वाढत जाऊन हल्लीं लंडनांत सुमारें ४९३ छापखाने सुरू आहेत. ही कला सुमारें सन १७९३ मध्यें हिंदुस्थानांत सुरू झाली. ह्या कले पासून अनेक ग्रंथ व वर्तमानपत्रें वगैरे स्वल्प आयासानें व स्वल्प किंमतींत सर्वांस मिळून दिवसानुदिवस ज्ञानवृद्धी व सुधारणा होत आहे, छिटें वगैरे कापडावर जे छाप असतात ते व फोटोग्राफ वगैरेनें चित्रें व तसबिरा काढतात वगैरे सर्व प्रकार हे छापण्याचे कलेचेच भाग आहेत. त्या पैकीं रंगीत पासोडे व पासोड्या व लहानमोठे दुलयाचे फर्दे व छिटें वगैरे ह्या देशांत मालेगांव, नारायणगांव व इंदूर वगैरे ठिकाणीं तयार होत आहेत. ह्या छापण्याचे कलेपासून आपलें नुकसान झालें आहे असें कांहीं लोकांचें म्हणणें आहे परंतु ती त्यांची चूक आहे. वेदार्थयत्न वगैरे ग्रंथ तयार झाले आहेत त्यां पासून वेदावरील व धर्मावरील पूज्यपणा कमी झाला असून त्याचें महत्व कमी झालें आहे असाही कांहीं लोकांचा समज झाला आहे, परंतु तो त्यांचा समज अगदीं चुकीचा आहे; कारण वेदार्थयत्न वगैरे ग्रंथांपासून त्यांचें महत्व कमी झालें नसून उलटें त्यांचें महत्व वाढलें आहे व धर्मावरील पूज्यपणा कमी झाला नसून उलटा वाढत आहे. वेदार्थयत्न वगैरे ग्रंथ विषयीं जसा कांहीं लोकांचा समज झाला आहे त्याप्रमाणें पूर्वीं बायबला विषयीं इंग्लंडांतही पुष्कळ लोकांचा समज होता. तेव्हां बायबलचीं पुस्तकें फारच थोडीं होतीं, व तीं पुस्तकें पोप वगैरे पवित्र मानलेलेच लोकांचे जवळ असत व तीं त्यांनीच वाचावीं इतरांनीं तीं वाचूं नये व बाळगूंही नये. याचें उलट कोणी वर्तन केलें असतां त्यास राजाकडून शिक्षा मिळत असे; त्याप्रमाणें बायबलाचे संबंधानें हजारो लोकांनीं प्राणांचा नाश झाला आहे. त्यावेळेस बायबलाचे पुस्तकास श्रीमंत असल्यास त्यास २५०० रुपये किंमत पडत असे व इतरांस निदान तीनशें रुपये किंमत द्यावी लागत असे. पुढें तिकडे ज्ञानी व सुविचारी लोकांचे उद्योगानें बायबलाचीं हजारो पुस्तकें छापलीं जाऊन त्याचा फायदा सर्वत्रांस स्वल्प आयासानें व स्वल्प किंमतींत मिळूं लागला व हल्लीं तर बायबलाचीं पुस्तकें व त्याचीं भाषांतरें फारच थोडे किंमतींत म्हणजे दीड आणा किंमतींत पाहिजे त्यास मिळत आहेत. छापण्याचे कलेची सुधारणा इतकी उत्तम झाली आहे कीं, आंधळे लोकांस आपले हाताचे योगानें माहिती करून घेऊन पुस्तकें वगैरे वाचतां यावीं याकरितां कांहीं पुस्तकें छापलीं आहेत. त्यांतील अक्षरें कागदाचे वर कांहीं उंच आलेलीं असतात (कागदासुद्धां) असें एक पुस्तक लखनौ येथील प्रदर्शनांत आहे व तें आम्हीं समक्ष पाहिलें आहे.

ने. गो

## अंत:करणशुद्धि.

मनुष्यप्राणी जन्मास आल्यापासून कांहीं कालपर्यंत निष्पाप व निर्विकल्प स्थितींत असतो ही गोष्ट अनुभवसिद्ध आहे. लहान बालकास भूक लागेल तेव्हां अन्न व तहान लागेल तेव्हां पाणी मिळालें आणि शरीरास कांहीं इजा न झाली म्हणजे तें मोठ्या आनंदांत असतें. तें जसें पापरहित असतें तसेंच अज्ञानही असतें. आपण मोठेपणीं ज्ञान संपादन करितों तेव्हां त्याच्या बरोबर पाप संपादन न करितां बाल्यावस्थेंत होतों त्याप्रमाणेंच निष्पाप रहाण्याचा मनःपूर्वक यत्न केला पाहिजे.

कांहीं कालानंतर मुलांस पापपुण्याचा विधिनिषेध वाटावयास लागतो आणि याच संधीला विचारी मातापितरें मुलां हांकडून अन्याय झाला असतां त्यांस थोडीबहुत शिक्षा करावयास लागतात. तरी या स्थितीमध्यें देखील वेळच्यावेळीं खावयाप्यावयाला मिळाल्यामुळें मुलांचें चित्त सद्धर्माकडे बहुतकरून चांगलेंसें लागत नाहीं. मातापितरांचा जो धर्म तोच खरा मुक्तिमार्ग आहे असें त्यांस वाटतें.

पण जेव्हां आईबापें हें जग सोडून जातात किंवा दुसऱ्या कोणत्याही कारणानें त्यांचा आश्रय सुटतो आणि प्रपंचाचा सर्व भार त्यांच्यावरच पडतो तेव्हां त्यांचे डोळे उघडतात. तेव्हां आपलें शरीर, अन्न व मालमत्ता यांचें संरक्षण करण्यास अनेक संकटें सोसावीं लागतात व केव्हां केव्हां तीं दुःसह असतात असें मनुष्याच्या अनुभवास येतें. या संसारांत शारीरिक व मानसिक दुःखें अनंत आहेत. अनेक कारणांनीं मनुष्यास मरण येतें त्यांतून आपणास केव्हां मरण येईल हें निश्चयानें सांगवत नाहीं व तें समजलें तरी त्यापुढें आपला कांहीं इलाज चालत नाहीं. मनुष्य सर्वथैव परतंत्र आहे. पाप पुण्य करणें न करणें हें मात्र आपल्या स्वाधीन आहे. सृष्टीच्या नियमांशीं कितीही विनवणी केली तरी कल्याण किंवा अकल्याण त्यांस करणें तें तें डोळे मिटून करतील; कारण त्यांचे अतिक्रमण निराळेंच आहे. आपले शत्रू, आपण त्यांचे शत्रू नसलों तरी आपला नाश करण्याचें सोडणार नाहींत. आपल्या मित्रांतून कांहीं जण आपल्या सुखदुःखाविषयीं उदासीन असतील. जे अंतःकरणापासून आपल्यावर प्रीति करितात यांची इच्छा आपलें दुःख निवारण करण्याची असली तरी त्यांस सामर्थ्य नसतें. सारांश, प्रसंगीं आपणास कोणीच उपयोगी पडत नाहीं असें मनुष्याच्या अनुभवास येतें, व आपणास कोणाचें तरी सहाय्य पाहिजे असें वाटतें. हें सहाय्य मिळावें अशी आपल्या अंतःकरणाची इच्छा आहे त्या अर्थीं प्रयत्न केला असतां तें मिळेल असें मनास वाटतें,

हें सहाय्य मिळण्यास खरोखरच दूर आहे कीं काय म्हणून जेव्हां मनुष्य पहावयास लागतो तेव्हां अंतर सृष्टि व बाह्य सृष्टि यांचा तो विचार करूं लागतो. ह्या विश्वांतील प्रत्येक भाग प्रत्येक दुसऱ्या भागाशीं संबंधित आहे असें अनुमान होतें. आपण आपणास उत्पन्न केलें नाहीं व आपण परतंत्र आहों असें वाटतें. हें सर्व विश्व अनंत सामर्थ्य, बुद्धि व पवित्रता यांचा परिणाम आहे. मनुष्य कार्यावरून अनुमान करून ज्याप्रमाणें काल व स्थळ अनंत आहे त्या प्रमाणेंच या जगताचें आदिकारण परब्रह्म गुणसंपन्न व अनंत आहे असा सिद्धांत करितो. इतकेही विचार आले तरी अंतःकरणाची शांति होत नाहीं. या विश्वाचें आदिकारण परब्रह्म जरी असेल तरी आपला आणि परब्रह्माचा संबंध काय अशी आकांक्षा उत्पन्न होते. ज्या अर्थीं तें विश्वजननी माउली असें आहे त्या अर्थीं तें आपलीही आई आहे हें सिद्ध. हा केवळ मनाचा विचार झाला, परंतु ही गोष्ट अंतःकरणावर बिंबून आईवर जी प्रीति करावयाची ती प्रीति ईश्वराच्या ठिकाणीं केली पाहिजे. हा जो खरा मातृभाव किंवा ईश्वरभक्ति हीं प्रयत्नावांचून साध्य होत नाहींत. नियमशः ध्यान व उपासना केल्यानें खरे विचार मनांत येऊं लागतात व विश्वजननीच्या ठायीं श्रद्धा उत्पन्न होते. अशी उपासना करण्याचा परिपाठ घातला म्हणजे आपण व्यवहारामध्यें इतर जनाशीं कसे वागतों याचा विचार होतो. ईश्वराच्या ठिकाणीं आपला मातृभाव असला पाहिजे तेव्हां अर्थात इतर लोकांच्या ठायीं आपला भ्रातृभाव व स्त्रियांच्याठायीं स्वसृभाव असला पाहिजे हें उघडच आहे. ही गोष्ट संपादन करण्याकरितां रोज उपासनेच्या वेळीं आपलीं रोजचीं कृत्यें तपासून ईश्वरेच्छेच्या कसोटीस लावावीं लागतात व कामक्रोधादिक मनोवृत्तीप्रमाणें चालून ईश्वराज्ञेचा अतिक्रम न करितां त्यांच्यावर अधिकार ठेवावा लागतो. या प्रमाणें मनांतील अज्ञान व कुविचार काढून टाकिल्यानें अंतःकरणाची शुद्धि होते आणि अशा प्रकारें स्वच्छ केलेल्या अंतःकरणसंपुटांत निराकार ईश्वराची आराधना केल्यानें प्रापंचिक दुःखापासून मुक्त होण्याकरितां जे साह्य पाहिजे होतें तें मिळतें व दिवसानुदिवस ईश्वराच्या ठायीं मातृभाव व जनाच्याठायीं भ्रातृभाव यांची वृद्धि होऊन जीवात्म्याची उन्नति होते.

सु. प.

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ — अकोला, रविवार ता० ९ माहे जून सन १८७८ इसवी. — अंक २३

**वऱ्हाडसमाचाराची किंमत**

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळींपुढें दर ओळीस | ०।०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

ठायीं ठायीं न्यहाळी टपत कपट तो
इंगितें कोतवाल, ।
नानारूपें शिपायी फिरत असति जे
दुर्जनांचेच काळ ॥
कोणी वेडे भिकारी कुणि कुणि बसती
ध्यान होतां दम्यानें, ।
त्यांतें पाहोनि ये तो मनि नरपतिचा
शाकिचा खड्ग ज्यानें ॥७४॥

त्यांमाजी तो लुब्ध नाहीं धनाला ।
वेशासाठीं जो उदक्षी गुन्ह्याला ॥
ऐशा योगें नाहिं कोणी सशंक ।
उल्लासानें पाहती मौज लोक ॥ ७५ ॥

डोंबारी जो निकट करुनी
ढालगे फार ताडी ।
वेव्वर्ग्री तों चपल उडतो
चेंडुसी सोनचेडी ॥
कोठें नंदी वृषभ सजुनी
स्वामिचे रीण फेडी ।
कोठें बाघ प्रचुर दरवे-
शांस देतात जोडी ॥ ७६ ॥

तमासबीन ते तिथें जमूनि
भोगिती सुखें ।
तमासगीर पाहतांचि हर्ष
पूर्ण त्यामुखें ॥
हतांत ताट घेउनी तयांस
याचिती धना ।
उदार तेहि त्यांचिया करीत
पूर्ण कामना ॥ ७७ ॥

शृंगें वक्र विशाल ज्यांचि सजिलीं
जीं शृंखलें शोभतां ।
माथा वज्र कठोर लोचन जणु
क्रोधाग्निची ज्वाळ ती ॥
पार्श्वीं थापटितां उगाहानि वळे जे
ओढ घेती अती, ।
वेगें आवरितांहि ऊर्ध्व चरणीं
आकाश उल्लंखिती ॥ ७८ ॥

रानीं मत्त वराह तेहि बहुधा
ज्यांच्या पुढें रोडके ।
ऐसे दुर्मद त्या स्थळीं धडकती
अन्योन्य ते एडके ॥
कोठें उध्दत कोंबडे, पदयुगीं
ज्यांच्या सुऱ्या बांधिल्या,
आवेशें झडपोनि त्यांनिं रिपुला
वा वाहवा साधिल्या ॥ ७९ ॥

आर्या.

कोठें दासीजन-।
द्वंद्वें न भितां परा कलह करिती॥
कोठें तरुणीतरुण-।
द्वंद्वें मचकत परास कुजबुजती ॥ ८० ॥

श्लोक.

असो चमत्कार परोपरीचे ।
ते सांगतां येइल क्षीण वाचे ॥
ह्मणोनि आतां तितकेंचि राहो ।
पुढील गाथा श्रवणीं करा हो ॥८१॥

तेथें वाणिज्य कोणी करि, इतर कृषी,
अन्य गोरक्षणातें ।
ऐसे वैश्य स्वकर्मीं मति दृढ धरुनी
पावती भूषणातें ॥
त्यांते पाहोनि शूद्रप्रभृतिजन सदा
न्याय मार्गींच राहे ।
पाप श्री आड नाहीं ह्मणुनि धननदी
त्यांकडे नित्य वाहे ॥ ८२ ॥

न कधीं भय लेश त्या जना ।
करितो मिष्ट सुगंधि भोजना ॥
अनुकूल अयास संपदा ।
तरि तो कां न विलासिच्या पदा ८३
बारद्वाया आरसांचे महाल, ।
यांनीं गेहें शोभतीं सर्वकाल ॥
ठायीं ठायीं उंच गच्चा दिवाण,
खानं, नाहीं इष्ट वस्तूस वाण ॥८४॥

सौधाग्रीं फेनशुभ्रें मृदुतर शयनें
असो पुष्पमाला, ।
स्वाभिप्राय नुकूला प्रथमरसपरा,
कामकांताहि ज्याला ॥
लाजे, ज्या रत्नभूष वृतसकलतनू
कामिनी पुण्यशीला,
त्यांच्या ते नित्य भोगें सुख अनुभविती
पार नाहीं तयाला ॥ ८५ ॥

( पुढें चालू. )

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. प्रमोदसिंधु अंक ४७ वर्ष ६ ता. ३ दिसेंबर सन १८७६ यांत नेरपिंगळाई येथील "एक ग्रामस्थ" ह्या सहीचें एक पत्र प्रसिद्ध झालेलें पाहून मला फार अचंबा वाटला त्यांत तेथील हल्लींचे मास्तर यांविषयीं फार तारीफ लिहिली आहे व माजी मास्तर यांची निंदा केली आहे. बहुतकरून जगाची रीतच आहे कीं, एकाची स्तुति करावी आणि दुसऱ्याची निंदा करावी. परंतु असें करणारे लोक सुज्ञ व दीर्घविचारी असतील त्यांनीं खऱ्याकरितांच केल्यास हरकत नाहीं. एकाद्याची स्तुति करावी परंतु निंदा करणें झाल्यास त्यांनीं चांगला विचार केला पाहिजे; परंतु "एक ग्रामस्थ" तसा विचारी असावा असें याचे लिहिण्याचे झोकावरून दिसत नाहीं. कितीएकांचा असा स्वभाव असतो कीं, दुसऱ्याचीं छिद्रें आणि दोष जितक्या प्रयत्नानें समजतील तितके करून तीं समजून घ्यावीं आणि मग तीं बाहेर काढावीं; ह्मणजे त्यांस मोठा लाभ झाल्याप्रमाणें होतें. सुज्ञ जे आहेत ते दोषाचा त्याग करून गुण घेतात. सर्वगुणपरिपूर्ण एक ईश्वरावांचून दुसरा कोणीं नाहीं. मनुष्यांत कांहींना कांहीं उणें असावयाचेंच, तसा "ग्रामस्थानें" निंदा किंवा स्तुति करण्यांत कांहींच विचार केला नाहीं. आतां ज्याची स्तुति केली आहे त्यानें वास्तविक कामें कशीं केलीं आहेत याविषयीं दोन ओळी आपल्यास लिहितों. हे गृहस्थ पूर्वीं एका खेड्याचे शाळेवर मास्तर होते, त्या वेळेस त्यांनीं एका मे महिन्याच्या सुटी नंतर जूनच्या पहिल्या तारखेस सायंकाळीं कामावर येऊन रुजू झाले असून रिपोर्ट असा केला कीं," वक्तशीर कामावर येऊन हजर झालों." त्या दिवसाची दोन वेळाची हाजिरी भरून ठेविली. लबाडी कितीही युक्तीनें केली तरी ती बाहेर पडल्याशिवाय रहात नाहीं. तशांत आमचे धूर्त वरिष्ठांपुढें तर कधींच पचावयाची नाहीं. शेवटीं ही उघडीस आली

नेरपिंगळाईचे माजी मास्तर तेथें सुमारें ५।६ वर्षे होते. त्या वेळेस त्यांचें काम ४ वर्षे बरें चाललें अशाबद्दल तेथील व्हिजिटर बुकांत दाखले आहेत. मुलें ५०।६० असून त्या वेळेस इंग्रजी शिकविण्याचा हुकूम असून कांहीं मुलांचे इंग्रजी तीन पुस्तकापर्यंत शिकणें झालें होतें. त्या गांवांत गांवठी शाळा एक होती त्या दोन झाल्या. त्या पंतोजींनीं घरोघर जाऊन नानातऱ्हेनें त्या लोकांस सांगून मुलें आपल्या शाळेंत ओढून घेतलीं. तेणेंकरून अर्थात सरकारी शाळेंत मुलें कमी झालीं. ह्या गांवठी शाळा होण्याचें कारण असें कीं, गांवांतील लोकांची दुफळी हें आहे. बहुतकरून गांवोगांव असे प्रकार असतात त्यांत कितीही समानतेनें वागलें तरी कठीणच आहे. हल्लीं गावठी शाळा मोडल्या ह्मणून ऐकतों तेव्हां अर्थात सरकारी शाळेंत मुलें ज्यास्त आलीं. आतां या शाळा मोडल्या कां? याची युक्ती वेगळी आहे. तारीख २२ मे सन १८७८ इसवी.

आपला एक

( क्ष )

देऊळगांव राजा ता. २३।५।७८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. एथें तारीख १० गुदस्त पासून पटकीचा उपद्रव सुरू झाला आहे तो विशेष आहे असें नाहीं सुमारें आज तारखेपर्यंत पंचवीस मनुष्यें या रोगानें लागलीं होतीं पैकीं दहा मनुष्यें स्वर्गपंथास गेलीं. एथें नेटिव डाक्टर हाशमत आली आहेत त्यांचे हाताखालीं कंपौंडर हरी रामचंद्र हे असून ते या कामीं फार मेहेनत घेत असतात. आजारी मनुष्याकडे दिवसांतून दोन तीनवेळां जाऊन त्याची खबर घेऊन औषध देतात. कालरा पिल्स नेहेमीं जवळ बाळगितात. कंपौंडर यांच्या परिश्रमानें हा रोग या गांवांत फार वाढला नाहीं सबब या कामीं त्यांची तारीफ करणें व यांस बढती मिळणें योग्य आहे.

एक देऊळगावकर

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस—

वि. वि. खालीं लिहिलेल्या चार ओळी आपणाकडे पाठविल्या आहे त्यांस पेंड्या अंकीं स्थळ मिळेल अशी आशा आहे.

### भूतपिशाच.

या संबंधानें सन १८७५ इसवीचे जानेवारी महिन्याचे निबंध मालेंत "लोकभ्रम" या सदराखालीं मालाकारानीं चांगलें विवेचन केलें आहे. व हा केवळ लोकांचा भ्रम आहे असें त्यांनीं निबंधांत सिद्ध केलें आहे. आतां पूर्ण विचार करून पाहूं जातां लोकांचा भ्रम अमुक गोष्टींत नाहीं असें तरी सिद्ध करणें मोठेंच अवघड पडेल कारण आपण ज्या शरीराच्या भरंवशावर मोठमोठ्या उलाढाली करितों व नऱ्या वाइटास व खऱ्या खोट्यास अनुसरून अनेक कुभांडें रचितों, पण तें शरीरच नाशिवंत आहे. जगताचा दृश्यभास सर्व मिथ्या असून क्षणभंगुर आहे व हा सर्व संसार केवळ स्वप्नवत् मानिला आहे. मग भूत पिशाच हा लोकभ्रम आहे यांत नवल तें कोणतें? कांहीं नाहीं. पण जसें क्षणभंगुर संसारांत कांहीं आस्तिक्य मानून सर्व प्राणीमात्र आपापल्या व्यवहारास मोठें झटून अनुसरतात व आपण करतों हें खरें असें कांहीं तरी प्रतिपादितात व त्या सारखा कसातरी त्यांतून हाशिलार्थही निघतो. तद्वत् भूतपिशाच हा जरी केवळ लोकभ्रम आहे व लोक जशा कल्पना त्या संबंधानें करतात तसें सर्वोपरी नाहीं तरी त्यांत कांहीं तरी ( निराळ्या प्रकारचें कां होईना ) इंगित असल्यावांचून वाऱ्याचे भारे बांधले गेले असावेत असें वाटतें. भूत पिशाचाची बाधा अथवा तत्संबंधी भावना नेहमी होत असतात मग त्या खरोखरच मेलेल्या मनुष्यानें आत्म्यापासून असोत अथवा इतर एकाद्या श्वासकवायूच्या संचारानें असोत, पण शरीरास कोठें कांहीं इजा नसतां मन भ्रमिष्ट होणें अद्वातद्वा भाषणें करणें व क्वचित अचाट कृत्यासही प्रवृत्त

अशीं उदाहरणें वारंवार पहाण्यात येतात.

कोणतीही गोष्ट खरी किंवा खोटी ठरविणें असल्यास ज्या परिणामावरून ती लोकप्रसिद्ध असते त्या परिणामाचें निराकरण आधीं करावें लागतें. जसें पृथ्वी अचळ नाहीं व सूर्य फिरत नाहीं हें सिद्ध करते वेळीं लोक प्रश्न करतात कीं, सूर्य जर फिरत नाहीं तर सकाळीं पूर्वेकडे निघून सायंकाळीं पश्चिमेस कां जातो? तर पृथ्वी आपल्या आसाभोंवतीं फिरती ह्मणून "पृथ्वी जर फिरती तर लोक तिजवरून कां पडत नाहींत?" 'तर तिंचे अंगीं आकर्षणशक्ती आहे ह्मणून. व तेंही" दुसऱ्या प्रकारानें सिद्ध करणें इत्यादि. यास अनुसरून ह्या ज्या प्रत्यक्षभूत पिशाच्याच्या बाधा पुष्कळांस होऊन लोक हाल भोगितात व त्या कारणाचा जेव्हां मोठमोठ्या नामांकितही औषधी वैद्यकी जाणणाऱ्या वैद्यांस थांग लागत नाहीं तेव्हां लोक ह्या तऱ्हा वेड्यावाकड्या कल्पना करून निर्वाह करितात ह्मणून सर्वहू लोकभ्रमाच्या या निबंधांत याविषयीं चांगला खुलासा झाला असता तर अति उत्तम झालें असतें. बाकीं, यांतील प्रतिपादन यथायोग्य आहे.

कळंब ता. ४ जून १८७८ इस्वी.

आपला दास ( रामात्मज )

वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ शुद्ध ९ शके १८००

## प्रदर्शनें.

ही प्रदर्शनाची टूम इंग्लिश सरकारचें राज्य झाल्यापासून अलीकडे आपले पाहण्यांत येऊं लागली आहे. ही सुधारणेस अत्यंत उपयोगी आहे. प्रदर्शन ह्मणजे देखावा. देशोदेशच्या उत्तम कारागिरीचे व स्वभावसिद्ध उत्पन्न होणारे जिन्नस मिळवून ते एके ठिकाणीं सर्वांस पहाण्यासाठीं मांडावे याचें नाव प्रदर्शन. या योगानें कोठें काय आहे, कोणत्या देशांत कारागिरीचे कोणते पदार्थ होतात याविषयीं ज्ञान होतें व वेगवेगळ्या पदार्थांच्या तऱ्हा समजून घेऊन कारागीर लोकांस दुसऱ्या देशाचे पदार्थांसारखे पदार्थ करण्यास माहिती मिळते व हुरूप येते. येणेंकरून सर्व देशास मोठा लाभ होतो सबब अशीं प्रदर्शनें वारंवार होत जावीं हें इष्ट आहे.

विलायतेस आपल्या चक्रवर्तिनी साहेबांचे भ्रतार उत्तम लोकवासी प्रिन्स आलबर्ट साहेब यांनीं सन १८५१ सालीं एक मोठें टोलेजंग प्रदर्शन करविलें होतें त्या अलीकडे तसें भव्य प्रदर्शन कोठें झालें नव्हतें. ह्मणून फ्रान्स देशास तें करण्याची उत्सुकता प्राप्त झाली व त्यानें त्याप्रमाणें प्रदर्शनाची तयारी करून मे महिन्याच्या पहिल्या तारखेस पारीस शहरीं तें सुरू केलें. त्याची उत्तमता अवर्णनीय आहे. त्यांनीं प्रदर्शनगृह फार सुरेख व विशेष खर्चानें बांधिलें आहे. व पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांस विनंतीपत्रें पाठवून त्यांनीं पदार्थ मागविले व प्रदर्शन पहाण्यास बोलाविलें तेणेंकरून बहुतेक साऱ्या पृथ्वीवरील त्यांच्या दळणवळणाच्या भागांतील वस्तु त्या प्रदर्शनांत येऊन त्यांचा संग्रह झालेला आहे. प्रथम दिवशीं सुरवातीलाही आपले युवराज प्रिन्स आफ वेल्स, तसेच डेन्मार्क, इटाली, हालंड, आरेंज एथील राजपुत्र समारंभास आले होते. स्पेनच्या राणी साहेब आल्या होत्या व दुसरे बहुत लोक आले होते. त्या दिवशीं प्रदर्शनगृहाच्या आंगणामध्यें थोर थोर लोकांच्या खासगी गाड्या आल्या होत्या त्यांची संख्या १९०८८ होती. याशिवाय भाड्याच्या गाड्या, आगगाड्या, त्रामवे, व इतर वाहनें किती आलीं होतीं यांची गणती करवली नाहीं. लोकसमुदाय सुमार पांच लक्ष होता तरी काहींमात्र कोठें अव्यवस्था नाहीं व अपघात वगैरे कांहीं झालें नाहीं यावरून त्या देशीं केवढी ही लोकांची उत्सुकता व पहाण्याची हौस आणि पोलिसाचा बंदोबस्त आहे हें दिसून येतें.

फ्रान्स देशांत लोकसत्ताक राज्य आहे, ह्मणून तेथें प्रेसिडेन्ट मुख्य आहेत त्यांची स्वारी आली तेव्हां १०० तोफांची सलामी झाली. आरंभीं व्यापारसंबंधी प्रधान व मार्शल म्याकमोहन यांनीं भाषणें केलीं. व त्यांत फ्रान्स देश गल्हाट्यांत आलेला पुन्हा सुधारला व सुस्थितींत आला याबद्दल अभिमानात्मक संतोष दाखविला व सर्व राष्ट्रांनीं आपले निमंत्रणाचा आदर करून उत्तम सहाय केलें याबद्दल कृतज्ञता दर्शवून त्यांना आपले सर्व प्रकारचे बातबेत, व्यवस्था पसंत आहेत असें पाहून समाधान मानिलें व पुन्हा १०० तोफांची सरबत्ती करून प्रदर्शन उघडें केलें व सर्व यंत्रसमुदाय एक समयावच्छेदें चालू केला. त्या दिवशीं पारिस शहरांत व फ्रान्स देशांतील सर्व मोठमोठ्या शहरांत सर्वत्र आनंदोआनंद केला होता. सर्वांनीं ध्वज पताका लावून घरें गोपुरें सुशोभित केलीं होतीं व मोठा दीपोत्साह केला होता.

प्रदर्शनाच्या घराचे असे भाग केले होते कीं, एकेक राष्ट्राला आपआपले पदार्थ स्वतंत्रतेनें मांडितां येतील व त्यांवर पैरवी ठेवितां येईल. आपले युवराज प्रिन्स आफ वेल्स यांनीं ग्रेट ब्रिटन व हिंदुस्थानाकरितां फार मोठा भाग घेतला होता व तेथें रचना अतिउत्तम प्रकारची करविलीं होती ती पाहून सर्व समाजास मोठा संतोष झाला. हिंदुस्थानच्या पदार्थांची तर फारच वाहवा झाली. आजपर्यंत हिंदुस्थानानें अशा कामांत इतकें यश कधीं मिळविलें नव्हतें तें त्यास या पारिस प्रदर्शनांत मिळालें असें सर्वांनीं ह्मटलें व तें ऐकून आह्मांस अत्यंत संतोष होतो.

डा० बर्डऊड साहेब यांनीं हिंदुस्थानच्या पदार्थांच्या माहितीचें सविस्तर एक पुस्तक सविस्तर रीतीनें लिहून तयार केलें होतें. त्यावरून समजतें कीं, आपल्या चक्रवर्तिनी साहेब, प्रेसिडेंट साहेब, अर्ल नार्थब्रुक साहेब, लेडी एमा बेरिंग, कर्नेल अर्ल, मिसेस रिवेट कार्न्याक, मि० हाकीवर्टन, एम सी सी प्रिन्सेप साहेब यांनीं व काश्मीरचे, पत्याळचे, शिंदेचे व नभाचे राजांनीं आणि दुसऱ्या कित्येक कारखानदारांनीं व व्यापाऱ्यांनीं चांगले चांगले पदार्थ पारीसच्या प्रदर्शनास पाठविले आहेत. प्रिन्स आफ वेल्स हिंदुस्थानांत आले होते तेव्हां त्यांस जे उत्तम उत्तम नजराणे झाले होते तेही पारीस प्रदर्शनास पाठविले आहेत. मराठ्याच्या गादीचे मूळ पुरुष कैलासवासी शिवाजी महाराज यांचे हातची २०० वर्षांमागची तरवार पारीसच्या प्रदर्शनांत पाठविली आहे. शिवाय हत्यारें, वस्त्रें, दागिने, तबकें, जरतारी पदार्थ व आणखी परोपरीचे जिन्नस मिळून हिंदुस्थानची १२००० संख्या झाली आहे व तेणेंकरून हिंदुस्थानचा पारीस शहरांत व साऱ्या पृथ्वींत मोठा नावलौकीक झाला आहे. ही गोष्ट आह्मांस मोठी भूषणास्पद वाटते.

दुसरें एक प्रदर्शन या महिन्यांत आमच्या महाराष्ट्रदेशाची मुख्य राजधानी जें पुणें शहर तेथें झालें आहे. तें देश, काळ, सोयी, व द्रव्य यांच्या मानानें उत्तमच आहे. व त्यांत विशेष गोष्ट ही आहे कीं, यांत फक्त स्वदेशीय कारागिरीचे व याच देशांत उत्पन्न झालेले पदार्थ मांडिले आहेत. त्यांचा हेतु कारागिरि वाढावी व हिंदुस्थानांत कोठें काय उत्तम चिजा होतात याची सर्वांस माहिती व्हावी हा आहे व तोही चांगल्या रीतीनें सफळ होईल आणि आमच्या देशांत कारागिरी वाढण्याकरितां ठिकठिकाणीं अशीं प्रदर्शनें करण्यास लोकांस उमेद येईल असें आह्मी इच्छितो.

पुण्यास प्रदर्शनामध्यें ज्या ज्या ठिकाणच्या वस्तु मांडिल्या आहेत त्या:--

१ सातारचे श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज यांची ढाल, राज्याभिषेकाचे वेळची शिक्केदाणी, पडदळ, कलमदान, तरवार, वाघनखें, चिलखत. त्यांचे वेळच्या मोठमोठ्या बादशहाच्या तसबिरा आल्या आहेत.

२ कुंभकोणाहून सोन्याच्या मूर्ति, हस्तिदंती मूर्ति व तसबिराही आल्या आहेत.

३ मुंबईहून उंची नामांकित रेशमी कापड, उत्तम तऱ्हेचीं चीनचे चालीवर भांडीं, हस्तिदंती व चंदनी खोदीव सामान वगैरे.

४ सिंधहून लोकरी सामान कापड वगैरे.

५ गोंव्याकडून सर्व प्रकारचीं फळें व उंची चित्रें वगैरे.

६ मद्रासेहून सर्व उंचीं चित्रें व फळें वगैरे.

७ अमदाबादेहून उत्तम तऱ्हेचे रेशमी व सुती कापड वगैरे.

८ लखनौहून उंची कापड वगैरे.

९ बनारसेहून उत्तम नकशीचीं भांडीं.

१० कच्छभूजहून सर्व प्रकारचीं हत्यारें.

११ नाशीकचीं भांडीं.

याप्रमाणें व शिवायही पुष्कळ तऱ्हेचे व मनास आनंद देणारे पदार्थ जमले आहेत. आणि हे सर्व विक्रीचे आहेत.

## मध्यएशियेंतील हिंदूच्या व्यापारास हरकत.

आमच्या दीन दुर्बळ हिंदु लोकांचे नष्टचर्य अजून संपत नाहीं ह्मणून त्यांस चोहोंकडून कांहींना कांहीं हरकती येतात असें दिसतें. अलीकडे लढाईचे वारे सुटले होते तेव्हां कित्येक अविचारी लोक बरळत असत कीं, रशियन फार चांगले आहेत. व हिंदुस्थानावर त्यांचा डोळा असल्यामुळें तेही हिंदुलोकांशी मायाळुपणानें वर्तणूक करितील, ती पुढची गोष्ट राहो, पण हल्लीच एका प्रकरणांत त्यांनीं हिंदु लोकांविषयीं जी आपली बुद्धी दाखविली आहे ती येणेंप्रमाणें:—

एशिया खंडांत तुर्कस्थानाच्या कांहीं भागांत रशियन सरकारचा अंमल आहे व तिकडे आमच्या हिंदु लोकांचें व्यापाराकरितां दळणवळण आहे तें त्यांस आवडत नाहीं असें दिसतें, कारण हिंदु लोकांच्या व्यवहाराबद्दल त्यांनीं फार सक्तीचे ठराव केले आहेत. ह्मणजे सर्व रयतेस असें जाहिर केलें आहे कीं, कोणा हिंदु मनुष्यानें त्या देशांत घर व जमीन विकत घेऊं नये. कोणी मुसलमानानें हिंदूपासून कर्ज घेऊं नये. कोण्या मुसलमानाचें घर अथवा जमीन हिंदूचे ताब्यांत वंशपरंपरेनें आली असली तरी ती या जाहीरनाम्यापासून सहा महिन्याचे आंत मुसलमान मालकास परत घेण्याचा अधिकार आहे. तसेंच हिंदूचें कर्ज फेडण्याकरितां कोणा मुसलमानास पैसा पाहिजे तर रशियन सरकारचे तिजोरींतून तो न्यावा. व मूळ रकमेच्या तिजाई पैसा घेऊन हिंदूनें त्यास्थावररील आपला सर्व हक्कसंबंध सोडला पाहिजे असें ठरविलें आहे. व हिंदूच्या कर्जाबद्दल कोणा मुसलमानास कैद केलें जाणार नाहीं असाही जाहिरनामा प्रसिध्द केला आहे.

हें पाहून आह्मांस मोठा चमत्कार वाटतो. युरोपखंडांतील सुधारलेलें रशियन सरकार हिंदू व्यापाऱ्यास अशा अन्यायी व जुलमी रीतीनें वागवील अशी आह्मास कल्पना नव्हती. मुसलमान लोकांवर मेहेरबानी करण्याखातर असा ठराव करणें रशियन सरकारास जरूर होतें तर त्याजमध्यें हिंदू लोकांचें असें नुकसान करण्याचें कारण नव्हतें. व मागील त्यांचे व्यवहारावर असा कटाक्ष ठेवावयाचा नव्हता. पृथ्वीवरील कोणत्याही देशाची रयत कोणत्याही देशांत जाऊन राहील व ती चांगले नीतीनें वागून व्यापार वगैरे करील तर त्या देशाच्या राजानें तिला सहाय देऊन तिचें संगोपन केलें पाहिजे तें एकीकडे राहून त्यांवर असा गहजब होणें हें हिंदूचें दुर्भाग्य ह्मणावयाचें, दुसरें काय! रशियन सरकारास असा ठराव करणेंच होता तर पुढच्या गोष्टीबद्दल करावयाचा होता. पण वंशपरंपरेनें हिंदूचे ताब्यांत असलेलीं मुसलमानांचीं स्थावरें त्यांनीं सरकारापासून तिजाई मुद्दल आणून देऊन हिंदूपासून परत घ्यावीं असा ठराव

हरणें न्यायाचें आहे काय ? निदान हि-लोकांस स्याबरांची सत्ता चालवयाची नाहीं. पण त्यांच्या रकमेंत दोन हिस्से द काय ह्मणून ? व तो एक हिस्साही सलमानांकरितां सरकारानें चालवयाचा तो काय ह्मणून ? यावरून हिंदुस्यानच्या लोकांचें दळणवळण व व्यापार या देशांत ठेवला जाऊं नये व हिंदूस या देशामध्यें कांहीं स्वास्थ्य असूं नये. असें रशियन सरकार इच्छितात कीं काय ? असें असेल तर हें चांगलें नाहीं. देशाची स्थिति सुधारण्यास त्यास अनेक देशाचें साहाय लागतें. व कोणत्याही देशाच्या सुधारणेला शोभणाऱ्या मोठ्या देशच्या लोकांच्या व्यपाराच्या दळणवळणानें भार प्राप्त आहे सबब रशियन सरकार तो ठराव रद्द करील व हिंदुस्यानच्या लोकांस तेकडे इरतऱ्हेनें जाण्या येण्यास फाव ठेवील तर चांगलें.

हिंदू लोकांनीं सिंधु, ब्रह्मपुत्रेच्या पली कडे जाऊं नये ही शास्त्राची एक बेडी त्यांच्या पायांत आहे व ती थोडीशी तोडून ते कोठें बाहेर देशीं जाऊं लागले तर रशियन सरकारासारखे राजे सदरील प्रकारच्या बेड्या पुन्हा त्यांच्या पायांत घालण्यास तयार होतात तेव्हां हें हिंदू लोकांचें नष्टचर्यच नव्हे काय?

## नेटिव संस्थानांतील फौज.

थोडे दिवसांमागें बडोद्याच्या राज्यव्यवस्थेचा रिपोर्ट छापून प्रसिद्ध झाला त्याजवर टीका करितांना वांबेगाझेट कर्त्यांनें लिहिलें होतें कीं, या संस्थानचा फौजेचा खर्च अतिशय असून तो व्यर्थ आहे. व दुसऱ्याही कित्येक नेटिव संस्थानिकांची फौजें निरर्थक असून ती देशाची केवळ उधळपट्टी आहे सबब सरकारानें या का विच्यार करावा असें कित्येकांचे उद्गार लिहिण्यांत आलेले आहेत व त्यावरून सरकारानें या कामीं मन घातलें व संस्थानिकांच्या फौजा कमी करण्याचा ठराव केला असें वर्तमान प्रसिद्ध होऊन त्यावर एक दोन मराठी पत्रांत निबंधही गेल्या आठवड्यांत आले आहेत. सदरहू ठराव आमचे पाहण्यांत आला नाहीं ह्मणून त्याविषयीं आह्मास कांहीं लिहितां येत नाहीं. पण त्या उलट विलायतेकडील तारांच्या बातम्यावरून पार्लमेंट सभेमध्यें वाटाघाट होऊन एकाच्या प्रश्नास असें उत्तर मिळालें आहे कीं, नेटिव संस्थानिकांच्या फौजेची संख्या अमुक कमी जास्त असावी हें पाहण्याचें सरकारास कांहीं कारण नाहीं.. यावरून संस्थानिकांच्या फौजा ब्रिटिश सरकार कमी करील कीं काय असा जो धाक आहे त्याचें कांहीं कारण दिसत नाहीं. व खरेंच म्हटलें असतां संस्थानिक आपल्या पदरच्या पैशानें जे शिपाई लोक ठेवितात त्यांच्या अंतरगत व्यवस्था पहाण्याचें सरकारास कांहीं कारण नाहीं. व आमचे संस्थानिक इतके राजनिष्ठ आहेत कीं इंग्लिश सरकारची रशियाबरोबर लढाई जुंपणार असा बूट निघाल्या बरोबर कित्येकांनीं आपल्या फौजा मोठ्या हौसेनें रशियावर जाण्याकरितां सरकारचे दिमतीस देण्याविषयीं आपली उत्सुकता दाखविली यावरून आमच्या संस्थानिकांच्या फौजा इंग्लिश सरकारास काडीमात्र अनिष्ट नसतां सहायार्थ उपयोगी आहेत हें स्पष्ट होतें, तर त्या कमी करण्याचें सरकारास प्रयोजन नसून उलट्या परभारें खर्चाच्या त्या आहेत सबब वाढल्या असतांही अवश्य आहेत असें सरकारास वाटून त्यांनीं तशी त नवीन करावयाची. ह्मणून फौजा कमी करण्याविषयीं जो बूट बाहेर पडला त्यांत तथ्यांश नसावा असें वाटतें.

इंग्लिश सरकारची सद्दी इतकी जबर आहे कीं, ते या देशांत केवळ सिंह असून आमचे संस्थानिक त्यापुढे मेंढरें आहेत. ह्मणून त्यांच्याविषयीं व त्यांच्या फौजाविषयीं देशकाल वर्तमानानुसार इंग्लिश सरकारास स्वप्नांतही भीति बाळगणें नको, मग दृष्टांतांत कशास पाहिजे आहे ? आतां हेंही खरें आहे कीं, फौज जी बाळगावयाची ती परचक्र निवारणार्थ बाळगतात, व तूर्त काल आमच्या संस्थानिक लोकांच्या नशीबानें त्यांस इंग्लिश सरकार असें प्रबल व श्रेष्ठ मिळालेलें आहे कीं, त्यांनीं परचक्राचे भीतीचा लेशही मनांत आणावयास नको. तें इतकें कीं, मातीच्या चित्राची शोभेसाठीं फौज बाळगणें किंवा सजीव मनुष्याची बाळगली तरी ती सारखीच आहे; कारण तिच्या उपयोगाचा कांहींच प्रसग नाहीं; ह्मणून राजे व संस्थानिक यांनीं त्या कामीं त्यांचा अतोनात पैसा खर्च होत असेल तर तो कांहीं आवरून धरावा व आपलें आपण शहाणें व्हावें. असें केल्यास वावगें नाहीं असें आह्मास वाटतें.

## वऱ्हाड.

ता. १९ जून नंतर पुढें लिहिल्याप्रमाणें नेमणुका व्हावयाच्या.

मेजर लाटन साहेब खामगावचे स्माल काज जडज यांस उमरावतीस स्मा. का. ज. नेमिलें. व खामगावास कायमची नेमणूक मि. डनलप साहेब यांची केली व ते रेसिडेंट साहेबांकडेस वऱ्हाडाकरितां आफिशियेटिंग सेक्रेटरी आहेत तोंपर्यंत मे० दस्तुर बहिमनजी साहेब यांणीं खामगाव स्माल काज कोर्टाचें काम पहावें असा ठराव केला आहे. तसेंच उमरावतीस कायम नेमणूक झालेले मेजर लाटन साहेब हक्काचे रजेवरून परत येईतोंपर्यंत मि० निकोलेट्स साहेब यांस त्यांचें काम पहाण्यास योजिलें आहे.

हैदराबादेस अलीशान रेसिडेंट साहेब बहादुर यांनीं चक्रवर्तिनी साहेबांचे जन्म दिवसाचे उत्साहार्थ दिवाण साहेब व दुसरे मानकरी लोक यांस मोठी जाफत दिली. बेतबात फार चांगला होता.

असें एक वर्तमान प्रसिद्ध झालें आहे कीं निजाम सरकारचे मुलखांत नेटिव वर्तमानपत्रांसंबंधी जो नवीन कायदा झाला आहे त्याची अंमलबजावणी करणार, वा:! खुद्द इंग्रज सरकारानीं आपले मुलखांत त्याचें स्वरूप सौम्य केलें आणि आतां संस्थानिकांच मुलखांत त्याची करडी कमान चालू होणें ह्मणजे निवळ गप्पेसारखें दिसतें!

वाशिमच्या सिव्हिल आस्पिटलवरील नेटिव्ह डाक्टर पुरू स्वामी यांस बडतर्फ केलें.

कमिशनर साहेबांची स्वारी च्यातुर्मास्य अकोल्यास रहाण्यास येणार आहे ती या महिनाअखेरीचे सुमारास येईल असें ह्मणतात.

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी आणखी १९ दिवस चिखलदऱ्याहून येत नाहीं असें ह्मणतात.

इचलकरंजीकर प्रसिद्ध नाटककार या प्रांतीं सुमार दीड वर्ष होते ते बरसात नजीक आली ह्मणून या आठवड्यांत स्वदेशीं गेले. त्यांच्या सांगण्यावरून समजतें कीं. त्यांस सतरा हजार रुपयें मिळाले व त्यांतून सात हजार रुपये खर्च जाऊन दहा हजार रुपये त्यांनीं निवळ स्वदेशीं नेले.

उमरावती हायस्कूलचे हेड मास्तर रा. रा. विष्णु मोरेश्वर माहाजनी एम ए गुरुवारीं एथें आले व आज उमरावतीकडेस गेले. त्यांचे दोन असिस्टंट मास्तर रा. रा. पावगी व गोडबोलेही एथें परवां येऊन [illegible] उमरावतीस गेले.

रोहिणी सर्व कोरड्या गेल्या व मृग लागल्यासही आज च्यार दिवस झाले. पाऊस पडत नाहीं. ऊष्मा अतिशय होऊं लागला आहे पाण्याचा ताप अधिकाधिक होऊं लागला आहे. मेघराज लवकर कृपा करितील तो दिवस सुदीन. महामारीबाई साहेबांनीं वऱ्हाडांत ठाणें आणिलें आहे एवढेंच नाहीं. खामगाव, बाळापुर पर्यंतही बाई साहेबाचा दरकुच दरमजल तळ आला आहे. सबब सर्वांनीं आहारविहाराविषयीं नेमस्त रहावें व परमेश्वरावर भार ठेवून निष्काळजी असावें.

वऱ्हाडांतील बी. ए. रा. रा. गणेश श्रीकृष्ण खापर्डे व रा. रा. रंगनाथ नृसिंह मुधोळकर सुटीमध्यें इलिचपुरास आले होते ते या आठवड्यांत एथें येऊन काल मुंबईस परत गेले.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब व मे० आर्डेसर साहेब तहशिलदार यांनीं या आठवड्यांत काळ्या मारुतीजवळ गोडी विहीर आहे तिचा गाळ काढण्याच्या कामावर माणसें लाविलीं आहित. व अगरवेशीकडे नदीमध्यें दोन तीन नवीन झिरी खोदण्याचें काम लाविलें आहे.

शाळाखात्याकडील ज्ञानसंग्रह मासीक पुस्तक जुलई महिन्याच्या आरंभापासून निघण्याची तयारी झाली आहे असें समजतें.

रा. रा. सखाराम दत्तात्रय जळगावचे तहशिलदार यांनीं पेनशन घ्यावें असा हुकूम झाला व त्यांचे जाग्यावर नवाब किशोरखान यांस एक वर्षाचे प्रोबेशनवर नेमिलें व त्यांस थर्ड क्लास माजिस्ट्रेटचा व ५० रुपये पर्यंत दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार दिला.

## वर्तमानसार.

सुरतचे डोम एडिटर व वकील यांवर दंग्याच्या संबधानें फौजदारी खटला माजिस्ट्रेटपुढें सुरू आहे ११९ दिवस चौकशी चालली. असून प्रासिक्युशन सरकारतर्फें चौकशी पुरी झाली. नाहीं.

मुंबईस रेल्वेकडील गुड्स एजंट व गैरेवरील मुकदमा एक दिवस चालून तकुब राहिला आहे.

धनी व चाकर या संबधी कायद्याच्या बिलाच्या मसुद्यांत फेरफार चालू आहे.

हिंदुस्थानांत मासे. कोणत्या प्रकारचे कोठें आहेत. व त्यांचे गुण धर्म काय याजवर डाक्टर डे हे ग्रंथ लिहित आहेत.

मद्रास इलाख्यांतुन सिंकोना नामक औषधाच्या काष्टवेलीचे १७७ गट्ठे विलायतेस गेले व त्याचे सुमार दोन लक्ष रुपये उत्पन्न झालें.

विलायतेस अंडर स्टेट सेक्रेटरी लार्ड हमीलटन साहेब होते त्यांचे जागेवर ब्राम रसल एडवर्ड स्व्यान होप साहेब यांस नेमिलें.

हल्लीचे आमचे व्हाइसराय लार्ड लिटन साहेब यांचे तीर्थरूप हे मोठे भविष्यवादी होते व त्यांच्या सांगण्याचा इतरापेक्षां अधिक ठोकताळा पडत असे. त्यांनीं १९ वर्षांपूर्वी एका स्त्रिला सांगितलें होतें कीं अमुक दिवशीं तुजवर एक मोठें संकट येईल व तेव्हांपासून तुझे ऐश्वर्यास उतरती कळा लागेल. त्याप्रमाणें त्या नेमक्या दिवशीं तिचा बाप मरण पावला असें वर्तमान विलायतेहून आलें आहे.

इंग्लिश सरकार व रशियन सरकार यांच्या तहनाम्याच्या संबधानें मोठमोठ्या राष्ट्रांची सभा भरणार ती बर्लिन एथें ११ वे तारखेस भरणार.

मुंबई इलाख्यांतील वर्तमानपत्रांचे रिपोर्टरची जागा वेद शास्त्र संपन्न रा. रा. कृष्ण शास्त्री चिपळूणकर यांचे मरणानें रिकामी झाली तिजवर मि. गोविंद विठ्ठल करकरे यांस नेमिलें.

मुंबई इलाख्यांतील कांहीं हायस्कुलावरील हेडमास्तरांच्या पुढें लिहिल्याप्रमाणें नेमणुका झाल्या आहेत. अमदाबादचे मि. क्यारेट यांस मुंबईस एलफिनस्टन कालेजाकडे नेमिलें. त्यांच्या अमदाबादच्या जागेवर धारवाडचे मि. विठ्ठल नारायण पाठक, धारवाडास पुण्याचे मि. महादेव विष्णु काणे, पुण्यास अहमदनगरचे मि. गोपाळ बाबाजी हीर पाठक व अहमदनगरास मि. हरी अनंत केळकर एलफिनस्टन कालेजांतील असिस्टंट मास्तर यांस नेमिलें.

नोतपुर एथें थोड्या दिवसांपूर्वीं फार मोठें वादळ होऊन पाऊस पडला. त्या योगानें पुष्कळ घरें व वृक्ष पडल्याचें कळतें.

अल्प वयांत लग्नें होतात तीं बंद करण्याची युक्ति.— युनिवर्सिटीच्या परिक्षेस जे उमेदवार येतात यांचीं बहुतेकांचीं लग्नें झालेलीं असतात. अशीं लग्नें बंद करण्याची नवी युक्ति काढली आहे. बंगाल्यांतील शाळाखात्यापैकीं एका इन्स्पेक्टरानें सुचविलें आहे कीं, मात्रिक्युलेशनच्या परिक्षेस ज्या उमेदवारांचीं लग्नें झालीं असतील त्यांस न येऊं देण्याचा युनिवर्सिटीनें ठराव करावा. युक्ति नवीन आहे खरी परंतु या बाबतींत नेटिव लोकांचीं मतें या इन्स्पेक्टरानें मागविलीं आहेत. या सूचनेस कलकत्ता युनिवर्सिटीची मंजुरी मिळते न मिळते पहावें.

तिरहूत ( बंगाल व आसाम ) मधील रेलवे बांधण्याकरितां ५६,२१,४८९ रुपये खर्च करण्याची हिंदुस्थान सरकारानें मंजुरी दिली.

रशिया सरकारचा एक हेर सिंगापुर येथील किल्ल्याच्या तटबंदीचा नकाशा काढित असतांना पकडल्याचें कळतें.

ने. ओ.

---

## नोटिसा.

रा. भ्रिजलाल वल्लद तुळशीराम मारवाडी वजन्याग वस्ती मौजे बेलखेड तालुके अकोट पोष्ट तेल्हारा यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, सन १२८६ फसली सालीं मी तुह्मास कापूस खंडी २॥।२ दोन खंडी सत्रा मण विकत दिला होता. त्याचे रुपये दर खंडीस ४० प्रमाणें आकार रुपये ११४ एकशें चवदा रुपये घेणें असून तुह्मी आपले देशास निघून गेले. त्याच सालीं तुमची जवारी माझे पेवांत ठेविली होती. त्या पेवांत पाणी गेल्यानें माझे व तुमचे ज्वारीचें नुकसान फार होऊं लागलें त्या वेळेस मी गावांत जवारी विकली. त्याजबद्दल दाखला छबिलदास नंदराम याचे दुकानीं आहे. त्या जवारीचे रुपये ५६। सवा छप्पन विक्रीचे आले ते वजा जातां बाकी रुपये ५७॥। पावणेअठ्ठावन मागत असतां देऊं दिलाऊ करिता सबब तुह्मास या नोटिशीनें कळविण्यांत येतें कीं, रुपये ५७॥। पावणेअठ्ठावन व या रकमेचें दोन वर्षांचें व्याज व नोटिशीचा खर्च ही नोटिस तुह्मास पावल्यापासून चार दिवसांचे आंत आणून द्यावें नाहीं तर दिवाणी कोर्टांतून तजवीज करण्यांत येईल. कळावें. तारीख ५ जून सन १८७८ इसवी.

[ सही ] हरि वल्लद कडताजी माळी इंगळे रहाणार बेलखेड मौजे हातची निशाणी रेघ.

---

नोटिस.

सूर्यभान वल्लद जानजी पाटील रहाणार मौजे चिंचोली तालुके अकोला यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे तुह्माकडे खातावरून २३८ रुपये घेणें आहे व ते रुपये देण्याचा करार चैत्र शुद्ध १५ चा केला होता तो गुजरून आज सुमार दीड महिना झाला अजून रुपये दिले नाहींत सबब नोटिस देण्यांत आली आहे तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत रुपयांची आदायी करावी न केल्यास कोर्ट खुलें होतांच फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये वसूल करण्यांत येतील कळावें, तारीख १ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) लच्छीराम वल्लद सुकदेव मारवाडी दुकान दहिगाव ता. अकोलें दस्तुर खुद्द

---

नोटिस.

राजश्री लक्ष्मण वल्लद नथ हाली रहाणार मौजे मांजरी तालुके बाळापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं मौजे मजकुर एथील माझी जागा कोंड्याची लांब हात १८ व रुंदी हात ११ मी चार दिवालीचे आंत असून तो तुह्मास माझे खुशीनें आजपावेतों गुरें बांधण्यास दिली होती परंतु या जागेची हल्लीं मला जरूर आहे करितां ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत जागा खाली करून द्यावी. न द्याल तर तुह्मावर शिरस्त्याप्रमाणें दिवाणी कोर्टांत दावा करून जागा ताबेत घेतली जाईल व कोर्टखर्चही भरून घेतला जाईल. तुह्मी सदर्हू जागेवर छप्पर बांधूं नये. जर बांधाल तर त्यावर तुमचा हक्क रहाणार नाहीं कळावें. तारीख ६ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) पांडुजी वल्लद चंद्रभान पाटील मांजरी तालुके बाळापुर दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

श्रावण तेली रुमालें व बाळाजी बाबाजी ब्राह्मण रहाणार कारंजा. या उभयतांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझा नवरा मरण पावल्यामुळें मी आपले कारंजाचें घर सोडून कुंडें मंगरूळ एथें रहात होतें. तेथें तुह्मी निरोप पाठवून मला कारंजास बोलावून घेतलें व माझे घर विकत घेण्याचें बोलणें लाविलें. तेव्हां मी त्याची २५० अडीचशें रुपये किंमत सांगितली. व ही किंमत आल्यास मी घर विकीन नाहींपेक्षां विकणार नाहीं असें निक्षून सांगितलें तेव्हां तुह्मी कबूल होऊन रुपये आणून देतों ह्मणून निघून गेले तों एक महिनाभर आले नाहीं नंतर आले व सांगितलें कीं, २५० रुपये देतो. व माझे हातून स्टांपाचा कागद विकत आणविला व पाटील पांडे महाजन यांचे समक्ष तो कागद माझे तर्फें लिहाविला. पण त्यांत काय लिहिलें हे मला मुळींच वाचून दाखविलें नाहीं. माझी सही करून घेतली तेव्हांही मी विचारलें कीं, कागदावर घराची किंमत काय लिहिली तें वाचून दाखवा तरी तसें केलें नाहीं व फंदानें कागद लिहून सही करून घेतली आणि त्यांत घराची किंमत १०० रुपये घातली व तितकीच देऊं लागले ते रुपये मी न घेतां आपला दस्तैवजच मागूं लागली पण दस्तैवज देईनात व पूर्वीं ठरल्याप्रमाणें २५० रुपये ही देईनात ह्मणून ही नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ८ दिवसांत २५० रुपये द्यावे अगर माझा दस्तैवज मला परत द्यावा याप्रमाणें मुदतींत न केल्यास कोर्टांत फिर्याद करून खर्चासुद्धां तुह्मापासून रकम अथवा घर घेतलें जाईल कळावें तारीख १५ मे सन १८७८ इसवी.

( सही ) गुजी मर्द बुवाजी गंधी जात सोणार कारंजा बीबी ता. मूर्तिजापुर इचे हातची निशाणी बांगडी.

---

नोटिस.

मन्या व कृष्णा वल्लद झेल्या महार रहाणार मौजे अडूळ तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे तुह्माकडे ५१८४ एकावण रुपये च्यार आणे व्याजासुद्धां वहिखातावरून निघतात ते रुपये तुह्मांस दोन च्यार वेळां मागितले तुह्मी देतों देतों ह्मणता पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे. तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत रुपयांची आदाई करावी नाहींपेक्षां फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील. कळावें तारीख ३ जून सन १८७८ इसवी.

( सही ) जानासा हिरासा लाड पास्टुलकर दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

जयणी महारिण रहाणार मौजे आस्टुल तालुके बाळापुर इजला खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुजकडे आमची जवारी ॥. अक्षरी दहामण आठशेरी पायलीची येणें आहे ती आह्मी तुला मागितली असतां देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून १५ दिवसांत जवारी आणून दे नाहीं तर फिर्याद करीन. कळावें. तारीख ३ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) जानासा हिरासा लाड पास्टुल दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

भोवानी वल्लद सिदाजी घुमार रहाणार पास्टुल तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे १०॥ साडेदहा रुपये येणें आहेत. ते दोन च्यार वेळां मागितले तुह्मी देतों देतों ह्मणतां पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून ८ दिवसांचे आंत रुपये आदा करावे नाहीं तर फिर्याद करून रुपये घेण्यांत येतील. कळावें तारीख ३ माहे जून सन १८७८

[ सही ] जानासा हिरासा लाड पास्टुलकर दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

एकुजी वल्लद दर्याजी पाटील देवठाणेकर तालुके वाशीम यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, आमचे तुह्माकडे २१८४ एकवीस रु. च्यार आणे बाकी वहीखातावरून व्याजासुद्धां येणें आहेत ते तुह्मास कित्येक वेळा मागितले तुह्मी देतों देतों ह्मणता पण देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून १५ दिवसांचे आंत रुपयांची आदाई करावी. नाहीं तर कोर्ट खुलें होतांच फिर्याद करून या नोटिशीचे खर्चासुद्धां रुपये भरून घेऊं कळावें तारीख ३ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) जानासा हिरासा लाड पास्टुलकर दस्तुर खुद्द.

---


## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामेडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धा आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

---

## जाहिरात.

### गजकरणाचें औषध.

आमचे छापखान्यांत गजकरणाचे औषधाच्या डब्या विक्रीकरितां आल्या आहेत हें औषध खात्रीचें असून यापासून गुण लवकर येतो. लावतांना आग मुळींच होत नाहीं. औषध थंड पाण्यांत भिजवून गंधाचे उटीप्रमाणें पातळ करून स्नान केल्या नंतर लावावें. किंमत ८६ सहा आणे.

हें औषध गजकरण शिवाय करून खरूज, व नायटे यांजवरही चांगले प्रकारें लागू होतें.

*** या गजकरणाच्या औषधाच्या डब्या दोन वर्षांपूर्वीं आमचे छापखान्यांत विक्रीकरितां होत्या व त्यापासून पुष्कळ लोकांस गुणही आला. परंतु अलीकडे सदर्हू औषधाच्या डब्या आमचे जवळ शिल्लक नव्हत्या व तेणेंकरून या रोगानें पीडलेले लोक निराशेनें परत गेले ह्मणून आह्मी या औषधाच्या डब्या मुद्दाम आणल्या आहेत. ता. १८ एप्रिल सन १८७८ इसवी.


---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० १६ माहे जून सन १८७८ इसवी. अंक २४

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहांशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी म्हणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामेडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धे आणा ५॰

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

कोणी होती बध्द रुभोगपाशीं ।
कोठें कोठें विप्रलंभ प्रकाशे ॥
चित्तें त्यांचीं नित्य शृंगारपूर्ण ।
त्यांला वाटे रात्र ही जाय तूर्ण ॥ ८६ ॥
रासक्रीडा भोगुनि श्रांत होती ।
यक्रीडेसाठि वार्पित जाती ॥
गाती कांता भाव रम्य स्वरांनीं ।
साथी होती कांत वीणादिकांनीं ॥८७॥
कांता रुसोनि शयना यांत जै अमर्षे ।
तेव्हां बळेंचि चिडवी प्रिय तीस हर्षे ॥
कीं आपले धरुनि तो क्षण केश हस्तीं
कोपें वदेल 'करिरे करितोस मस्ती' ८८
कोठें मानवती न येति शयनीं
सेवेस धिक्कारिती,
तेव्हां नायक कांहि भीतिद अशी
वस्तू हळू प्रेरिती ॥
या चर्मांहिस पाहतांचि सगळा
तो मान त्यांचा गळे ।
कांताच्या मग या गळां पडुनिया
आलिंगिती या वळें ॥ ८९ ॥
कोठें कोणी सरस वनिता
कांत मार्गास पाहे ।
तो येईना ह्मणुनि हृदयीं
ताप अत्यंत वाहे ॥
त्या तापानें रजनि तिजला
वर्षशी दीर्घ वाटे ।
त्या दुःखा ज्या निरखिति सख्या
कंठ त्यांचाहि दाटे ९०॥
करिती उपचार ताप शांती-
स्तव परि हीन होय कांती ॥
अबलापण तें खरेंच झालें
मृदुही त्यां वनवात होत भाले ९१
विरहि तरुण कोणी मत्त होवोनि गानीं ।
भटकत वनितेतें गाति उच्च स्वरांनीं ॥
हसति रडति केव्हां नाचती भान नाहीं ।
अशिच करि तनूची त्यांचिया काम लाही
९२

आर्या.

ऐसा विरहाग्नीचा,
प्रताप कोठें करी महानर्थ ॥
कोठें अति प्रबळही
होतां होय क्षणांतरीं व्यर्थ ९३
जळती विरहाग्नीनें
गळती धैर्यें तयांचि पांगुळती ॥
पाय, इतुक्यांत कांता
मिळतां, पीडा समस्तही टळती ९४

श्लोक.

तरि विरहि लोक ते ह्मणाति
ही दशा दुःखवी,
तरि न रमणियता यांनि,
ह्मणोनि ती रंजवी
दर्शेत करुणाख्य त्या रस असे
तरी गौण तो
पथ न रस होय हो त्रिजग
दिष्ट शृंगार तो ९५

आर्या.

कोठें नाचे गणिका,
ताल लयादिक समस्त साधूनी
विषय विरक्तांहि जिंते
पाहुनि व्हावेंचि मस्त साधूनी ९६
उद्धट नृत्यें सुटली
राखाडने रुळविली तिची वेणी
वाटे तरुण व्याघ्रा
वश व्हाया घातली स्मरें मेणी ९७
किंवा मदनानें हर,
शिरीं करायास घोरतरवार
लगबगीनें धरिली
ती एके हस्तींच ढाल तरवार ९८

श्लोक.

कोठें गाती वार नारी भारानें
श्रोत्यांचीं ती घे हिरावूनि
त्यां तानातें ऐकुनी कोकिलांनीं
वाटे केली वस्ति लाजोनी रानीं ९९
असे हे समागि सतत विषयासक्त दिसतीं
परी त्यांची देवा प्रिय अधिक मानी मतिरती
तयां वाटे देवा भजुं तरिचही सार्थक जनें
ह्मणोनी देवाच्या व्यसन गणिती नित्य भजनीं
॥ १०० ॥

( पुढें चालू. )

## नोटिसा.

रा. रा. गोविंद आनंदराव देशमुख कसबे शिगांव तालुके खांमगाव यांसी नोटिस देणार नारायण रामचंद्र देशमुख कसबे शिगांव तालुके खांमगाव, नोटिस देण्याचे कारण कीं, तुमची व आमची समाईक जागा बिरादरीची वडीलो पार्जीत चालत आलेली असोन त्या जागेवर तुह्मी आमचे संमती खेरीज अवाराचे दिवालीस काम सुरू केलें आहे त्या जागेची चतुःसिमा पूर्वेस रस्ता पश्चिमेस खुद्द तुमची व आमची समाईक जागा ज्यांत हल्लीं ज्यान फकिराम सोनार रहातो दक्षिणेस देविदास बाबा साधु यांचें घर उत्तरेस रस्ता येणेंप्रमाणें चतुःसीमेचे जागेवर जें तुह्मी काम सुरू केलें आहे तें बंद करून आमचे हिस्सेरसीदीचे मानानें ह्मणजे आमचे व तुमचे संमतीनें जाग्याची वाटणी आठ दिवसाचे आंत करून द्यावी अगर तसें न झाल्यास झालेले इमारतीचा खर्च कांहींच मजरा न देतां कोर्ट खर्चा सुद्धा नोटिसीचे खर्चा सहित तुमचे जवळून घेण्यांत येईल. कळावें तारीख १३ माहे जून सन १८७८ इसवी,

( सही ) नारायण रामचंद्र देशमुख कसबे शिगांव दस्तुर खुद्द,

### नोटिस.

रामजी व लक्ष्मण वल्लद कुकाजी आवटे माळी रहाणार मौजे मळसूर ता. बाळापूर यास सुपकरण रतनचंद साहु दुकान अलेगाव ता. बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे खात्याव रुप २२६।= येणें आहे व त्याचे अडीच वर्षाचें व्याज २०४।= येणें आहे तें अजून दिलें नाहीं. सबब नोटिस दिली आहे तर १५ दिवसांत रुपये पाठवावे नाहीं पेक्षां फिर्याद करून खर्चा सुद्धा सर्व रुपये घेतले जातील कळावें. तारीख ९ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) सुपकरण रतनचंद साहु दुकान पेठ अलेगाव द. खुद्द.

### नोटिस.

संभाजी वल्लद मालजी पाटील हटकर मौजे मळसूर ता. बाळापुर यांस सुपकरण रतनचंद साहु दुकान अलेगाव ता. बाळापुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मा कडे दोन सालबंद्या थकल्याबद्दल रुपये २० व दीड वर्षाचें व्याज रुपये ७॥ एकूण रुपये २७॥ घेणें आहे ते ही नोटिस पोंचल्या पासून १५ दिवसांत आणून द्यावें नाहीं पेक्षां फिर्याद करून खर्चा सुद्धा सर्व रकम घेतली जाईल. कळावें तारीख ९ माहे जून सन १८७८ इसवी.

[ सही ] सुपकरण रतनचंद साहु दुकान पेठ अलेगाव द. खुद्द.

### नोटिस.

महादु वल्लद शिवाजी गायगोळ रहाणार वडनेर भोलजी तालुके मलकापुर यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी आमच्या नोटिसीचें उत्तर दिलें तें पोंचलें. तें खोटें आहे सबब त्याचा जबाब येणें प्रमाणें:—

आमचे तुह्माकडे सालबंदी बद्दलचे येणें आहे तीन सालबंद्या तुह्मावर चढल्या आहेत त्यांचे आह्मी ३०० रुपयांचें तुह्मांस मागणें केलें. त्याचे उत्तरांत ६०० रुपये घेणें पैकीं २०० रुपये रोख दिले, ३०० नोकरींत फेडून दिले, व १०० ज्वारी, कापूस वगैरे मोलांत दिले ह्मणून बिल्हेवाट लिहिली परंतु त्याचा या ३०० या रुपयाशी कांहीं संबंध नाहीं. तुह्माकडून जो वसूल आला तो ज्या त्या सालीं मजरा मिळाला आहे. व हे ३०० रुपये तुह्माकडे निवळ घेणें निघालेले आहेत व चवथी सालबंदी ही भरणार सबब उलगडा काढण्याच्या तजवीजी करितां ५।४ महिन्यामागें तुह्मी, तुमचा पुतण्या, जावाई व आणखी १।२ मनुष्यें मिळून रोज आमचे कडे येत होता व शेती, बैल, ह्मशी, जागा वगैरे घेऊन निकाल करा असें ह्मणत होता त्यास बहुत साक्षिदार आहेत. व आतां बदनामीच्या गोष्टी सांगता, ठीक आहे. सरकार याचा इनसाफ करील. व अप्रमाणिक कोण व खोटा कोण हेंही ठरवील अजून तुह्मी आपसांत उलगडा करीत असल्यास करावा नाहीं पेक्षां नोटिस पावल्यावर १० दिवसांनीं तुह्मावर फिर्याद करून नोटिसीचा खर्च व कोर्ट खर्चा सुद्धा भरून घेऊ. कळावें तारीख ११ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) चुनीलाल बनसीलाल दुकान वडनेर दस्तुर खुद्द.

### नोटिस.

सूर्यभान वल्लद तुळजाजी इंगळे ऊर्फ शाईवाला व रमाई मर्द सूर्यभान रहाणार तर्फ कासारखेडें तालुके बाळापुर यांस चिंतामण वल्लद भगवान गिते रहाणार मौजे चिंचोली कारफर्मा तालुके खामगाव याजकडून नोटिस देण्यांत येते कीं माझी बायको नामे गंगी इजला कंपेश बारा महिने झाले, माझे घरून अंब खाण्याचे मिषानें तुमचा लेक मारुती हा घेऊन गेला व आठ चार दिवस ठेऊन पुन्हा आणून घालीन असें ह्मणाला त्यानंतर मी स्वतः एकटा दोन तीन वेळा नेण्याकरितां आलो परंतु तुह्मी सांगितलें कीं आठ चार दिवसांनीं आणून घालतों. असें दरखेपे-

स चाळवाचाळव केली परंतु आणून घातली नाहीं नंतर भोजाजी पाटील मौजे चिंचोली यांस बरोबर घेऊन आलो तर तुह्मी सांगितलें कीं १५ दिवसा आणून घालतो तोही करार पुरा केला नाहीं. नंतर तुह्मी माझे गावीं आला होता. त्या वेळेस पाटील पांड्याचे समक्ष कबूल केलें कीं आठ दिवसांत खचीत आणून घालतों परंतु आणून घातली नाहीं त्याउपरांत हल्लीं आठ दिवस झालें मी व तुकाराम गिते व बाबू भावडे चिंचोलीकर असे त्रिवर्ग माझ्या बायकोस नेण्याकरितां आलो होतों त्यास तुह्मी साफ जबाब दिला कीं मी पाठवित नाहीं. सबब आह्मी गावाकडे परत गेलों. करितां या नोटिसीनें कळवितों कीं, ही नोटिस पावल्यापासुन १५ दिवसाचे आंत माझी बायको माझे घरीं आणून घालावी. असें न केल्यास रीती प्रमाणें सरकारांत तुह्मावर फिर्याद करून या नोटिशीचा खर्च व फिर्यादीचा खर्च तुह्मापासून भरून घेण्यांत येईल बारा महिने माझी बायको तुह्मी आपले घरीं ठेविली आहे. तिचे अन्नवस्त्राबद्दल मी जबाबदार नाहीं. कळावें. तारीख १३ माहे जून सन १८७८ इसवी.

(सही) चिंतामण वल्लद भगवा
गिते निशाणी खद
हातची असे.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये

देऊळगाव राजा ता. ९।६ ७८.

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस:—

वि. वि. अलीकडे कायद्याचें स्वरूप फार कडक झाल्यामुळें आपला आमचा पत्रव्यवहार बंद आहे. आह्मी लिहूं एक व अलीकडील सुशिक्षित लोक त्याचा अर्थ करतील एक या भीतीनें मन पूर्वींप्रमाणें नवल विशेष लिहिण्याला धजत नाहीं. खालीं लिहिलेला मजकूर कांहीं कोण्या व्यक्तीला लागून नाहीं यास्तव त्याचा अव्हेर न करावा.

या प्रांतीं उष्णतेचा कडाका फारच भयंकर आहे. पाणी पिण्यास देखील मिळण्याची मुष्कील. अन्नाची महर्गता इतकी झाली आहे कीं लोकांस मोठे कष्ट करून चार चार दिवस अन्नाची गांठ पडत नाहीं. आकाबाइची स्वारी अशा वेळेस प्रसंग साजरा करण्याकरितां कां आली नाहीं ह्मणून लोक आश्चर्य करीत होते. पण वेळेचें महत्व पाहून त्यांनींही झडप घातली. लोक फार त्रासले आहेत. एक वेळ भेट झाली ह्मणजे पुन्हां होईल किंवा नाहीं याचा भरवसा राहिला नाहीं. अशा प्रसंगीं देऊळगावकर जनू लोक आपली धर्म बुद्धी फार चांगल्या रीतीनें दाखवितात याचे एक दोन मासले दाखवितों.

एक पांथस्थ भिक्षुक धर्मशाळेंत बाखा होऊन मरण पावला तो संध्याकाळपर्यंत तसाच पडला. त्याला कोणीही ब्राह्मण नेण्याला तयार होईना. शेवटीं अन्य जातीच्या हातानें त्याला दहन देण्याचा विचार झाला पण दैवयोगानें एथील पाटील ब्राह्मण असल्या कारणानें त्यानें तसा प्रकार होऊं दिला नाहीं.

खुद्द गावच्या रहाणाराची तर या पेक्षां फार दशा. कोणी मृत झाला कीं त्याच्या जवळ फक्त त्याची जिव्हाळ्याची माणसें (कोणी असल्यास) सांपडणार दुसरें कुत्रें देखील नाहीं. ते त्या प्रेताजवळ बसून सगळा वेळ रडण्यांत घालवितात शेवटीं थकून आपणच तजवीज लावितात.

गावांत ब्राह्मणाची कमताई ह्मणावी तर कोणी चार चार कवड्या दक्षिणा देतो अशी वदंता कानीं पडतांच पुढचें ताट एकीकडे झोकून देतील आणि धावतील व वाटणाराला आठ आण्यावर ज्यास्ती सुद्धां खर्च पाडतील इतकी तर त्यांची संख्या. पुणें वगैरे ठिकाणीं अशा प्रसंगीं किती उत्तम सोयी केल्या आहेत! ते काय अज्ञान? आमचे देऊळगावकर किती झाले तरी सज्ञान!

काय हो एडिटरराव, आह्मी वर सांगितल्या कठिण प्रसंगीं सरकारांत मजुरी सरकारी निरखानें चुकवून दिली तर मग कां हो ब्राह्मण मिळण्यास हरकत पडेल काय? पण असा प्रसंग येण्यापूर्वी आमच्या एथील शिष्ट या बाबतींत खल मचवून नीट व्यवस्था करतील तर बरें, असें मला वाटते. श्रीव्यंकटेशजीच्या कारभाऱ्यांची ब्राह्मण समुदाय अंकित करण्याची शैली व शिष्ट ह्मणविणारे लोकांचा आपलपोटेपणा वगैरे गोष्टीची माहिती पुढच्या भेटीला मिळेल.

आमच्या एथील डाक्टर कोणी बोलाविले असतां तत्काल रोग्याला औषध देण्याला जातात. स्वभावानें फारच गरीब. फी दिलीच पाहिजे अशी त्यांची इच्छा नाहीं. रोग्यानें औषधोपचार करून बरें व्हावें यांतच ते संतोष मानितात. अशाश्वत धनावर असावी तर अशीच दृष्टी असावी. त्यानां कांपौंडरही योग्य मिळाले आहेत. कळावे लोभ करावा ही विनंती. ता० ९ जून सन १८७८ इसवी.

एक क्ष

## वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ वद्य २ शके १८००

## पोस्टाकडील सोयी.

इंग्लिश सरकारचे राज्यांत बहुत गोष्टीच्या सोई पहिल्यापेक्षां उत्तम झाल्या आहेत, त्याचप्रमाणें टपालाची सोय उत्तम असून तींत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे हें पाहून आह्मास संतोष होतो. दुसरे तारखेच्या आमच्या पत्रांत पोस्टाकडील एक जाहिरात छापिली आहे ती वाचणारांचे पहाण्यांत आलीच असेल. तींत नवीन चार गोष्टी आहेत त्या ह्या:—

१. पत्र किंवा पार्सल याचा विमा उतरणें.

२. पार्सलांतील मालाची किंमत वसूल करणें.

३. रजिस्टराची पावती देणें.

४. टपालांत पत्र वगैरे टाकण्याचा दाखला देणें.

या गोष्टी सुरू होऊन बरेच दिवस झाले आहेत पण लोकांस अजून त्यांची चांगली माहिती झालेली नाहीं ती व्हावी व सर्वत्र या गोष्टी अमलांत याव्या ह्मणून टपालखात्याचे मुख्याधिकाऱ्यानीं जाहिरात दिली आहे तर लोकांनीं या गोष्टीपासून आपणास उपयोग करून घ्यावा हें योग्य आहे.

विमा उतरण्याची पहिली गोष्ट अशी आहे कीं, कोणास मोलवान जिन्नस सोन्यारुप्याचे दागिने, जवाहीर, नोटा वगैरे एका ठिकाणाहून दुसरे ठिकाणीं पाठविणें असल्यास त्यांनीं त्या वस्तू टपालांतून पठवून मालाच्या किंमतीवर शेकडा आठ आणे विम्याची फी भरावी ह्मणजे पोस्टाचे अधिकारी काळजीपूर्वक खबरदारी घेऊन तो जिन्नस ज्याचे हातीं द्यावयाचा त्यासच पोंचवून त्याची पावती आणून देतील. व मध्यंतरीं गहाळ झाल्यास सर्व किंमत भरून देतील. ही सोय फार उत्तम आहे. वाटेनें जड जोखीम बरोबर नेणें मोठें धोक्याचें असतें. आगगाड्यांतून वारंवार चोऱ्या होतात, तशीच रस्ते लुटीचीही बोभाट आपण वारंवार ऐकतों. व द्रव्याकरितां प्राण घात झाल्याच्याही गोष्टी आपण ऐकिल्या नाहींत असें नाहीं तर पांच रुपये खर्चिल्यानें आपल्या हजार रुपयाच्या वित्ताचें जोखीम सरकार आपणावर घेतें ही गोष्ट लहान सहान नाहीं. सबब मोलवान जिन्नस असे पाठवीत गेल्यानें चोऱ्या होण्याचें व जीवास अपाय होण्याचें भय कमी होईल यांत संशय नाहीं. आतां सरकारचे टपालखातें भरवशाचें तर आहेच पण या नव्या जोखमाकरितां सरकारानें नवी विशेष तजवीज काय योजिली आहे ती समजली नाहीं. चार आणे फी घेऊन सरकार पत्र रजिस्टर करवितें त्यांतून केव्हां केव्हां नोटी वगैरे चोरीस जातात असें ऐकण्यांत आहेच तेव्हां आठ आणे फीवारी शंभर रुपयाचा लोकांचा माल भरून देण्याचें सरकारानें पतकरलें आहे त्या अर्थी विशेष तजवीजही सरकारानें केली असेलच. जाहिरनाम्यांत लिहिलें आहे कीं टपालवाले पत्रांत माल काय घातला आहे ते पहाणार नाहींत. योग्य रीतीनें पत्र बंद केलें आहे कीं नाहीं व त्यावरील मोहरा शाबीत आहेत कीं नाहीं एवढेंच काय तें टपालवाले पहातील व आंतील माला बद्दल मालकाचा प्रतिज्ञालेख घेतील ह्मणजे झालें. यांत कोणी मालक लबाडीनें थोडा माल पत्रांत भरून अधिक किंमतीचा लिहून देईल तर त्यावर फौजदारी मुकदमा होईल असें लिहिलें आहे. आतां जसा मालकाचे कपटा बद्दल मालकावर फौजदारी मुकदमा होणार तसा पोस्ट खात्याकडील कोणी त्यांतील माल चोरल्यास त्यावरही फौजदारी मुकदमा होईल हें उघड आहे. पण कोणी पक्के बंदोबस्तानें माल लांबविला व आपण केंदेंत जाण्यास सिद्ध झाला तर त्याजबद्दलचें नुकसान सरकारास सोसावें लागेल असें या गोष्टीवरून होतें सबब ठिकठिकाणच्या पोस्ट वाल्यांच्या हातीं तो कागद जाण्याचा नसेल व त्यांत काय आहे ही गोष्ट अत्यंत गुप्त रहाण्याची असेल ह्मणूनच सरकारानें हो जोखीम पतकरिली असें आह्मांस वाटतें. आमची इच्छा आहे कीं, हा ठराव सरकारास व लोकांस चांगला फायदशीर होऊन याची प्रवृत्ति पुष्कळ पडो.

दुसरा ठराव पार्सलांतील मालाची किंमत ज्याच्या नावेंच पार्सल असेल त्याजपासून मागून घेऊन नंतर पार्सल द्यावयाचा हाही ठराव चांगला आहे व याजपासून व्यापारास मोठी सोय आहे याजबद्दलचें विवेचनगुदस्त साली ता. १६ मा. डिसेंबरच्या अंकांत आह्मी केलें आहे तें वाचकांच्या लक्षांत असेलच.

तिसरी गोष्ट रजिस्ट्याची रजिस्टर फीच्या आणे देऊन शिवाय एक आणा दिला तर ज्याचें त्यास रजिस्टर पोंचवून त्याचे सहीची पावती सरकार मालकास आणून देतें प्रथम नुसती च्यार आणे फी घेत होते तेव्हां पावतीवरील सहीच्या शोधासाठीं टपाल आफिसांत जावें लागत असे. व अडाणी आणि गोरगरीब यांची दाद न लागल्या मुळें त्यास मोठी गैरसोय होत असे. ती या नव्या एक आण्याच्या ठरावानें बंद झाली. ह्मणजे आतां आपल्या घरीं आपणास रजिस्टर पोंचाविल्याची पावती सरकार आणून देईल व त्या प्रमाणें हल्लीं वहीवाट चालू झालेलीही आहे व तेणेंकरून बहुत लोकांची मोठी सोय झाली आहे.

चवथी व शेवटची गोष्ट त्या जहीरनाम्यांतील अशी आहे कीं, पोस्टांत कोणी पत्र पाठविलें व तें रवाना झालें किंवा मध्यंतरीं गहाळ झालें याचा शोध लागावा यासाठीं पत्राबरोबर त्या पत्राचे माहितीचा एक कागद पाठवावा व त्याला अर्धे आण्याचा स्टांप लावावा ह्मणजे पोस्टाकडील कामदार त्याजवर पोस्टाचा शिक्का मारून देतील ह्मणजे समजावें कीं, आपले माणसानें तें पत्र मध्ये कोठें टाकिलें नाहीं टपालांत टाकिलें. हीही व्यवस्था वाईट आहे असें नाहीं. व पुष्कळास पुष्कळ प्रसंगी या ठरावाचा उपयोग करून घेण्याचें कारण पडेल व त्यांनीं त्यावेळेस अर्धे आण्याकडे पाहून तसें करण्यास चुकूं नये असें आमचें मत आहे.

याप्रमाणें च्यार नवीन सोयीविषयीं आह्मी सांगितलें. आतां जुन्या व्यवस्थेंत एक फार मेसेंजरची सोय चांगली नाहीं तिजकडे सरकारानें विशेष लक्ष्य देऊन खेड्यापाड्यांतील लोकांस पत्रें वक्तशीर मिळत जातील अशी तजवीज लौकर व अवश्य करावी. वऱ्हाडांतल्या वऱ्हाडांत कित्येक लोकांची आमच्याकडे गाऱ्हाणीं आहेत कीं, कधीं कधीं तीन आठवडे आमचीं वर्तमानपत्रें त्यांस पोंचत नाहींत

व अशीं कांहीं गान्हाणीं मागें आली तो स्ट खात्याच्या अधिकाऱ्याकडे दिलेली हीं आहेत परंतु त्या विषयीं काय विशेष व्यवस्था झाली तो आह्मांस समजली नाहीं. पांच हजार मैलांवरील विलायतच्या डाकेंतील पत्रें विसावे दिवशीं मिळावी. आणि इकडे क्वचित वीस कोसावरही विसाहून अधिक दिवस लागावे हे किती वाईट आहे याची कल्पना करवत नाहीं. सबब रूरल मेसेंजरच्या कामांत सरकारानें सक्तीची कांहीं नजर पुरविली पाहिजे. व ज्या त्या आठवड्याचें वर्तमान पत्र त्या त्या आठवड्यांत लोकांस पोंचलें पाहिजे असें सरकारानें अवश्य करावें. मागें एकवेळ आह्मांस अशी [illegible] मिळाली होती कीं, ज्या ज्या तालुक्याचा जेवढें जेवढें उत्पन्न आहे तेवढ्या मानानें एक किंवा दोन रूरल मेसेंजर सरकारानें ठेविले आहेत सबब चालू तजविजीहून ज्यास्त तजवीज कांहीं होऊं शकत नाहीं. असें कां? सरकारच्या पोस्टाच्या खात्यांत एकंदरींत कांहीं तोटा नाहीं असें वर्षीक रिपोर्टावरून हमेशा दिसून येते. तर इतर ठिकाणचे अधीक उत्पन्नांतून अधीक मेसेंजर ठेवून लोकांची गैर सोय सरकारानें कां काढून टाकूं नये? व उत्पन्न कमी होतें याचें कारणही कांहीं अंशीं हल्लींची अव्यवस्था हेंच आहे.. कां तर पत्रें वक्तशीर पोंचण्याची आशा नाहीं ह्मणून लोक पत्रें लिहीत नाहींत सबब सरकारानें या गोष्टीकडे कृपेचें लक्ष्य पुरवावें व लोकांची सोय करावी असें आमचें आग्रह पूर्वक सरकारास सांगणें आहे.

## तुर्कस्थानचे सुलतान व काबूलचे अमीर.

मिरत एथें लारेन्स ग्याझेट नावाचें एक मुसलमानी वर्तमानपत्र निघत असतें त्यांत काबूलचे अमीर व तुर्कस्थानचे सुलतान यांचा पत्रव्यवहार ह्मणून एक मजकूर छापला आहे व त्याचे बहुत मुसलमानी पत्रांत उतारे झाले सबब त्यांत काय आहे तें इंग्लिश वाचणारास कळावें या हेतूनें टाइम्स पत्रांत त्याचें भाषांतर केलेलें पाहून आह्मी आपले वाचणारांसही त्याची सरणी कळावी ह्मणून त्यांतील हशील घेतों. त्याचे खरेपणाविषयीं आह्मास कांहीं माहिती नाहीं. पण याप्रमाणें घडलेली गोष्ट असेल तर काबुलचे अमीर आमच्या इंग्लिश सरकाराविषयीं दुष्टबुद्धीचें मत बाळगतात हें पाहून वाईट वाटतें. व अशीच त्यांची खरोखर बुद्धी असेल तर त्यांच्या राज्याची धडगति रहाणार नाहीं असें आह्मांस खास वाटतें. तुर्कस्थानच्या सुलतानांचे इंग्लिश सरकाराविषयींचे विचार फार उत्तम आहेत व त्यानें अमिरास बोध केला आहे तो त्यानें अवश्य गृहण करण्या जोगा आहे. ऐन अणीबाणीच्या प्रसंगींही सुलतानाची बुद्धी आमच्या सरकाराविषयीं अढळ राहिली हेंच त्यांच्या राज्यास चांगली मजबुदी रहाण्याचें सुचिन्ह होय. व याचें योग्य फल त्याला मिळाल्यावचून रहाणार नाहीं. आतां तो पत्रव्यवहार एथें घेतों:—

अमीराचें सुलतानास पत्र.

आपणाकडून आपले वकील आमचे प्रांतांत येऊन आह्मास भेटून गेले. ही थोरवी आपण आह्मास दिली याकरितां ईश्वराचा स्तव करितों. कृपासागर परमेश्वराचें छत्र आपणावर अक्षय असो व मुसलमान लोकांचें वैभव सर्वकाळ प्रकाशित राहो. मुसलमान लोकांचें राज्य हें मुसलमान लोकांचे धर्मास स्तंभरूप आधार आहे. हें सर्वांस माहित असलें पाहिजे. इंग्लिश लोकांविषयीं जें आपणाकडून लिहून आलें होतें त्याचा जबाब तेव्हांच देण्यांत आला. युरोपांतील हल्लीच्या राजकीय प्रकरणाविषयीं आह्मास तथ्य समजणें अवघड आहे याबद्दल आज आपणास पत्र लिहून कळविणें अह्मास अवश्य वाटलें. नुकतेंच अह्मी ऐकिलें कीं, रशियन फौज तुमच्या राजधानी जवळ येऊन ठेपली व इंग्लिश सरकार जें तुह्मास दोस्त ह्मणत होते त्यांनीं तुह्मास कांहीं मदत केली नाहीं. व ते तुमचा पक्ष धरितील असें आह्मास वाटत नाहीं. आह्मी त्यांनां बरेच दिवस जाणून आहो व ह्मणूनच त्यांना अह्मी जवळ करीत नाहीं. रशियन लोक शूर आहेत. व त्यांशी तुह्मी सख्य ठेवा. इंग्लिशावर अमचा विश्वास नाहीं. व आह्मी आपल्या अशा मताबद्दल जें प्रथम पत्र आपणास पाठविलें त्यावरून आपणस राग आला असेल. पण आतां आपणास या गोष्टीचा प्रत्यय आला आहे व यामुळेंच आह्मी त्याशी स्नेहसंबंध ठेवूं इच्छित नाहीं. ते आपला शब्द राखित नाहींत. आह्मांशीं जर ते विश्वासानें वागते तर सर्व गोष्टी चांगल्या सुरळित झाल्या असत्या. परंतु त्यास आपल्या बळाचा व राज्यविशालतेचा मोठा गर्व आहे. त्यामुळें ते आह्मास तुच्छ मानितात कांहीं दिवसांमागें रूस लोकांचा वकील आमचे राजधानीस आला होता त्याचें संभाषणावरून आह्मास असें दिसून आलें कीं रशियन लोक इंग्लिशांपेक्षां फार सिधे आहेत. याकरितां आमची आपणास सल्लाह आहे कीं, तुह्मी इंग्लिशांस सोडून रशियाशीं सख्यत्व वाढवावें. याहून अधिक आपणास कांहीं मांगणें नाहीं. आपल्या फौजा व महमदी राज्य याचें परमेश्वर सर्वकाल रक्षण करो.

काबूल, तारीख १० मोहरम सन १२९५ शनिवार. } शियरअली महमदाचे तक्ताचा ताबेदार

या पत्रावर सुलतानानें जबाब दिला तो

सुलतानाचें अमिरास उत्तर.

आपलें पत्र पोचलें व सर्व मजकूर लक्षांत आला, इंग्लिश लोकांविषयीं आपण जें मत कळविलें तें आह्मांस अगदीं मान्य नाहीं. आजपर्यंत इंग्लिशांचे हातून आमचें कांहीं वाईट झालें नाहीं व आमचे वाड वडीलांसही त्यां विरुद्ध बोलण्यास कधीं कांहीं कारण झालेलें नाहीं. आह्मास हें ठाऊक आहे कीं, इंग्लिश लोक आमचे बाजूस येऊन आह्मांस लढाईंत मदत करितील असा बहुत लोकांचा सर्वसाधारण समज झाला होता पण ही लोकांच्या समजुतीची चूक आहे. आमचे सरदार लोक बाह्यतः कांहीं मदत पाहिजे असें इच्छित नव्हते. युरोपांतील कांहीं राजानीं रशियास आंतून गुप्त मदत केली, व आमचे संस्थानींकानीं आह्माशीं कृतघ्नतेची वर्तणूक केली हेंच आह्मावर प्रसंग गुजरण्यास कारण झालें आहे असें आह्मी समजतों. एकटे रशियन लोकच जर आह्मावर येते तर त्यांच्या फौजा कानस्टांटिनोपलचें मैदान कधीं न पहात्या असें आह्मी पक्कें समजतों. पण हें सर्व ईश्वरी इच्छेचें कृत्य होय ह्मणून आह्मी तिला अनुसरतों. तह अजून पुरा झाला नाहीं. आपणास आह्मी सला देतो कीं, आपण इंग्लिश सरकाराशीं स्नेहसंबंध अधिक चांगला राखावा. रशियन लोक येऊन तुह्मास जें सांगतात त्यावर इतबार ठेवूं नये. आपलें व इंग्लिश सरकारचें रहस्य बिघडण्याचें मुळ कारण आह्मांस ठाऊक आहे व तें मूळ आह्मी मध्यस्थ होऊन मोठ्या संतोषानें अजिबात नाहींसें करूं शकू. सबब आपण आमची सूचना ऐकावी अशी आमची इच्छा आहे इतक्याउपर आपण आपले स्वतांचे मालक आहा. ईश्वराची स्तुती असो.

तारीख २५ मोहरम सन १२९५ हिजरी. } हनर्न कदम अबदुल हमीर खान.

हीं दोन्ही पत्रें वाचकांपुढें ठेवल्यावर ही आह्मी पुन्हा ह्मणतो कीं असले राजकीय पत्रव्यवहार बाहेर पडण्याचा संभव नाहीं सबब ते बातल असावेत आणि कदाचित ते खरें असतील तर काबूलचा अमीर आमच्या सरकारास योग्य प्रकारें जाणत नाहीं. व तो अजूनही अशीच बुद्धी धरील तर शासन पावल यांत संशय नाहीं.

## वऱ्हाड.

**पर्जन्य**— कालपासून सुरू झाला ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. अली कडे दोन तीन दिवस त्याचीं चिन्हें होऊं लागलीं होतीं त्यावरून तो लवकर कृपा करील असें वाटत होतेंच. मुंबईस, पुण्यास, सोलापुरास, साताऱ्यास, कोल्हापुरास वगैरे पाऊस पडल्याच्या या आठवड्यांत खबरा आल्या आहेत.

**वाखा**—पर्जन्य अजून चांगला लागला नाहीं. यामुळें वाख्याच्या उपद्रवास बराच जोर असल्याचीं बाहेरून बरींच वर्तमानें येतात. व या तालुक्यांत कळंबेश्वर ह्मणून गाव आहे तेथेंही सात आठ दिवसांत हा उपद्रव सुरूं झालेला आहे. परमेश्वर तर्थ लवकर शांति करो.

**पाणी**—अकोल्यास पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय होत चालली होती झिरे व थोड्या विहिरी यांजवरच गुजराण असून पाळी पाळीनें पाणी भरण्यास फार त्रास पडे असें पाहून लोकलफंडकडील ओव्हरसियर व म्युनिसिप्यालिटीचे सेक्रेटरी रा. रा. सदाशिव विष्णु भागवत यांणीं थोरल्या धरणांतील पाणी सोडविण्याची तजवीज मोठ्या खटपटीनें केली. तेणें करून या आठवड्यांत नदींत जागोजाग मुबलग पाणी होऊन लोकांस मोठें सौख्य झालें आहे या तजविजीबद्दल आह्मी सदाशिवराव यांची तारीफ करितों. नदींत पाणी येतांच लोक तें धुण्यानें व गुरें आंत नेण्यानें वगैरे खराब करूं लागले होते त्याचाही बंदोबस्त सदाशिवराव यांनीं ऐन उन्हांत वेळोवेळां नदीवर जाऊन चांगल्यप्रकारें केला हें ऐकून आह्मास संतोष वाटतो.

मि० सी चोकलिंग इंजिनियर या खात्याकडील सब ओव्हरसियर यांच्या नोकरीची यापुढें गरज नाहीं ह्मणून त्यांस कमी केल्याबद्दल पहिले तारखेचे रेसिडेन्सी आर्डरमध्यें प्रसिद्ध झालें आहे हे गृहस्थ या खात्यांत २४ वर्षें नोकर आहेत व ते आपले काम बरे रीतीनें करीत असून त्यांच्या बढतीविषयीं ही एक्झिक्युटीव इंजिनियर यांनीं एक दोन वेळा शिफारसी केल्याचें ऐकण्यांत आहे. तर इतक्या जुन्या काळच्या नोकरास पेनशन वगैरे कांहीं न देतां एकदम कमी करण्याचें काय कारण असेल तें समजत नाहीं. त्यांकडे कांहीं दोष नसेल तर अलिशान. रेसिडेंट साहेब त्यांवर मेहेरबानीची नजर पुरवितील असें आह्मी इच्छितों.

आमचे प्रसिद्ध मद्रासी ब्यारिस्टर रा. रा. लक्ष्मीपति नायुडू या प्रांतास कंटाळले असें वाटतें. कारण उन्हाळ्याच्या सुटींत ते स्वदेशीं गेले आहेत व आतां तिकडून त्यांचा परत येण्याचा मानस दिसत नाहीं, असें त्यांचे सामान सर्व विकण्याची तजवीज चालू आहे, त्यावरून वाटते.

रा. रा. रावजी भवानराव पावगी बी. ए उमरावती हायस्कुलांतील असिस्टंट मास्तर राजीनामा देऊन मुंबईस ला क्लासांत अभ्यास करण्या करितां जाणार. हे गृहस्थ हुशार असून स्वभावानें फार चांगले आहेत. हे थोडेच दिवस वऱ्हाडांत राहून परत चालले याबद्दल आह्मांस वाईट वाटतें.

मे० दस्तुर बहिमनजी साहेब यांची खामगावचे स्माल काज कोर्टावर नेमणूक झाल्याप्रमाणें ते आज तिकडे जाणार आहेत. असें ह्मणतात कीं, आक्टोबर महिन्यांत मि० डनलप साहेब हैदराबादहून खामगावास येतील व तोंपर्यंत यांनां तेथें रहावें लागेल. बहिमनजी साहेबांचें अकोल्याहून जाणें बहुत लोकांस हळहळवित आहे परंतु सरकारी कामापुढें इलाज नाहीं.

असें ऐकण्यांत आलें आहे कीं, नबाब शाबुदीन साहेब यांची जागा मे. अबदुल हक्क साहेब पारजादे कर्नाळकर यांस मिळणार. हे बरेच दिवस वऱ्हाडांत राहून आतां कामा काजांत अनुभविक झाले आहेत तेव्हां त्यांस ही जागा मिळणें वावगें नाहीं.

अल्पवयी मुलांबद्दलचा सन १८३१ चा आक्ट ९ हा वऱ्हाडास लागू केल्याबद्दल जाहीरनामा प्रसिद्ध झाला आहे.

वऱ्हाडांतील सेंट्रल जेल यांची व्यवस्था बरोबर नाहीं असें अलिशान रेसिडेन्ट साहेबांचे नजरेस आल्यावरून ते कांहीं नवीन व्यवस्था करणार असें वर्तमान आहे.

## वर्तमानसार.

भामो एथील इंग्लिश सरकारचे रेसिडेंट मि० कूपर साहेब यांवर त्यांच्या पहाऱ्यावरील नाइकानें गोळी घातली. हा पहारा शीक लोकांचा होता त्यांत एक जमादार, दोन नाईक व वीस शिपाई होते. जमादाराला पगार दरमहा ५०, दरएक नाइकाला २५ रुपये, व दरएक शिपायाला २० रुपये होता. ज्या नाइकानें साहेबावर हत्यार धरिलें त्यास त्याच्या कांहीं कसुरीबद्दल ५ रुपये दंड झालेला होता. याच गोष्टीचा सूड घेण्याकरितां त्यानें या दुष्टकर्मास हात घातला.

जर्मनीचे बादशहास पुन्हा कोणी गोळी घालण्याचा प्रयत्न केला व तो आत्मघात करीत होता त्यास पडकला आहे. बादशहाची प्रकृती सुधारत चालली आहे.

इंग्लंडाहून कांग्रेस करितां लार्ड बिकन्सफील्ड हे गेले त्यांनीं जावें न जावें अशीं दोन मतें पडलीं होतीं.

रशियाचे मुख्य प्रधान प्रिन्स गार्टचेस्काफ आजारी होते त्यांची प्रकृती बरी होऊन ते कांग्रेसकरितां बर्लिनास गेले व रशियाचे इंग्लंडांतील वकील कौंट स्कावलाफ हे त्यांच्या बरोबर गेले आहेत.

रशियनानीं तुर्कस्थानास किल्ले स्वाधीन करून देण्याविषयीं पुन्हा टुमणी लाविली आहे.

तुर्कस्थानांतील कांहीं बंडवाल्यांनीं अपराध क्षमा करण्याविषयीं सुलतानाकडे बोलणें लाविलें परंतु त्यानें मान्य केलें नाहीं

हिंदुस्थानांतून गेलेल्या फौजा माल्टा एथें सुरक्षित जाऊन पोंचल्या.

कदाचित आणखी ३०००० फौज हिंदुस्थानांतून मागविली तर तिचा तळ जिब्राल्टर एथें पाडावा असा विचार आहे.

मेजर ई डब्ल्यु वेस्ट सांगलीचे जाइंट अडमिनिस्ट्रेटर यांस महीकांठ्यास पोलिटिकल एजंट नेमिलें. आणि मेजर डब्ल्यु एफ वालेर तेथील अक्टिंग पोलिटिकल एजंट यांस सांगलीस नेमिलें.

जर्मनीचे बादशाहा अजारी आहेत तोपर्यंत त्यांचे चिरंजीव फ्रेन्डरिक विलियम हे राज्य कारभार पाहत आहेत.

तुर्कस्थानांत इंग्लिश वकील मि. लेअर्ड ह्मणून आहेत त्यांनां सिव्हिल नाइट ग्रांड क्रास आफ दी ब्वाथ अशी पदवी मिळाली,

जर्मनींत लोकसत्ताक राज्य व्हावें अशा मताची कांहीं मंडळी निघाली आहे ती राजास मारण्याचे वगैरे गुप्त बेत करिते सबब त्यांची धरपकड चालली आहे व त्या गोष्टीची कानफरन्स मध्यें वाटाघाटही झाली तर होणार आहे.

मि. श्रीकृष्ण शास्त्री तळेकर विद्यालयाचे ट्रान्सलेटर आपले कामावर रुजू झाले.

तुर्कस्थानच्या सुलतानानें आपला मुख्य वजीर रचदी पाच्छा यास बरतर्फ केलें व पुराज्य खात्याकडील प्रधान साफवेत पाच्छा यांस मुख्य प्रधान नेमिलें. व फास फोरम स्टांफ पाच्छा यास युध्द खात्याकडे प्रधान केलें.

के० डाक्टर भाऊ दाजीचे चिरंजीव व प्रो. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांचे जावई रा. रा. द्वारकानाथ भाऊ हे तापाचे आजारानें मरण पावले. यांचें वय १९ वर्षांचें होतें.

सिंधमधील लोकांचे द्राक्षाचे बाग लावण्याकडेस विशेष लक्ष लागल्याचें दिसतें. अनुभवावरून तिकडेस बिलायती व आरबी द्राक्ष चांगली पिकतात असें एका पत्रांत लिहिलें आहे. हा फायद्याचा धंदा आहे सबब लोकांनीं या कामीं खटपट केल्यास या आवश्य पदार्थाची इकडेस पुष्कळ उत्पत्ति होण्याचा संभव आहे.

कराची— म्युनिसिपालिटीनें पट्टी वाढविल्या मुळें तेथील खाटक्यानीं आपली दुकानें बंद करण्याचें कळतें- मांस व भाजी पाल्याचा भाव अतो चढल्यामुळे गोर गरीबांस फार आडचण झाली आहे. अलीकडेस म्युनिसिपालिट्या ह्मणा अथवा सरकार ह्मणा त्यांचे लक्ष उत्पन्न होण्याकडेस असतें, लोकांच्या स्थितीकडेस नसतें ही मोठी दुःखाची गोष्ट आहे.

वढवाण पासून भावनगर पर्यंत रेलवेचा मार्ग व्हावयाचा असून तो बांधण्याची सुरूवात झाल्याचें कळतें.

मध्य एशिआंत गेल्या सालीं पावसाची तूट पडल्यामुळे यंदा तिकडे दुष्काळ पडण्याचा संभव आहे.

तिबेटांत दुष्काळ पडण्याचा संभव आहे, धान्य अति महाग झाल्यानें या दोन वर्षांत सर्व एशिआखडांत थोडाबहुत दुष्काळ पडला याचें कारण तरी काय असावें

सिआम आडवरटैजर वरून —सिआमच्या राजाचें कुटुंब फारच मोठें आहे ह्मणून कळतें. हल्लींच्या राजाचे बडिलांस पंचीस बायका असून चव्यांशीं मुलें आहेत या वंशांतील दुसऱ्या एका राजास एकतीस बायका असून त्रेसस्ट मुलें होतीं. एके वेळीं या घराण्यांत एकाहत्तर राजपुत्र होते ह्मणून लिहिलें आहे. संतती व संपत्तीचा या घराण्यांत चांगला वास आहे असें ह्मटलें पाहिजे.

युरोपिअन लोकांच्या बायकांच्या मोठ्या वेण्या खोट्या केसांच्या असतात. या वेण्याकरितां चीन देशांतून केस बिलायतेस जात असतात ह्मणून कळतें. सन १८७५ त १,३३,३३३ पौंड केस विलायतेस गेले.

गेल्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेस इंडियन सिविल परीक्षा लंडन येथें झाली. परिक्षस सुमारें ३०० वर उमेदवार होते. नेटिव किती होते हें कळत नाहीं.

सुमारें दोन महिन्यापासून एडन जवळ एक लढाऊ तारू आणून ठेविलें आहे लढाई उद्भवल्यास रशिअन तारवांची खबर घेण्यास ठेवलें असावेंसें दिसतें.

फोकस्टन एथें जर्मन सरकारच्या लढाऊ लोखंडी जहाजांची टक्कर होऊन जें गलबत बुडालें त्याचें नांव "ग्रोसर फरकस" होतें या वर ४११८ टन माल ६ तोफा होत्या. याजवरील क्यापटन व ३०० खलाशी बुडून मेले. हें लढाऊ जहाज प्लीमौथ येथें जी लढाऊ जहाजें जात होतीं त्यापैकीं एक होतें असें लंडन येथील ता. १२ च्या तारेवरून कळतें.

ने. ओ.

## महात्मे सदा सारखे.

उदेति सविता ताम्रस्ताम्र एवास्तमेति च।
संपत्तौ च विपत्तौ च महतामेकरूपता ॥

" उदयकालीं जसा सूर्य रक्तवर्ण असतो तसाच अस्तकालींही असतो. संपात्ति आणि विपात्तिं ह्यांमध्यें महात्म्याची अंतःकरणवृत्ति सारखीच असते."

एका ग्रंथकाराचें प्रापंचिक सुखदुःखाविषयीं असें ह्मणणें आहे कीं, इहलोकीं सुखसंभोगार्थ मनुष्यास पुष्कळ वस्तु दिल्या आहेत. परंतु त्यास त्याहीपेक्षा दुःख अधिक भोगावें लागतें. वास्तविक पहातां सृष्टीचा प्रकृत रूप मंगल आणि हितावह असून मनुष्य जें सुख भोगतो त्यापुढें त्याचें दुःख कांहींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. तथापि संसारांत तापत्रय आहेच असें कबूल केलें पाहिजे. आणि त्यापैकीं कोन जरी अविचारी वर्तनामुळें प्राप्त होते तरी कांहीं प्रसंग मनुष्यास टाळतां येणार नाहींत असे गुदरतात. हे प्रसंग प्राप्त झाले अस्तां विपत्काल आला असें ह्मणतात. असा विपत्काल ज्यांस येतो ते बहुधा सर्व घाबरून जातात. पण कित्येक संकटें आलीं अ तां महात्मे धीर सोडीत नाहींत. ते विकृत कधींही होत नाहींत ऐश्वर्य आणि उदय यामध्यें त्यांस हर्ष होत नाहीं किंवा आपत्कालीं ते विषाद पावत नाहींत त्यांची पहिल्यापासून तयारी असते. अन्नादिकाने शरीर जसें मजबुदकरितात तसेंच ते, तप, भक्ति, धर्म यांहींकरून मन व अंतःकरण हीं बळकट करितात. आपणास सदा सुखी कां केलें नाहीं? दुःख ह्मणून वस्तु जगतांत आणिली तरी कशाला? आपणास आह्मो असें कां निर्मिलें? असें कुतर्क ते काढीत नाहींत. आपणास मार्गक्रमण करणें आहे त्यांत उंच नीच असणार असें समजून ते सावधगिरि ठेवतात. इतकेंही असून ठेंच लागली तर ते शहाणे होतात. दुःखास ते वैद्य मानितात. पहा, कितीही पाषाणहृदय मनुष्य असला तरी त्यास थोडासा ताप आला अस्तां त्याचें अंतःकरण कसें कोमल होतें व तो कसा सर्व वैरभाव विसरून कांहींवेळ तरी नवा मनुष्य होतो. दुःखानें हृदय तप्त पण तप्त सोन्याप्रमाणें शुद्ध होतें. विनाकारण त्रासल्यानें दुखणें न जातां उलटें कुपथ्य मात्र होतें, हें ते पक्कें जाणतात. मजवर का प्रसंग गुदरतात? असा प्रश्न न करितां प्रभूची इच्छा ह्मणून त्यांत ते शिरसा वंद्य करितात. ईश्वर त्याचा सर्व विश्वास व त्यावर ते सर्व भरिभार घालतात सबब आलेलें दुःख त्रासानें जसें तसें भोगतात असें नाहीं. पण त्या दुःखा पासून बोध घेतात. दारिद्र्य धननाश, मरण हीं त्यांस विपत्ति नव्हत. हाच त्यांच्यामध्यें विशेष. विपत्तीच्या कसोटीस ते उतरतात ह्मणूनच ते मोठे पदवीस, अकालिक मृत्यु वगैरे पाहून त्यांस खेद होतो, पण धीर ते कधींही सोडत नाहींत. ते काम क्रोधादि षड्रिपूंचे दास्य पतकरीत नाहींत. ते परमेश्वराच्याच संतर्गक असतात. मोठाही वारा आला असतां जशी डोंगराला बाधा होत नाहीं त्याप्रमाणें पर्वतप्राय अरिष्टांनीं गहजब केला तरी मोठ्या मनाचे पुरुष विकार पावत नाहींत. ते सदा प्रसन्न असतात, आणि त्यांची वृत्ति शांत असते, त्यांस सर्वच मंगल आणि शुभ दिसतें. सु. प.


## बुकविक्रीची जाहिरात.

आमचे छापखान्यांत खालीं लिहिलेलीं बुकें विक्रीस आहेत तीं रोख किमतीनें दिलीं जातील.

| बुकाचें नाव. | किंमत. रु. आ. |
|---|---|
| मुंबई इलाख्यांतील मुलकी सर्क्युलरें | ४ |
| क्रिमिनल प्रोसिजर टिपांसहीत | ४ |
| पोलिसाचे रूळ | ०२ |
| वसंतमाला | ०१० |
| रुक्मिणीहरण नाटक | १०४ |
| गोपिचद नाटक हिंदुस्थानी | ०१० |
| विराटपर्व नाटक | ०१० |
| हरिश्चंद्रसत्वदर्शन नाटक | ०१० |
| सुहास्यवदनः | ०८ |
| वालीवध नाटक | ०५ |
| मयूरकृत मंत्ररामायण | १०४ |
| सर्वसंग्रह वेगवेगळ्या कवींची आख्यानें भाग दुसरा | ०१२ |
| सर्व संग्रह वामन पंडित कृत भाग १ ला. | ०१० |
| ,, ,, भाग २ रा. | ०१० |
| चतुःश्लोकी भागवत | ०६ |
| नलाख्यान मोरोपंती आर्या | ०३ |
| सिंहासनबत्तिशी हिंदुस्थानी | ०१२ |
| प्रायश्चित्तेंदुशेखर | ०१० |
| रत्नमाला | ०५ |
| वेताळपंचविसी | ०४ |
| ध्रुवाख्यान | ००६ |
| हिंदुस्थानच्या स्थितीवर निबंध | ०१ |
| चक्रव्यूह | ०१०६ |
| व्यंकटेशस्तोत्र | ०१ |
| शिवसहस्रनामावली | ०२ |
| विष्णुसहस्रनामावली | ०२ |
| गायनप्रकाश | ०३ |
| रामनवमी कथा | ०१ |
| भूपाळ्या | ०१ |
| हरिपाठ | ००९ |
| हावर्ड कृत इं० तिसरे बुकाचें मराठी भाषांतर | ०१२ |
| धातुरूपावली | ०३ |
| लहान मुलाकरितां मूळाक्षरांच्या गंजिफा | ०२ |
| बालकाकरितां पहिलें पुस्तक | ०१ |
| अंकलिपी | ००९ |
| व्यवहारोपयोगी तारतम्य | ०३ |
| बालज्ञान | ०१०६ |
| हावर्ड कृत इं. १ले बुकाचें मभाषांतर | ०१०६ |
| प्राकृत आरत्या | ०१ |
| स्कुलहायलाग | ०१ |
| काव्यमाधुर्य | ६ |
| सौभाग्यरत्न | ०२ |
| नादारीचे नियम. | ०८ |
| कामेडी आफ एर्रर्स. | ०६ |
| वैद्यप्रकाश. | २०८ |


हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० २३ माहे जून सन १८७८ इसवी. अंक २५

## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचें अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| किरकोळ अंकास | ०४ |
| डांकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी यावी ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामेडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमचे छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्ध आणा पडल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

देवाचे उपकार हे, अमुचि जी
संपतत्समृद्धी भली,
ऐसें जाणुनि त्यानि शिल्प सदनें
देवालयें बांधिलीं ॥
त्यांते पाहति जे तयांस उमजे,
देवालयें आणली,
तद्रूयें समतोल येथ, समजा
ही भक्तिची हो सखी ॥ १०१ ॥
देवालयें लसति चित्रपताकिकानीं,
तत्कीर्तितें सतत कोंदिति नाकि कानीं
कीं नारद स्तवि सदा कविराज तीतें,
व्यापोनि मर्त्यभुवनास विराजतीतें १०२
प्राकार उंच अजरामर दीपमाला
त्या ठेंगणा गणिति उन्नतिशालि ताला ॥
सूर्योदयीं कलशगोपुर कांति फांके,
तेव्हां मणीमयहि त्या फणिलोक धाके
॥ १०३॥
सभा मंडपाची प्रभा वर्णवेना,
तिष्ठा सुधर्मेचि आकर्णवेना ॥
जयांच्या पुढें, ते जयां प्राप्त लोका,
तयांच्या न मुक्तीस कांहींच धोका १०४
पर्वी पर्वी उत्सव तेथें बहु होती,
नाना देशांतूनि पहाया जन येती ॥
गीतें, वाद्यें, प्रेमभरानें, भजनें हीं,
राहो देतीं भान तयांचें नच केहीं १०५
अनेक पुरुषस्त्रिया जरिहि संकुलीं राहती
तरी कलुषबुद्धिनें नच परस्परा पाहतीं ॥
समस्त जन केवळ प्रभुपदीं मनानें जडे
ह्मणोनि फळ इच्छित प्रभुहि दे तयां रोकडें
॥१०६॥
अन्योन्य जी प्रीति जिवाशिवांची,
ती होय हो माय महा सुखाची ॥
ती पाळिते नित्य उदेपुरास
ह्मणोनिच श्री करि तेथ वास ॥ १०७ ॥

आर्या.

नृपतिप्रतापपालित,
सर्वांचि ऐशा समृद्धीनें व्याप्त ॥
मेवाड देश त्याला,
कालवशें जाहली जरा प्राप्त ॥१०८॥
अवनिवलयामाजी जें तें गुणाढ्य उदेपुर
क्रमगत तिथें झाला तो भीमसिंग महीश्वर
*नवनवरसक्ष्माद्धीं श्रीशालिवाहन राट् शकीं
द्विजपातीनिं त्या केला राज्याभिषेकवरोदकीं
॥ १०९ ॥
शूरत्व नीतिनिपुणत्व, उदारता, हे,
ज्याला गुण क्षितिप तोचि यशास लाहे ॥
हे तोंड दाखविति न क्षण भीमसिंगा
तो यामुळेंचि पडला विजगांत बिगा
॥ ११० ॥
तो राजा अति भीरु निस्त्वपपणें
थोरासही मानिना,
दोरा साप गणोनि भी, करि जनीं
पोरापरी रोदना॥
कोरा कागद मूर्खतेस्तव करी
जो राजमुद्रांकित,
तोरा दाखवि कां न तस्कर अशा
मोरापरी नाचत ॥ १११ ॥
निद्राळू, अळशी अकाल कुपित
छिद्रा निजा पाहिना,
नास्यानें शिकवी गुरू परि तया
ज्ञास्यास तो साहिना ॥
मूढाचा सहवास त्या हित गमे,
गूढाकृती राहिना,
त्याचा मंत्र, तयास नायकिणिचा
माचा कधीं सोडिना ॥ ११२ ॥
अनृतप्रिय, नास्तिक प्रमादी,
अपमानास उपेक्षि, देववादी ॥
जरि इष्ट सुनिश्चित प्रधानें
कथिलें, तो तरि घेइनाचि कानें ११३
ज्याची कन्या होय कृष्णाकुमारी
तो हा राजा, हाच हो तीस मारी ॥
जेव्हां हा स्वीकारि सिंहासनातें
तेव्हां अप्रीति प्रजांच्या मनातें ॥११४॥

* शके १६९९ या वर्षी.

( पुढें चालू. )

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मनास मिळूनच असतील असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि वि. चार ओळी आपल्या पत्रीं छपण्याकरितां पाठवीत आहे त्या येत्या अंकी छपण्याची योजना कराल असी आशा आहे.

कसबे फत्तेखेडे ता. मेहेकर एथें वस्ती बरी आहे व लोकही बरेच आहेत तथापि सरकारचें एथें पोलिस स्टेशन असल्यानें सर्वपरी बंदोबस्त नीट झाला आहे. हल्लीं असलेलें चिफ कानस्टेबल रा. रा. लोचन सुकुल यांची अतिथि रीति पाहून फार आनंद वाटतो कारण यांची तारीफ घेण्या सारखी ह्मटली पाहिजे पोलिसचे काम नीट चालून लोकांस औषधोपचार पदरचा पैसा देऊन करीतात यांस नाडी परिक्षा व कालज्ञान चिकीत्छा चांगली आहे.

दुसरा प्रकार असा-पहाण्यांत आला कीं, इकडील जोतिषी लोकां पेक्षां त्यांची तारीफ विशेष दिसली कारण इकडील जोतिषास एकादा प्रश्न विच्यारीला तर तेवढाच सांगण्यास त्यांस पुष्कळ वेळ लागतो परंतु यास काय सांगावें. यांचे जवळ पन्नास मनुष्यें एकदम जरी आली तरि पन्नास मनुष्यांचे काम व प्रश्न ही ऐकून त्यांस लागलीच जबाब सांगतात व त्या सांगणाऱ्या लोकांसही बरीच प्रचिती येती जन्मपत्रिका वगैरे त्यांचे जवळ हजारो मनुष्याच्या येतात मुंबई, नागपुर वगैरे ठिकाणाहूनही कित्येकानीं जन्मपत्रिका पाठवून आपलें पुढचें भविष्य वर्तविलें आहे. साधारण रीतीनें त्यांचे बोलण्यांत आलें कीं, मृग, अरद्रा, पुनरवसु, या तिन्हीं नक्षत्राचे पाणी येणार नाहीं मात्र तीन पर्जन्य पडतील मग तीन नक्षत्राचे तीन पडोत अगर एकाच नक्षत्राचे तीन पडोत यावरून पहिले खरीपाचे पीक येणार नाहीं, असें दिसतें. पुढें पुष्य नक्षत्रापासून पर्जन्य बराच पडेल आणि कार्तीक वद्य पक्षापासून पौष मासांतही फारच पर्जन्य या वऱ्हाड प्रांतात होईल असें त्यांचे सांगण्यांत आलें.

हे चिफ साहेब जन्मकाल पाहून त्यांचें मरण देखील सांगतत त्याची कित्येकास प्रचिती आली आहे. कळावें तारीख १४ माहे जून सन १८७८ इसवी.

एक 'क्ष'

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

मांजर खेड्याहून वि. वि.— या खेड्यांत मजला रहाणे आहे या गावांत माझ्या सुद्धां ब्राह्मणाची ६ घरें आहेत त्यांत ग्रामण्य चालू आहे त्याची निवृती शहरांत कोणी शास्त्री असतील त्यानकडून होईल अशा आशानें हें पत्र लिहिलें आहे. एक ब्राह्मणाची बायको न कळत महाराचा तांब्या घेऊन नदींतील विहिरीचें पाणी काढून शौच्यास गेली आणि मग पुन्हा विहिरीचें पाणी काढून तिनें पाय धुतले परंतु चूळ भरली नाहीं त्याचें कारण विहिरीचें पाणी अगदीं गढूळ झाले होते, ह्मणून घरीं चूळ भरण्यासाठीं आली तेव्हां तो तांब्या महाराचा आहे असें समजलें मग लागलेंच तिच्या नवऱ्यानें तिला सचैल स्नान घातलें आणि ब्राह्मणाचें तीर्थ दिलें व विहीरही शुद्ध केली. हें पाहून या गावांत दुसऱ्या एका ब्रह्मणानें त्या ब्राह्मणास दूषित करून त्यास प्रतिबंध दिला याचें कारण तो असें ह्मणतो कीं त्याच्या स्त्रीला तीर्थ दिलें तसें तिच्या नवऱ्यास कां दिलें नाहीं? ह्मणून तो तीर्थ देणारा ब्राह्मण व तो गृहस्थ यास प्रतिबंध दिला आहे- या गोष्टींत तिच्या नवऱ्यास तीर्थ न दिल्यानें तो ब्राह्मण व तो मनुष्य शास्त्र आधारानें दोषी होतात कीं काय? व या दोन ब्राह्मणांचें मतांतून कोणाचें मत खरें व शास्त्रास अनुसरून आहे याचा खुलासा पत्रोत्तरीं केल्यास मोठी मेहेरबानी होईल. तीर्थ देणाऱ्या ब्राह्मणाचें ह्मणणें आहे कीं, पराशर ग्रंथ अध्याय ५ यांत सांगितलें आहे कीं, अनामिकाच्या भांड्याचा स्पर्श झाला तर त्याला तीर्थही नको. फक्त सचैल स्नान केल्यानेंच तो मुक्त होतो. कळावें. तारीख १४ माहे जून सन १८७८ इसवी.

एक
पत्र वाचणारा

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

पुसदाहून वि० वि० या आठवड्यांत हवामान फार उष्ण आहे. ववाची बिमारी उमरखेड परगण्यांत मोगलाईचे सरहद्दी कडून सुरू झाली आहे. मौजे साके नावाचे साधारण प्रतीचे खेडेगांव १५० घराच्या वस्तीचें आहे त्या गावचीं ९० मनुष्यें या रोगानें मरण पावली तसेच अबंतर खेड्यावर वाखा सुरूं आहे. उमरखेडावरही सुरूं आहे. आज पुसदांत ४ मनुष्यें आजारी होऊन मरण पावलीं व ३।४ बिमार असल्याचें ऐकतों. तर इकडे वाई साहेबाचा दवरा सर्व इलाख्यांत असल्यासारखें वाटतें.

प्रथम परजन्याचा काळ पडला नंतर अन्नाचा काळ पडला या दोन्ही काळापासून पुष्कळ मनुष्यांची दाणादाण झाली. त्यांत जे वाचले त्यांची राहिली साहिली तजवीज या वाईचे तडाक्यांत होत आहे. ईश्वरानें हा प्रसंग हिंदुस्थान देशावरचें आणला आहे असें नाहीं. बहुत देशावर बहुत प्रकारचीं अरिष्टें आहेतच. ह्मणजे अवांतर देशांत राजकीय शौर्यानें प्रजा नाश पावत आहे व या देशांत इंग्लिश सरकारचा बंदोबस्त चांगला असल्यामुळें प्रजा सुखी नांदते. तिचा ह्या योगें नाश होतो असें सरासरी अनुमान दिसतें. असो मर्जी प्रभूची. तिला इलाज नाहीं. नाहीं असें ह्मणावें, तर आहे. कोणता ह्मणाल तर हरीचें स्मरण व आपआपल्या धर्माचें आचरण, दया, क्षमा शांति हीं सतत जागृ·

त ठेवावींत ह्मणजे प्रभु कृपा करील. कळावें. तारीख ४ जून १८७८ इ-

एक पुसदकर.

नोटिस.

रा.रा. नारायण राव रामचंद्र देशमुख कसबे शिगाव याशी खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तुह्मी नोटिस दिली ती पावली. नोटिसींतील मजकूर खोटा आहे. तुमची आमची समाइक जागा मुळींच नाहीं ह्मणून काम बंद होऊं शकत नाहीं. वाटणी वडिलोपार्जित झालेली आहे. आतां वाटणी कशाची? तुह्मास वाटेल तर योग्य रीतीनें तजवीज करावी. कळावें. तारीख २१ जून सन १८७८ इसवी.

[ सही ] गोविंद अनंदराव देशमुख कसबे शिगाव

# वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ वद्य ८ शके १८००

## आरोग्य.

आरोग्यसंरक्षणाचे नियम जाणणें हें मनुष्यमात्राचें कर्तव्यकर्म आहे. आपल्यां लोकांत जुनी ह्मण आहे कीं, "रोग बरा करीत बसण्यापेक्षां मुळींच रोग न होऊं देणें चांगलें." ही अगदी यथार्थ आहे. आरोग्य बहुतांशीं सर्व देशांत सारखेंच आहे परंतु त्याच्या संरक्षणाचे नियम हवेच्या संबंधानें कांहीं निरनिराळे रीतीनें पाळिले जातात. उदाहरण युरोपियन लोक ज्या रीतीनें आपला आयुष्यमार्ग कंठितात त्या रीति नेटिवांस लागूं करितां यावयाच्या नाहीत ही गोष्ट कोणी नाकबूल करितील असें नाहीं. थंड हवेंत आरोग्यसंरक्षणाला शरीरव्यायाम अवश्यक आहे तितकाच तो उष्ण देशांत आरोग्यास बाधक आहे. रहाण्याचीं घरें देखील वेगवेगळ्या हवेला वेगवेगळ्या रीतीचीं पाहिजेत. थंड हवेच्या प्रदेशांत वाऱ्याची झुळुक घरांत शिरूं देतां कामा नये. व उष्ण देशांत ती पाहिजे तितकी घरांत शिरूं दिली तरी हरकत नसते. आपल्या देशांत वाऱ्याचा बंद आंत न शिरशीं घरें बांधणें, अंगावर पुष्कळ वस्त्रें घेणें, व सुग्रास अन्न खाणें याची विशेष अवश्यकता नाहीं याचें मुख्य कारण हेंच कीं, ईश्वरकृपेनें, आपला देश उष्ण असल्यामुळें यावाचून आपलें कांहीं अडत नाहीं. व देशांत बऱ्याच अंशीं दारिद्र्य असल्यामुळें या अदलाबदली कडे कोणी लक्ष्य देत नाहींत. वैद्यकसंबंधी कलकत्याचे जर्नल आह्मी पाहिलें.त्यांत डा० जी. सी. राय यांचा एक निबंध होता तो वाचून आह्मास फार संतोष झाला. हे आमचे स्वदेशीय डाक्टर असल्यामुळें आमच्या लोकांच्या आरोग्यविषय संबंधी यांचें ज्ञान युरोपियन डाक्टरापेक्षां अधिक खरें व अधिक मोलवान आपण समजलें पाहिजे. डा० राय यांणीं असें ह्मटलें आहे कीं पूर्वकालीं आमच्या हिंदु लोकांस वैद्यकसंबंधीं ज्ञान उत्तम होतें. व तें त्यांनीं धर्मकर्मांत अशा परीनें मिसळून दिलें आहे कीं, मनुष्यास न कळत तो धर्माचरण करीत असतां त्याच्या आरोग्याचें संरक्षण होतें. डा० राय यांचा निबंध अति उत्तम असून त्यांतील गोष्टी लक्षांत घेण्यासारख्या आहेत. त्यांतील तात्पर्य आह्मी नेटिव्हओपिनियनच्या आधारें एथें घेतों.

डा० राय यानीं मनुष्याच्या शरीराच्या आंतल्या भागासंबंधी व बाहेरच्या संबंधी मिळून सर्व रोगांचे दोन वर्ग केले आहेत. वाड वडिलांपासून संततीस आलेले रोग, दुष्टान्न सेवनापासून होणारे रोग, अथवा मलादिकांच्या अवरोधापासून होणारे रोग वगैरे प्रकार डा० राय यांनीं पहिले वर्गांत गणिले आहेत. यांतील कित्येक रोग जन्मापासून जरी आपणामध्यें असतात तरी ते आरोग्य संबंधी शास्त्रास अनुसरूनच असतात असें त्यांचें ह्मणणें आहे. ह्मणजे गंडमाळा हा एक क्षयोत्पादक रोग आहे, तथापि त्या मालाग्रस्त रोग्याला यथास्थित अन्न खावयास घातलें व समुद्र काठच्या स्वच्छ हवेवर ठेविलें तर त्याचा तो रोग दबला जातो. वंशपरंपरेचा गरमीचा रोग, ज्यांत बापाचे पातकाचें फल मुलास भोवत असतें तो, रोगकारक स्थितींत मुलांस अधिक नाशकारक होतो. अतिशय खादाडपणापासन वातरोग व संधीवात उत्पन्न होतो वगैरे प्रकार पहिले वर्गाचे रोगांत येतात.

आतां जे रोग टाळतां येतात त्यांची परिगणना दुसरे वर्गांत केली आहे. आपले श्वासोश्वासाच्या हवेंत, प्यावयाच्या पाण्यांत, अथवा खाण्याच्या अन्नांत रोगाचीं बीजें असतात ते रोग यांत येतात. जर आपण हवा, पाणी, व अन्न या तिहींच्या स्वच्छते विषयीं उत्तम काळजी घेतली तर या वर्गांतील पुष्कळ रोगांचा बंदोबस्त होईल. स्पर्शसंचारी रोगही या वर्गांत येतात व त्याचा प्रसार स्वच्छतेनें व दुर्गंधी नाशनानें कमी होतो. देवी, लोहितांग ज्वर, गोवर इत्यादि रोग हवेच्या द्वारें मनुष्याच्या रक्तांत प्रवेश करितात. हरएक झाडाचे बीजास अंकुर फुटण्याला जसा बरसातीचा वगैरे हंगाम असतो. तसाच रोगाचे बीजास फलद्रूप होण्याला विशेष कांहीं हंगाम असतो. कांहीं एका प्रकारच्या हवेंत, व कांहीं एक प्रकारच्या कालावधींत रोग वर्धनाचें काम जारी असतें. एप्रिल व मे महिन्यांत देवीचा आजार जास्ती फैलावतो व इतर महिन्यांत आलाच. तर तुरळक येऊन तो नाहींसा होतो याचें कारण हेंच आहे. सबब रोग बीजाची वर्धमान शक्ती, रोगास अनुकूल असा ऋतुकाल, आणि मनुष्याच्या शरीराची ठेवण या तिहीविषयींचा प्रकार या वर्गांत सांगितला आहे. जितका मनुष्य अधिक दुर्बळ तितका तो सुलभतन रोग होण्यास अधिक पात्र असा याचा नियम आहे.

स्पर्शसंचारी बहुत रोगांचा आरोग्यरक्षक उपायांनीं बंदोबस्त होतो. शहरांतील हवा बिघडली ह्मणजे रोग्यास त्या स्थलाहून दूर नेणें हितावह होतें. रोग्याच्या निजवयाच्या खोलींत मोकळी हवा खेळणें हें रोगबीजाची वर्धमान शक्ती नाहींशी करणें आहे. कोनाकोपऱ्यांतल्या घाणीपासून जो रोगविषार उद्भवतो त्यावर स्वच्छता हें उत्तम औषध आहे.

आतां राहिलेला भाग पुढील अंकांत घेऊ.

## वऱ्हाडप्रांत.

वऱ्हाडप्रांत परत मिळविण्याविषयीं सर सालरजंग साहेबानीं बहुत दिवस खटपट चालविली होती तिचा निकाल झाला कीं अल्पवयी निजाम सरकार वयांत येई पर्यंत या बाबदींत कोणी बोलूं नये. याजबद्दल मुंबईकडील इंदुप्रकाश व अरुणोदय पत्रांत इंग्लिश सरकारचे या कृतीविरुद्ध चर्चा झाली आहे व एथील उर्दूअखबारांत त्यांचें खंडण करून इंग्लिश सरकारच्या कृतीचें मंडण केलें आहे. हीं वाचकांच्या पहाण्यांत आलींच असतील. स्वदेशभूमीचा कळवळा बाळगून आपले हिंदुस्थानांत नेटिव राज्यें कायम रहावीं व त्यांचे मुलुख त्यांचे ताब्यांत असावे या धोरणानें व वर्तमानपत्राच्या स्वातंत्र्याप्रमाणें तिकडील लोकांनीं मत दिलें व एथील पत्रकर्त्यांनीं इंग्लिश सरकारास वाईट ह्मटलें नाहीं हीं दोन्हीही ठीकच आहेत. नवा प्रेस आक्ट झालेला माहित असतां व राजकीय व्यवहारांतील गौप्य आपणास चांगलें समजत नसतां अरुणोदय, इंदुप्रकाश यांनीं उगीच खरमरीत लिहिणें चांगलें नाहीं असें आह्मास वाटतें. पुण्यांतील किरण वगैरे पत्रांस समजुती मिळत आहेत हें तें ऐकत असतांही असें का करितात? उर्दूअखबारानें जें केलें तें देशकालप्रसंगास अनुरूप आहे, एवढेंच नव्हे तर खरोखर वऱ्हाडचा सन १८५३ साला पूर्वीचा अंमल आणि हल्लींचा अंमल यांतील फरक जे सहृदय पुरुष बारकाव्यानें पहातील ते खरोखरच असें ह्मणणार आहेत कीं, मोगलाईपेक्षां इंग्रजी राज्यांत रयतेची स्थिति पुष्कळपट सुधारली, देशांत आबादानी पुष्कळ झाली, व्यापाराच्या सोयी फार वाढल्या, रेलवे झाली, विद्यावृद्धी झाली, फार काय सांगावें मनुष्यांस मनुष्यपण इंग्लिश राज्याच्या योगानें आलें सबब त्यांचा अंमल या देशांतून जावा असें आतां कोणीही सुखेच्छु कबूल करणार नाहींत मग पत्रकर्त्यासारख्यानीं इंग्रज सरकारास नावाजू नये असें कोण ह्मणेल? तथापि अमका मनुष्य आपल्या मुलांना चांगला जपतो ह्मणून त्यानें आमचीं मुलें, त्यांस आह्मी चांगलें जपत नाहीं ह्मणून, आपल्या घरीं नेलीं तर ती गोष्ट जपण्याच्या दृष्टीनें चांगली आहे तरी आह्मास व तिऱ्हाइतास हक्काच्या दृष्टीनें आवडेल काय? आवडणार नाहीं हें खरें आहे, कारण त्या जपणारास पाहिजे त्यांचीं मुलें नेऊन त्यांस जपण्याविषयीं कांहीं अधिकार नाहीं; तसाच निजाम सरकारच्या वऱ्हाडप्रांतालाही इंग्रजानीं कराराची फेड होत असतां आपल्याकडे राखून ठेवण्याचा कांहीं अधिकार नाहीं सबब तो लवकर परत द्यावा असें कित्येकांचें ह्मणणें आहे व तसा प्रकार पाहिला असतां तो न द्यावा असें प. क. व दुसरे कोणाचेंही ह्मणणें नाहीं. व इंग्लिश सरकारही या कामांत कांहीं दंडेली करीत नाहीं असें विचारपूर्वक जाबजबाब पहातां सर्वांस कळून येईल. ते इतकेंच ह्मणतात कीं पूर्वींचे निजाम सरकारानीं जी वचनें दिलेलीं आहेत त्याविरुद्ध मागणी मागण्यास दिवाण वगैरे अनधिकारी आहेत सबब अल्पवयी निजाम सरकार प्रौढ झाल्यानंतर त्यांचें त्याविषयीं जें ह्मणणें पडेल तें ऐकून घेण्यांत येईल व त्याचा योग्य विचार केला जाईल. हिंदुस्थान सरकारानें दिवाण साहेबास जो जबाब सांगितला होता तो स्टेट सेक्रेटरीच्या अनुमता शिवाय सांगितला नसेल. मग आणखी हा प्रसंग उकरून काढून विलायतेहून तोच जबाब आणवून घेण्यांत मुत्सद्दी लोकांस काय विशेष वाटलें असेल तें असो. स्टेट सेक्रेटरीनीं पुन्हा हें प्रकरण उपस्थित करा असें दिवाण साहेबांस ह्मटलें होतें असें ह्मणतात पण पोलिटिकल खात्यांतील खऱ्या गोष्टी काय असतात त्या शब्दशः कोणास समजत नाहींत सबब ऐकिव गोष्टी वरून अशा नाजुक प्रकरणाची स्वैरपणें चर्चा करीत बसणें दिवसमानानें चांगलें नाहीं असें आह्मी पुन्हा एकवार ह्मणतों.

इंग्रज सरकार वऱ्हाडप्रांताच्या उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब ठेवून तो निजाम सरकारास प्रतीवर्षीं दाखवित असतें हें वाचकाना कळलें पाहिजे असें उर्दूअखबारकर्त्यांनी लिहिलें आहे पण सन १८६१ सालापासून आज १७ वर्षें ही वहिवाट तहनाम्यावरून बंद आहे. ही गोष्ट त्यांनांच कळलेली नाहीं असें वाटतें.

## सेंट्रल जेल.

एथील तुरुंगाविषयीं मुंबईच्या टाइम्स पत्रांत गेल्या आठवड्यांत कांहीं मजकूर लिहिला आहे तो असा:—

अकोल्याच्या सेंट्रल जेलमध्यें स्कर्वीचा आजार उद्भवून ६ कैदी मरण पावले. हा आजार वाईट प्रकारचे अन्नापासून होत असतो ह्मणून हैदराबादेहून रेसिडेंट साहेबांकडून अकोल्याच्या जेल आफिसरास मोठा टपका आला. मि० डेविस साहेब जेल सुपरइंटेंडेंट यांच्या कडील तें काम काढिलें. जेलाकडील कामदारांस पगार अगदी भिकार आहेत. सुपरइंटेंडेंट हे एकस्ट्रा असिस्टंट किंवा सिव्हिल सर्जन या पैकीं एकजण असतात व त्यांना त्यांचीं कामें पुष्कळ असल्यामुळें याकडे विशेष लक्ष देण्यास वेळ होत नाहीं व त्यांना या कामाकरितां अलावन्स महिना ७५ रुपये आहे. हेड जेलराला पगार १०० रुपये असून तो दीडशापर्यंत वाढत जाणारा आहे असिस्टंट जेलरास ६० रुपये पगार असून तो ७५ पर्यंत वाढता आहे. अकोल्यास नुकतेच ६ कैदी मरण पावले हे, गेल्या आकटोबरांत ४

कैदी पळून गेले होते हें, व उमरावतीच्या जेलांत एका कैदी जवळ बाटलीच्या कांचा सापडल्या, ह्या एकंदर गोष्टीवरून वऱ्हाडांतील जेलखान्याची नव्या तऱ्हेची कांहीं अधिक चांगली व्यवस्था करणें अवश्य आहे असें दिसून येतें. व या करितां स्वतंत्र एक सुपरइनटेंडेंट नेमिला जावा हें जरूर आहे.

आमचे ऐकण्यांत आलें आहे कीं, स्वतंत्र सुपरइंटेंडेंट नेमण्याचा विचार बरेच दिवस चालू आहे. व मि० डेविस साहेबाकडील हा अधिकार काढिला तो केवळ त्यांच्या कसूरीमुळें काढिला असें नसून ते उत्तम मेहनती व आपले कामांत योग्य लक्ष देणारे असे आहेत. तसेच जेलरही हुशार आहेत. सबब त्यांस जो टपका सदरील पत्रांत दिला आहे तो बरोबर नाहीं. याजबद्दल विशेष हकीकत लिहिण्यास आज जागा नाहीं सबब पुढें लिहू. तरी सुपरइंटेंडेंट यांस ७५ रुपये दिल्यानें चांगली व्यवस्था होत नव्हती असें कल्पून पांच सातशें रुपये पगाराचा एक स्वतंत्र आफिसर नेमण्या पेक्षां हा अलावन्स चांगला वाढवावा व जेलरचा पगार वाढवावा ही योजना अधिक चांगली आहे. आज पुष्कळ वर्षे जेलची व्यवस्था चांगली असून अलिकडे एक दोन गोष्टी जर गैर झाल्या तर त्यांचीं कार्यकारणें पाहिलीं पाहिजेत व त्यांविषयीं सबुरी केली पाहिजे. एकदम मोठा खर्च वाढविण्याचा विचार विशेष चांगला आहे असें नाहीं. मग सरकारास जें चांगलें दिसेल तें खरें.

## वऱ्हाड.

पर्जन्य अकोल्यास अजून पडत नाहीं ही मोठी दिलगिरीची गोष्ट आहे. दररोज मेघराज मोठा डौल घालतात पण निष्फळ परत जातात. आतां लवकर कृपा करितील तरच बरें आहे. काल परवा दक्षिण भागास चांगला पाऊस पडला असावा, कारण नदीला काल दोन प्रहरीं च्यार फूट पाणी आलें. हें दुःखांत एक मोठें सुख झालें.

मे. कमिशनर साहेबांची स्वारी अकोल्यास लवकरच येणार असें वर्तमान आहे.

कर्नल मेन साहेब डिपुटी कमिशनर नरनाळयाहून गुरुवारीं एथें आले. क्या० बुलक साहेब रजेवरून वाशिमास परत गेले.

शिगावचा मोठा मारामारीचा मुकदमा एथें मि० डेविस साहेब यांजपुढें चालू आहे. दर रोज तीन चार तास काम चालतें. तितक्यांत बहुधा एक साक्षीदाराची साक्ष होते. आरोपीतर्फे रा. रा. देवराव विनायक हे वकील आहेत. या मुकदम्याची हकीकत पुढें आह्मी सावंत लिहू.

रा. रा. कृष्णाजी दिनकर सुपरवायझर रजेवरून परत आले.

रा. रा. वामनराव गोविंद मूर्तिजापुरचे जमादार यांची शिक्षा अपिलांत बारिस्टर येऊन रद्द झाली असें समजतें. आणखीही त्यांवर कांहीं प्रकरण आहे असें ह्मणतात.

क्या० आर एस थांपसन बुलढाण्याचे असिस्टंट कमिशनर यांस क्रिमिनल प्रोसिजर कलम २७ रकम ६ यांतील अधिकार दिले.

मि० सादत मीरखान चिखलीचे तहशिलदार यांस त्या तालुक्यांत १०० रुपया पर्यंतचे दिवाणी दावे पहाण्याचा अधिकार दिला.

मि० ए टी ट्रिसंदल फारेस्ट खात्याचे डिपुटी कान्सरवेटर यांस पुढील महिन्याचे १० वे तारखेपासून तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली त्यांचें काम मि० जे बलंटैन असिस्टंट कान्सरवेटर हे पहातील.

वऱ्हाडांतील कोर्ट फी स्टांपाच्या व्यवस्थेचें काम इतर स्टांपाप्रमाणें कमिशनर साहेबांकडेसच देण्याचा रेसिडेंट साहेबांनीं ठराव केला आहे.

मि० क्रेग साहेब यांस मि० हामिलटन साहेबाचे जागीं पश्चिम वऱ्हाडचे एक्सिक्युटीव इंजिनियर नेमिलें.

मि० हामिलटन साहेब पश्चिम वऱ्हाडचे एक्सिक्युटीव इंजिनियर यांस हैदराबादस रेसिडेंट साहेबाकडे पब्लिक वर्क्स खात्याचे असि० सेक्रटरी व असिस्टंट सुपरइंटेंडिंग इंजिनियर नेमिलें.

गेले रविवारीं जुडिशयल कमिशनर साहेबांची स्वारी अकोल्यास आली.

गुरुवारीं सायंकाळचे ५ वाजतां शिगाव एथें वीज पडून एक गाय व एक हैस अशीं दोन जनावरें मेलीं.

निजाम सरकारास वऱ्हाड परत मिळावें ह्मणून दिवाण साहेबांनीं विलायत सरकारांत पुन्हा उद्योग केला होता त्यांस जबाब मिळाला कीं सरकार वयांत येईपर्यंत या गोष्टीची वाटाघाट करूं नये.

रा. रा. श्रीराम भिकाजी जटार वऱ्हाडचे इजुकेशनल इन्स्पेक्टर यांणीं डायरेक्टर साहेब सिमल्यास गेल्यावेळीं गुदस्त सालीं तारीख २३ मे पासून तारीख २० जुलै पावेतों त्यांचे चालचलाऊ काम पाहिल्याविषयीं १५वे तारखेच्या रेसिडेन्सीगाझेटमध्यें प्रसिद्ध झालें आहे. व त्याबद्दल त्यांस महिना १०० रुपये प्रमाणें अलावन्स मिळाला हें ऐकून आह्मास संतोष होतो.

रा. रा. सखाराम दत्तात्रय पेनशनर तहशिलदार काल रोजीं एथें आले.

इलिचपुर— उष्णता पूर्ववतच होत आहे. व आकाश सदोदीत मेघांनीं आच्छादित असतें. काल रात्रीं थोडी पर्जन्य वृष्टीही झाली व आज पुन्हा पाऊस पडण्याचीं सुचिन्हें दिसत आहेत. रोगराई ह्मणण्या सारखी नाही.

गेल्या फेब्रुवारी अखेर अकरा महिन्यांचा वऱ्हाडचा जमा खर्च

जमा ७२१६२०९ रु.

खर्च ६०७९७११ रु.

शिलक ११३६४९८

वऱ्हाडांतील पीक पाणी व आरोग्य यांविषयींचा मे महिन्यांतील अहवाल.

अमरावती— नांगरटीचें काम पुरें झालें व वाख्रा देऊन पेरणीकरितां जमीनी तयार झाल्या. जिल्ह्याच्या कांहीं भागांत गोवर, देवी व ताप यांची सांत होती. थोड्या जागीं गुरांना खुराचा रोग झाला होता. हवा अतिशय उष्ण होती.

इलिचपुर— पुढील पेऱ्याकरितां जमीनीची मेहनत मशागत चालू होती. साऱ्या जिल्ह्याभर देवी व ताप यांची सांथ होती. गुरांनां कांहीं रोग नव्हता. हवा उष्ण आणि साभ्र होती.

वणी— खरीपाच्या पेरणीकरितां जमीनीची मेहनत झपाट्यानें सुरू होती, कांहीं तालुक्यांत महामारीचा उपद्रव झाला होता, पण तो पुढें कमी झाला. ताप व देवी यांचा आजार दारव्हे व केळापुर तालुक्यांत अधिक होता. गुरांनां खुराचा रोग होता व हवा उष्ण होती.

अकोला— धान्य कोणतेंही उभें नव्हतें. लोकांनां व गुरांनां आरोग्य चांगलें होतें. हवा उष्ण होती.

बुलढाणा— बरसातीकरितां जमीनीची मेहनत करण्यांत लोक अजून गुंतलेले होते. थोरांनां ताप व मुलांनां गोवर यांचा आजार चालू होता. महामारीनें कांहीं थोडीं मनुष्यें मेल्याचें कळलें. गुरांनां रोग नव्हता. हवा अतिशय उष्ण होती.

वाशीम— खरीपाकरितां जमीन तयार होत होती. कांहीं गावांत महामारीचा उपद्रव झाला व देवीची सांत चालू होती. गुरांनां आरोग्य होतें व हवा साभ्र होती.

देऊळघाट— जिल्हे बुलढाणा. (मित्राकडून) ता. २१।६।७८ इसवी.

गुदस्त सालीं पर्जन्याची कमताई झाल्या मुळें नदी नाल्यांचें पाणी तर कधींच सुकून गेलें होतें- विहिरीच्या पाण्यावर ती भरवसा होता त्या विहिरीही आटून जाऊन पुढें पाणी मिळतें कसें आणि जीविताचें रक्षण होतें कसें याची सर्वांना मोठी पंचाईत पडली होती परंतु ता- १८ मिनहू रोजीं मोठा पाऊस पडल्यामुळें आतां विहिरीना थोडेसें पाणी येऊन लोकांची उद्विग्न झालेलीं मनें बरीच शांत झाल्याचें दिसतें. शेती लोक जमीनी तयार करून आणखी पावसाची पेरणीसाठी वाट पहात आहेत. महामारीचा उपद्रव जिकडे तिकडे बराच आहे. महागाई तर मी मी ह्मणत आहे. या गांवांतील एका पाटलाची बायको महामारीच्या उपद्रवानें बळी घेतली.

एथें मुनसिप्यालिटी असून रस्त्याची व्यवस्था चांगली नाहीं. जिकडे तिकडे घाण झालेली असते.

हा गाव मोठा असल्या मुळें एथें आनररी माजिस्त्रेटचें कोर्ट लवकरच स्थापन होऊन ती जागा येथील नबाबसाहेब यांचे चिरंजिवाना मिळणार असें कळतें. असें झाल्यास सरकारांनीं उत्तम प्रकारची निवड केली असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं कारण कीं सदर्हू गृहस्थ तरूण असून जातीचे मुसलमान, व अल्पवयांत दोन तीन विद्या शिकलेले असून व्यवहारामध्येंही चांगलि वाकबगार आहेत. सबब त्यांनां अवश्य ही जागा मिळावी असें लोक इच्छितात.

लिहिण्यास दुःख वाटतें कीं, येथील नामांकित नबाब बिसमिल्ला खान बहादूर यांस तारीख २० रोजी सायंकाळचे पांच वाजण्याचे सुमारास देवाज्ञा झाली. हे गृहस्थ ज्यानां ज्यानां माहित होते त्यानां ही दुःखकारक वार्ता कळल्यावर वाईटवाटल्या वांचून राहावयाचें नाहीं. ते जिवंत असतांच त्यांनीं आपल्या मूठमातीची व्यवस्था करून ठेविली होती त्याप्रमाणें त्यांच्या घरा नजीक त्यांनीं एक मशादि बांधली आहे तिच्या पटांग्यांत त्यांनां मूठमाती देण्याचा समारंभ दुःखाचा तर खरा परंतु मोठ्या थाटाचा झाला. ह्या प्रसंगीं चिखलीचे तहशिलदार वनचराईचा लिलाव करण्याकरितां एथें आले होते तेही सदर्हू समारंभाच्या वेळीं हजर होते. सुमार तीनशें मंडळी मुठमाती देण्यासाठी जमली होती. नबाब साहेब यांची उमर ८०।८५ वर्षांची होती असें ह्मणतात. या गृहस्थाचें चरित्र फार वर्णणीय व कित्ता घेण्या सारखें आहे तें सवडी अर्ती आपणाकडे प्रसिद्ध करण्यास पाठवीन.

## वर्तमानसार.

ह्मैसुराकडे पर्जन्य फार चांगला पडला व तिकडील लोक स्थिति सुधारत चालली आहे.

पुणे— आकाश ढगानीं दररोज व्याप्त असतें. ऊष्मा विशेष होउं लागला आहे. पर्जन्य पडण्याचीं चिन्हें पूर्ण रीतीनें दिसत असल्यामुळें चांगली वृष्टिहोण्याकडे लोकांचे डोळे लागले आहेत. बाख्याचा उपद्रव अद्याप चालू आहेच.

धुळें— उष्णतेचें मान किंचित् कमी झालें आहे परंतु नेहमीं अभ्रें येत असल्या मुळें हवा बंद राहून अगदी लाही होते. पर्जन्य गुरुवारी किंचित् पडला. आ. न.

सातारा— गेले मंगळवारापासून आकाश ढगांनीं आच्छादित असून पाऊस पडण्यास सुरुवात झाली आहे. हवेतील उष्णता थोडी कमी झाली.

शहारांतील पटकीचा आजार कांहीं सा कमी झाला आहे. परंतु आसपास खेड्यामधून अद्यापि सपाटा चालू आहे.

व. मि.

या आठवड्यांत रायचुरपासून ठाण्यापर्यंत पाऊस पडल्याचें समजतें. तुळजापुराकडे तर दोन तीन पाऊस चांगले झाले असें कळतें. क. त.

मुंबई— गुरुवार, शुक्रवार व शनवार यांच्या उत्तररात्रीं थोडथोडा पाऊस पडला. रविवारीं मुळींच पडला नाहीं तेणें करून उष्णतेचा अंमल मात्र जारी होऊन मृत्युचा संख्या वाढणार अशी भीति उत्पन्न झाली आहे. इं.

मुंबईचे हायकोर्टाची इमारत बांधण्याकरितां १४०७२६१ रुपयांचें सांगशन झालें होतें तेवढ्यानें काम आटपलें नाहीं सबब आणखी १९४०६० रुपयांचें पुरवणी सांगशन केलें आहे.

मुंबईच्या कलेक्टराचा जमीन बाब व सायर बाब याचा सन १८७६।७७ सालचा रिपोर्ट स्टेट सेक्रेटरीकडे गेला त्यावरून समजतें कीं जमा ७८९८७ रुपये झाली व अबकारीचें उत्पन्न १४२८९२ रुपये झाले.

सुरतच्या एडिटरवरील खटला अजून माजिस्त्रेटपुढें चालू आहे. पोलिस इन्स्पेक्टर मि. मोतीलाल यांनीं हुकुम नसतां आरोपीचे हातांत बेड्या घालून व त्याच्या मुसक्या बांधून त्यांस सुरतेच्या कोर्टांत नेलें. याजबद्दल बारिस्टरानें तक्रार केली पण माजिस्त्रेटानीं तिकडे फारसें लक्ष्य दिलें नाहीं. पुढें बंदोबस्त करूं असें सांगितलें.॥

रशियास लढाईंत १०० कोटि रुपये खर्च झाला असें समजतें.

हिंदुस्थानांतील सर्व मारण्याकरितां नेटिव शिपायांची पलटण करावी व त्याना कातड्याचे दरेस देऊन व हत्यारें देऊन त्या कामास लावावें अशी सूचना विलायतेहून हिंदुस्थान सरकारास कोणी केली आहे.

सेंट्रल प्राव्हिन्स ( नागपुर ) चा सन १८७६।७७ सालचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला आहे त्यावरून कळतें कीं त्या सालीं ६१९४६९९ रु. जमा झाली.

हिंदुस्थानचा परकीय राष्ट्राशी सन १८७६।७७ सालीं जो व्यापार झाला त्याची बेरीज ११२ कोटि रुपयांची झाली आहे. अमेरिकेच्या लढाईच्या वेळीं कापसाचा व्यापार वाढून पुढें तो कमी झाल्यापासून आज कित्येक वर्षें हिंदुस्थानच्या व्यापाराची इतकी बेरीज झाली नव्हती असें समजतें.

अहमदनगर एथील नाटकाचा मंडप जळाल्याची हकीकत सरकारास कळल्यावरून म्युनिसिप्याल कमिश्यांस सरकारानें असें सर्क्युलर केलें आहे कीं पुढें शहरांत दुसरीं नाटकें झाल्यास त्यांत मंडप वगैरे घालविण्याकडे योग्य नजर ठेवावी.

नगरास चार पांच दिवसापासून आकाशांत ढगें वगैरे येऊन एक दिवस मात्र सुमारें पाऊण तास पाऊस पडला तोही ह्मणावा तसा जोरानें पडला नाहीं. एक दोन दिवस बुरबुरी दाखल दोन तीन सरी पडल्या बाहेर गावीं मात्र बराच पर्जन्य झाल्याची बातमी कळते. दोन चार पाऊस सपाटून झाल्याविना जमिनीतील उष्मा शांत होणार नाहीं व पेरण्या ही चालणार नाहींत, धान्यांचें मान किंचित् उतरते कळेवर आहे. ऊष्मा विशेष होत नाहीं.

न्या. सिं.

सोलापुर— येथे ह्मणण्यासारखा जरी पाऊस झाला नाहीं तरी प्रति दिवशीं रस्ते भिजण्यासारखा पडत आहे त्यांत मंगळवारीं मात्र एक तासभर चांगला झाला असेच कांहीं होतील तर हाकाहाक मोडेल. हल्लीं वसंताची तेजी मोडून ग्रीष्म ऋतूची मंदी आहे. धान्यांच भावांत ह्मणण्यासारखा फरक नाहीं.

उष्णतेनें नागपुरास उग्र स्वरूप धारण केलें आहे. रात्रंदिवस फार उकाडा होतो पर्जन्य पडण्याचीं चिन्हें दिसत नाहींत. आकाशांत मेघवृंद उत्पन्न होऊन नाहींसे होतात. चातक पक्षा प्रमाणें लोक पर्जन्याकडे टक लावून वाट पहात आहेत. सायंकाळीं एक दोन दिवस गारवा असतो याववरून जवळपास पाऊस पडला असावा असें अनुमान होतें. योग्य वेळीं पर्जन्य वृष्टि न झाल्यास "चणे आहेत तों दात नाहींत व दांत आहेत तों चणे नाहींत." अशी स्थिति होईल ह्मणून धास्ती वाटते.

नागपुर महामारीचा प्रवेश होऊन धिमें धिमें काम चाललें आहे. तिच्या मनाप्रमाणें येथें पारध मिळेल कीं, काय हें सांगवत नाहीं क्वचित् ठिकाणीं ज्वराचाही प्रादुर्भाव झाला आहे दोघांचें एक मत झाल्यास चांगली शिकार साधेल. महामारीस चार बळी मिळाले.

फ- म.

---

## नोटिसा

रा. राघोजी वल्लद चंद्रभानजी पाटील वस्ती मौजे चतारी ता. बाळापुर व तपाजी वल्लद विठोबा पाटील वस्ती मौजे कारल ता. मजकूर यांसी खालीं सही करणार वहिवाटदार याजकडून नोटिस देण्यांत येत आहे कीं, तुमचेकडे आमचे घेणें चंद्रभानजी याजकडे मुद्दल ४० व तपाजी याजकडे मुद्दल ५० आहे हे आह्मी दहा पांच वेळा मागितलें असतां देऊं दिलाऊं करिता तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत आमचा निकाल करावा न केल्यास रीती प्रमाणें दिवाणी कोर्टांत फिर्याद करून ऐन व व्याजासुद्धा रुपये भरून घेऊ व शिवाय नोटिशीचा खर्चही दावा लागेल हें पक्कें समजावें कळावें. तारीख १९ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) बजाबाई मर्द संभाजी पाटील वहिवाटदार रंजाजी वस्ती चतारी तालुके बाळापुर.

---

नोटिस.

रा. मानसिंग वल्लद कृष्णाजी पाटील वस्ती मौजे वाडेगाव ता. बाळापुर यासि खालीं सही करणार वहिवाटदार याजकडून नोटिस देण्यांत येत आहे कीं, तुमचेकडे आमचे खातेबाकीचे रुपये ७०० त्याची फेड च्यार वर्षांत सालबंदीनें करून देण्याची त्याप्रमाणें तुमच्याकडून तीन सालबंद्या पावल्या बाकी राहिली एक सालबंदी रुपये १७५ ते आह्मास मुदतसीर न पावल्यामुळें नोटिस देत आहो. करितां ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आमचे रुपयाचा निकाल करून टाकावा नाहीं तर रीती प्रमाणें दिवाणी कोर्टांत फिर्याद करून व्याजासुद्धा आणि नोटिसीचे खर्चा सुद्धा रुपये भरून घेऊं कळावें तारीख २० मा जून सन १८७८ इसवी.

( सही ) बजाबाई मर्द संभाजी वहिवाटदार रंजाजी वस्ती मौजे चतारी ता. बाळापुर.

नोटिस.

रा. रघुजी वल्लद महादाजी तराळ वस्ती मौजे जवळ ता. खामगाव यासी खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येत आहे कीं, तुमचेकडे खातेबाकी बद्दल रुपये ७७॥ याची फेड च्यार सालबंदी करून त्यांचें सालखत आह्मास लिहून दिलें त्याप्रमाणें तुमचे कडून एक सालबंदी आह्मास पावली बाकी राहिल्या तीन सालबंद्या त्या आह्मास मुदती प्रमाणें पावल्या नाहींत करितां ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचें आंत आमचा निकाल करून टाकावा नाहीं तर दिवाणींत फिर्याद करून ऐन व व्याजासुद्धा आणि नोटिसीचे खर्चासुद्धां भरून घेऊ कळावें. तारीख १७ माहे जून सन १८७८ इ.

[ सही ] बजाबाई मर्द संभाजी पाटील वहिवाटदार रंजाजी वस्ती चतारी ता. बाळापुर.

---

नोटिस.

रा. नथु वल्लद वनसिंग वाघमोर वस्ती मौजे कानसिवनी ता. अकोलें यासी खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें आहे कीं, मी तुझी लग्नाची बायको असून आजपर्यंत अज्ञान असल्या कारणानें तुझी नांदणुकीची रीत दिसून आली नाहीं. मी वयांत आल्यास किंवहुना तीन वर्षें झालीं. परंतु तुझ्याकडून संसार मार्गाची व्यवस्था दिसून येत नाहीं. करितां तुला नोटिस देण्यांत येत आहे कीं, नोटिस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत तू दाव्याचा निकाल करून घ्रेणें नाहींतर मुदत संपल्यावर मी पुनर्विवाह करणार आहे कळावें. तारीख १९ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) जानकी मर्द नथु वाघमारे निशाणी बांगडी.

---

नोटिस.

रा. जानजी वल्लद भगवान विगलकर हल्लीं वस्ती मौजे मंगरूळ ता. अकोलें परगणें नजीक बारसी टाकळी यासि खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तुह्मांकडे आमची खाते बाकी रुपये ३०७ शिवाय व्याज निघत आहे तर तुजला पांच चार वेळा बलाविलें असून येतही नाहीं व रुपयेंही देत नाहीं. करितां नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं, आज तारखे पासून आठ दिवसांत येऊन निकाल करून जाणें नाहींतर शिरस्ते प्रमाणें फिर्याद करून रुपये, व्याज व नोटिसीचा खर्च सर्व तुह्मांजवळून भरून घेऊं कळावें. तारीख १७ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) अमेदीराम हेमराज मारवाडी दुकान निंब दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

रा. सखाराम वल्लद उदेभान गायकवाड पाटील मौजे दुर्गादैत ता. जळगाव यास भागीरथी मर्द सखाराम गायकवाड इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, कपेश बारा वर्षें झालीं तूं मला आपले घरून आईचे एथें पाठविलेस व तेव्हां पासून नांदवित नाहींस मी दोन वेळा तुझ्या एथें आले असतां तूं पिटून दिलेस माझा अंगिकार केला नाहींस आतां मीं किती दिवस दुसऱ्याचे एथें रहावे. तुझे पोटची बारा वर्षांची मला एक मुलगी आहे तिचें लग्नाबद्दल तुला विचारितां तूं लग्नही करून दिलें नाहींस तेव्हां माझे आईनें ३०० रुपये कर्जदारी करून पोरीचें लग्न केलें व माझ्या पोटास आज बारा वर्षांत २०० रुपये कर्ज काढून लाविले मिळून ५०० रुपये कर्जाचा बोजा माझे शिरावर आहे याची तूं फिकर करीत नाहींस व मला वागवीत नाहींस याजकरितां तुला ही नोटिस दिली आहे. तर तुला वागवावयाचें असल्यास ५०० रुपये कर्जदारीचे रोख पाठवून देऊन एक महिन्याचे आंत मला आपले एथें नेऊन जनरीतीप्रमाणें वागवावे अथवा वागवावयाचें नसल्यास लग्नाची फारकत सदहु मुदतीचे आंत रकमे सुद्धा पाठवून द्यावी. असें न केल्यास कोर्टांत फिर्याद करून रुपये घेतले जातील व लग्नाचा हक्क रद्द करून दुसरा घरठाव केला जाईल. कळावें तारीख १९ माहे जून सन १८७८ इसवी.

[ सही ] भागीरथी मर्द सखाराम गायकवाड इची निशाणी बांगडी.

---

नोटिस.

रा. रा. शंकर भगवंत पांडे हल्लीं वस्ती घोडेगाव तालुके अकोट यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्मी शिगावीं कडताजी पाटील ह्यांचे एथें नोकर असतांना तुह्मांस रहाण्यास जागा नसल्यामुळें आह्मी आमचे घरामागील चौदिवालीचें अवार जागे सुद्धा तुमचे ताब्यांत देऊन त्यावर तुह्मी छपर करून सुमार ७ वर्षें त्या जागेवर राहिला पुढें तुमची नोकरी सुटल्या मुळें तुह्मी आपलें सर्व खटलें घेऊन सदरील गांवीं रहाण्यास गेला त्याजला सुमार एक वर्ष होत आलें आतानां जागा आमचें ताब्यांत दिली नाहीं. तुमच्या व सोनभट सखाराम भट याच्या संगन मतानें ही जागा तुह्मी सोनभट याचे कबजांत दिल्या मुळें हल्लीं तिचा कबजा तो करित आहे त्याजला खाली करून मागितली असतां तो तुह्मी दिल्याचें सांगतो यास्तव तुह्मास या नोटिसीनें कळविण्यांत येतें कीं, तुह्मी ही नोटिस पावल्या दिवसा पासून आठ दिवसाचे आंत तुह्मी येऊन जागा आमचे ताब्यांत दावी मुदतींत जागा खालीं करून न द्याल तर तुह्मवर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून जागा कबजांत घेऊन खर्च भरून घेऊं व तुह्मास या नोटिसीचाही खर्च दावा लागेल कळावें. तारीख २० माहे जून सन १८७८ इसवी.

[ सही ] किसनराम बाळ मुकुंद मारवाडी रहाणार शिगांव ता. खामगाव दस्तुर खुद्द.

---

हें पत्र अकोला एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १२ अकोला, रविवार ता० ३० माहे जून सन १८७८ इसवी. अंक २६


## वऱ्हाडसमाचाराची किंमत

| | रुपये |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फिरकोळ अंकास | ०४ |
| डाकहाशील. | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| ,, अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी आल्या शिवाय (?) पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, १० ओळीचे आंत | १ |
| १० ओळीपुढें दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |


## जाहिरात.

COMEDY OF ERRORS.

### कामिडी आफ एरर्स

अथवा

### भ्रांतिकृत चमत्कार.

या नावाचें शेक्स्पियरच्या इंग्लिश नाटकाचें मराठी भाषांतर विद्वान् गृहस्थांनीं तयार केलेलें आमच्या छापखान्यांत छापून विक्रीस तयार आहे. यांतील संविधानक फार मौजेचें असून हास्यरस ओतप्रोत भरला आहे. व ग्रंथरचनाही फार चांगली साधली आहे, असें बहुतांचे तोंडून ऐकिलें आहे. याची किंमत सहा आणे. व डाकेंतून मागविल्यास हाशिलाबद्दल अर्धे आणा पडेल.

वऱ्हाडसमाचाराचे मालक.


## नोटिसा

रा. रा. बापुजी वल्लद चिमणाजी पवार जात कुणबी रहाणार मौजे उमरी तालुके अकोलें यास तुकाराम वल्लद भागुजी सोनार कुलथे याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्माकडे आमचे ५० पन्नास रुपये कर्ज असून त्याबद्दल तुह्मी आह्मास स्टाप कागदावर पुर्जाही लिहून दिला आहे व त्यास दरशेकडा दोन रुपये महिना प्रमाणें व्याज ठरलेलें आहे. हे रुपये एका महिन्यांत आदा करीन असा तुह्मी करार केला असतां त्यास दोन सवा दोन वर्षे होत आलीं. आह्मी तुह्मास हे रुपये मागितले तुह्मी देतों देतों ह्मणता पण देत नाहीं करितां मुद्दाम ही नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून आठ दिवसांचे आंत रुपयाची आदाई करावी व या प्रमाणें तुह्मीही करार नुकताच केला आहे. या मुदतींत जर तुह्मी रुपये दिले नाहीं तर दिवाणी कोर्टांत फिर्याद करून कोर्ट खर्चा सुद्धां रुपये वसूल करण्यांत येतील. या नोटिशीचा खर्च तुह्मावर बसेल. कळावें. तारीख २४ माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) तुकाराम वल्लद भगूजी
सोनार कुलथे रहाणार उमरी
ता. अकोलें दस्तुर खुद्द.

नोटिस.

रामचंद्र वल्लद हरी रंगारी जामदार रहाणार कसबे चिखली तालुके मजकूर जिल्हा बुल्ढाणें यास नोटिस देणार राधिका भ्रतार रामचंद्र रंगारी रहाणार कसबे चिखली तालुके मजकूर जिल्हा बुल्ढाणें इजकडून देण्यांत येते ती अशी कीं, तूं माझा भ्रतार असून लग्न होऊन सुमारें वीस बावीस वर्षें झालीं. अज्ञानत्व असते वेळीं आई बापानीं माझें संगोपन केलें मला ऋतु प्राप्त होऊन बारा वर्षे गुजरून गेलीं तुजकडून माझे सृष्टी नियमाप्रमाणें आजपर्यंत संगोपन कांहींच घडलें नाहीं. माझा संसार व्यर्थ जाण्या करितां आई बापानीं लग्न करून दिलें नाहीं. ऋतूं प्राप्त झाला त्या दिवसापासून आज बारा वर्षे पूर्णतेस पावलीं तेव्हां भ्रतारपणाच्या नात्यानें आजपर्यंत अन्नवस्त्रादिक सुद्धां तुजकडून पुरविलें गेलें नाहीं यास्तव मी तुला पंचाचे हातानें कित्येक वेळां अन्न वस्त्र पुरविण्याविषयीं मागणें केलें त्याचें उत्तर तुजकडून पंचमार्फत मला पावलें. त्यांत मजकूर कीं हमालपणाचें ओझें वाहून त्या उत्पन्नावर माझें पोट मला भरत नाहीं व निशा पाणी वगैरेस पैसा रहात नाहीं तेव्हां तुला कळेल तसें करावें ह्मणून वगैरेचा जबाब तुजकडून झाला परंतु मी त्या बोलण्यावर दृष्टी ठेविली नाहीं आणि उदर निर्वाह होणें तो झालाच पाहिजे. तेव्हां पांच रुपये दरमहा प्रमाणें बारा वर्षांचे सातशें वीस रुपये झालेले कर्ज फेडण्याकरितां तुला मी पुष्कळ वेळां मागणें केलें तुजकडून फेड होत नाहीं ह्मणून ही नोटिस तुला पावल्यादिवसापासून १५ दिवसांचे आंत सदर्हू रुपयांची तुजकडून फेड न होईल तर व पुढें दरमहा पांच रुपये प्रमाणें मजला न पावले तर तुझा मजवर कोणतेही प्रकारें भ्रतारपणाचा लग्नसंबंधी हक्क रहाणार नाहीं. मी दुसरा भ्रतार करून सावकाराचे रुपयांची आदाई करीन. कळावें. तारीख २० माहे जून सन १८७८ इसवी.

( सही ) राधिका भ्रतार रामचंद्र
रंगारी निशाणी खुद्द हातची

## कृष्णाकुमारीकाव्य.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

श्लोक

राक्षास त्या बहुत संतति होय, तींत,
कृष्णाकुमारि दुहिता उपजे क्षितींत ॥
स्त्रीरत्न हेंचि ह्मणती जन लक्षणज्ञ,
प्रज्ञा तिची गणि बृहस्पतिलाहि अज्ञ
॥ ११५ ॥
राजा स्वातीमेघ, ती शुक्ति राणी
त्या मेघाचें सांठलें तींत पाणी ॥
तें हें मुक्तारत्न कृष्णाकुमारी,
कांकीं ऐसी नाहिं पृथ्वींत नारी ११६
बहु क्लेश साहे व्यय न गणि
लावण्यनिधिचा,
कुमारीतें निर्मी, परि विफल
आयास विधिचा ॥
पहाती तीतें ते तरुण झुरती
व्यर्थचि मनीं,
तिला साजे ऐसा पुरुष सुकृती
नाहिं भुवनीं ॥ ११७ ॥
विधीस कैवार तिचा ह्मणोनी
स्वतांचि कैवार खरा धरोनी, ॥
निंदूनि दैवा रति होय कष्टी,
अशीच तो रेखि तदंग यष्टी ॥११८॥
जी रूपदोषें न कधींहि बाटे,
ती श्रीच कृष्णे उपमान वाटे ॥
स क्षात् पहायां उघडी पयोजा,
मार्तंड हा तर्क अखंड योजा ॥ ११९ ॥
शशी सहज लक्ष्मिचा निजकरें
मिटी पुष्करा,
न हेतु समजे परा ह्मणुनि
सांगतों मी खरा ॥
थिजेल कमलालया जरि
कुमारिके पाहिल,
स्वयें मग न तो तिचें गृह
कपाट कां झांकिल ॥ १२० ॥
तिच्या गौरांगाशीं करिल समता
स्वर्ण, जर तें,
सुगंधा साधोनि त्यजिल
कठिनत्वासि परतें ॥
पदांते थोराच्या प्रथम दृढ
सोपान मृदुता
भजेना तीतें जो विटति जन
त्या ज्यावरि भुता ॥ १२१ ॥
यमाच्या पाशीं जे खळ पडति
त्यांची कठिणता
विधीनें वेंचोनि स्तन कठिण
केले कविमता
असें येतें, नाहीं तरि, सतत
ते ऊर्ध्वमुख कां ?
तयां सेवाया जे झटति रचिते
त्यां असुख कां ? १२२
तिचें नयनयुग्म तें भ्रमर युग्म उत्कंठित
विलोकि अधरामृता तरिहि जाहलें कुंठित
पथीं सरल नासिका अडवि त्यास चांफेकळी
सदा चलाचि होय तें सतत कीं स्वैरी! बळी
१२३
लोकवंद्य कुलशील बुद्धिनी
यौवनेंहि भुवनांत भामिनी
ख्यात होय तंव सर्व भूपती
व्हावि ती मज असेंच चिंतिती १२४
उपवर कुमरीतें जाणुनी तद्विवाहीं
मन जनक धरी, त्या योग्य गावे न व्याही
अभिलषित समायां सांगतां तेहि धाले,
परि ह्मणति न एथें आमुचा यत्न चाले
१२५
कृष्णा कुमारीस वर प्रभावें,
जो तुल्य, तो शोधुनिही न गावे ॥
जो पूर्व कर्में सजला असेल,
दैवें मनीं तोचि इच्या ठसेल १२६
कुमारी भोताले बहु नृपति
पुत्रास फिरवी,
जसा भौमादीतें भ्रमवि
गगनीं संतत रवी,
तयातें आकर्षी बहु गुण तिचें
रूप अणि ते
पुढें जाती लज्जेस्तव, ह्मणुनि
त्यां वर्तुल गतें १२७
जे राजपुत्र असती कुलशील रूप
तारुण्यगर्वित, रणीं बहु ज्या हुरूप
त्याच्या लिहोनि आणिल्या प्रतिमा प्रधानें,
कीं ज्ञात होइल अशा वर संविधानें १२८
चित्रें सर्व विलोकितां वर तिच्या
जो इष्ट झाला मना,
तो राजा जयपूरचा, मग पिता
जाणेनि तत्कामना ॥
सांगे इष्ट जनास, कीं प्रिय जगत्
शिंगास मानी सुता
माझेंही मन इच्छितें कुमरि त्या
द्यायास लोकस्तुता १२९
( पुढें चालू. )

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

ज्योतिष.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस:—

वि० वि० महाराज या गूढ विषयाकडे आज माझें लक्ष जाण्यास कारण आपल्या २३ माहे जूनचे वऱ्हाडसमाचारांतील एक "क्ष" या सहीचें पत्र होय. खरोखरच ज्योतिष हें ईश्वराचे नेत्र मानिलें आहे. व याची थोरवी अशीच वर्णिली आहे कीं, ईश्वर जसा सर्वसाक्षी आहे त्याचप्रमाणें या ज्योतिषाचे योगानें भूत, भविष्य वर्तमान या तिन्ही काळची हकीकत मनुष्यास जाणता येते. व त्याप्रमाणें या विद्येचा अभ्यास करून अनेक ज्योतिषी आपापले शक्ती प्रमाणें भविष्यें वर्तवितात. ही प्रवृत्ती थोडीबहुत सर्वच देशांतून आढळते. तरी आपल्या हिंदुस्थानांत याची अधिक व्याप्ती आहे. इतर देशांतून क्वचित् एकाद्या मनुष्याचे स्थितीविषयीं अगर एकाद्या गोष्टीविषयीं भविष्य कांहीं नियमावरून प्रसिद्ध करतात व त्याप्रमाणें क्वचित् घडूनही येतें. पण आपल्या देशांत ज्यांचें जातक कर्म वर्तविलें नाहीं व लग्नपत्रिका लिहिली नाहीं असे फार थोडे लोक सापडतील. त्यांत त्यांचे आयुष्यक्रमांत घडणाऱ्या गोष्टी कथन केलेल्या अस-

तात. व त्याप्रमाणें पुष्कळांस ठोकेही घडतात. आतां अलीकडे पुष्कळ लोकांचा यावर विश्वास नाहीं व ते याला केवळ “भ्रम” या सदरांत ढकलतात. तथापि या जगांत कोणत्या वस्तूचें कोण्या पदार्थाशी सादृश्य असून एकावर अमुक प्रकारचें कार्य झालें असतां दुसऱ्यावर अमुकच प्रकारचें घडेल हें जाणण्यास अजून आपण पंगूहून पंगू आहों, सबब अमुक भ्रम आहे अगर अमुक निश्चायक आहे हें ठरविणें थोडें अडचणीचें होईल. ह्मणून मी मूळचाच अज्ञानी असल्यामुळें तशा खटपटींत न पडतां सदर्हू ‘क्ष’ सहीचे पत्रावरून जी मला शंका उत्पन्न झाली आहे ती आपणाकडे सादर करून सदर्हू ज्योतिषी यांजकडून त्यावर समाधान इच्छितों.

इतर ज्योतिषांचे मताप्रमाणें या आर्द्रा नक्षत्राची पर्जन्यवृष्टी विपुल व्हावी असें भाकित आहे व त्याप्रमाणें दररोज पयोधर मेघांचें औडंबरही असतें व आसपास वृष्टीही होते तरी व्हावी तशी होत नाहीं यावरून या विपुल पर्जन्यवृष्टीला अडथळा करणारा कांहीं कुयोग कारणीभूत झाला असावा; कारण ज्यांनीं मृग, आर्द्रा व पुनर्वसु हीं तीन नक्षत्रें मिळून तीनच पाऊस पडतील असें बोलून दाखविलें आहे त्यांनीं तें याचें कारण पूर्ण लक्षांत आणिल्यावांचून नसेल. त्यांनीं याबद्दल अलबत चांगला शोध केला असेल ह्मणून आपले बातमीदार या गोष्टीबद्दल अधिक शोध करून हे तीन पाऊस जे पडावयाचे ते कोण कोण्या तिथीस पडतील व त्या पावसाचें किती अंश अगर किती पाणी पडेल, व पुढें कोण कोणत्या नक्षत्राचें किती किती पाणी पडेल हें प्रसिद्ध करतील तर तेणेंकरून शेतकरी लोकांस पेरणीची वेळ समजण्याचे कामीं मोठी मदत होऊन सर्वांवर त्यांचे उपकार होतील कळावें तारीख २६ जून सन १८७८ इसवी.

ज्योतिषावर विश्वास ठेवणारा
शेतकरी लोकांचा हितचिंतक
आपला दास रामात्मज

---

## वऱ्हाडसमाचार

मिति ज्येष्ठ वद्य ३० शके १८००

---

# हिंदुस्थानचें जंगलखातें.

पारिस शहरांत प्रदर्शन सुरूं झालें आहे व हिंदुस्थानांतील बहुत वस्तु तिकडे गेल्या आहेत व त्यामुळें हिंदुस्थानची मोठी कीर्ति झाली आहे याविषयीं थोडेच दिवसांमागें आह्मी लिहिलें आहे त्याची वाचकांस आठवण असेल. आतां या वस्तूंतील एका भागाविषयीं लिहितों.

हिंदुस्थानच्या जंगलखात्याचे इन्स्पेक्टर जनरल यांनीं लिहिलें आहे कीं, हिंदुस्थानच्या सर्व जंगलांतील तऱ्हतऱ्हेचें उपज व लाकूडकाम आह्मास पारिसकडे पाठवितां आलें नाहीं, कारण अवधि थोडा व ह्मैसूर वगैरेकडे दोन वर्षें दुष्काळ असल्यामुळें तिकडील वस्तु व लाकडें आणावयास गाड्या लवकर मिळाल्या नाहींत व पल्ला फार लांबीचा त्यामुळें तिकडील पदार्थ हातीं आले नाहींत; तरी होईल तितकें करून इन्स्पेक्टर जनरल यांनीं जमविलेल्या वस्तूंची चांगली सिद्धता करून पाठविली. त्यांची नावनिशी व त्याविषयीं माहिती आणि खुलासा चांगला केला होता. लाकडांचा नंबर ६९० पर्यंत होता, त्यांत ३७० वेगवेगळ्या जाती होत्या. हिंदुस्थानांतील वेगवेगळ्या भागांतील मोलवान लाकडांचे मासले या ठिकाणीं दाखविण्याचा मुख्य उद्देश हा होता कीं, कोणत्या ठिकाणीं कोणते हवेंत कोणते वृक्ष उत्पन्न होतात. व ते कसकसे वाढतात याजविषयीं तपशिलवार माहिती परराष्ट्रास व्हावी. या ६९० प्रकारामध्यें ३२ मोठाले तक्ते होते, १६ वेल, २८ बांबू, व १६ वेत होते. या शिवाय ताडवृक्षाचे कित्येक प्रकार होते व ज्या झाडांपासून डीक, राळ, लाख, तेल, वार्नीश, व रबर निघतो त्यांचे सुमार १०० प्रकार प्रदर्शनांत ठेविले होते. ज्या झाडाच्या साली, मुळ्या, तंतू, पानें व फुलें यांहीं करून दोर, कागद, रंग व इतर प्रकार होतात असे पदार्थ ८८ मांडिले होते. बीजें, व फुलें यांच्या ९३ जाति होत्या व दुसरेही कित्येक प्रकार होते. हें सामान पारिस शहरास पाठविलें तेव्हां तेथें बोनांतून काढून ते व्यवस्थेनें व माहितीनें मांडून ठेवण्याच्या कामाकरितां कर्नेल पियरसन साहेब यांस हिंदुस्थानांतून फ्रान्स देशांत मुद्दाम पाठविलें व त्या वस्तु साफ करावयास, व त्यांनां ठेवण्यास बैठका, ग्लासें, बाटल्या वगैरे खरेदी करण्यास हजार रु. खर्चाची परवानगी दिली होती हा संग्रह जमविण्याच्या योगानें एक मोठा फायदा हा झाला कीं, हिंदुस्थानांतील प्रयेक झाडाचें लाकूड किंवा त्याचा कांहीं फळ मूळ पर्णादि प्रकार चांगला तपासून पहाण्यास, त्याविषयीं टिपणें करण्यास व त्यांच्या संशययुक्त नावाविषयीं खात्री करून घेण्यास मोठें उत्तम साधन झालें. पारिस एथें हे पदार्थ पाठवावयाचे तेव्हां कलकत्यास त्यांची विल्हेवार याद छापून प्रसिद्ध केली. तींत कोणत्या प्रांतांतील कोणत्या जंगलाचा हा कोणत्या प्रकारचा पदार्थ आहे हें स्पष्ट लिहिलेलें आहे. जंगलखात्याचे अधिकाऱ्यांचा असाही बेत आहे कीं, याजबद्दल एक चांगलें सविस्तर पुस्तक लिहून प्रसिद्ध करावें. सरकारचा असा विचार आहे कीं, पारिस एथें नेलेले हे सर्व पदार्थ नासी येथील फारेस्ट स्कूलाला बक्षिस द्यावे. कारण आज दहा वर्षें हिंदुस्थानांत फारेस्ट खात्यांत जाणारे लोक या स्कुलांत आपले धंद्याचा अभ्यास करित असतात. सरकारचा आणखी असा विचार आहे कीं. असेच पुष्कळ संच तयार करून लंडन, क्यू, कूपर्सहिल, एथील पदार्थ संग्रहालयांत पाठवावे. तसेच जर्मनींत बर्लिन एथें, आस्ट्रिया देशांत, इटलींत, वाशिंगटनास वगैरे पाठवावें व हिंदुस्थानांतही ठिकठिकाणीं ठेवावे. लंडनचे लाकडांचे मोठे व्यापारी मेसर्स चर्नेल आणि सिक यांजकडेही हे मासले पाठवावे ह्मणजे ते तेथील बाजारांत सर्व लोकांचे दृष्टीपुढें आणितील व गाड्या फर्निचर वगैरे सामान करण्यास हिंदुस्थानांतील लाकूड कसें व किती उपयोगी आहे या विषयीं खात्री करून घेतील. इन्स्पेक्टर जनरल असें ह्मणतात कीं हिंदुस्थानांत वृक्ष जाती एकंदर सुमार २००० आहेत त्यांपैकीं सुमार १०० मात्र लोकांस माहित असून उपयोगांत आहेत. बाकी कित्येक फार उत्तम, व कामाच्या असून लोकांस माहित नाहींत सबब त्या लोकदृष्टीपुढें आणाव्या असा आमचा इरादा आहे.

याजवरून पहातां हिंदुस्थानच्या वृक्षांचा ऊर्जितकाळ नजीक आला असें दिसतें. सरकार प्रस्तुत जंगलेंही विशेष वाढवित आहे आणि त्यांतील माल परदेशांत जाऊन उपयोगाचा ठरला ह्मणजे लक्षावधि रुपयांचा व्यापार चालेल व तेणेंकरून हिंदुस्थानची संपत्ती वाढेल असें आह्मी कल्पितों. आतां जंगलें सरकारची, व परदेशाशीं व्यापार करणाऱ्या युरोपियन कंपन्या तेव्हां याजपासून आमचे लोकांस कांहीं विशेष होईल किंवा नाहीं याचा अजून संशय आहे. तरी आह्मांस उमेद आहे कीं, येणेंकरून हिंदुस्थानांत लाकडी माल पुष्कळ तयार होईल व त्याचे कारखाने चालू होतील तेणेंकरून सुतार, मजूर वगैरेस पोटगी लागेल व लाकूड व त्याचा तयार झालेला माल कांहीं स्वस्त मिळूं लागेल.

---

**राज्य रहाटी**— इंग्लिश सरकारची राज्यरहाटी कांहीं अनुपम आहे. व ती अशा मजबूद पायावर रचिलेली आहे कीं, हजारवाऱ्यांनीं तिला कांहीं धोका येऊं नये. राजा मुकत्यार पण त्यास स्वैरपणा नाहीं, प्रजेची दहशत आहे. बरें, राष्ट्राचा अधिपति राजा आहे ह्मणून प्रजेस कांहीं अधिकार नाहीं असें नाहीं. राजाच्या खासगत खर्चालासुद्धां प्रजेच्या संमतीनें पैसे मिळावे लागतात. ही खुबी आमच्या नेटिव राज्यांत आहे काय? व पूर्वीं तरी कधीं होती काय? भारत भागवताच्या वेळेस काय असेल तें ठाऊक नाहीं पण पेशवाई व अलीकडील संस्थानशाई यांत हा गंध नाहीं. बडोदेशाईंत तर पुढील चार चार वर्षांचे जमीनीचे धारे राजानें खर्चा करितां अगाऊ घ्यावे व मनसोक्त खर्च करावा असें कानावर आहे. ह्मणून अशा राज्यांत घडामोडीही अनेकवार होत असत. व प्रजा बेजार असे. इंग्लिश सरकारची राज्यरहाटी अशी नाहीं. चक्रवर्तिनी साहेबांच्या खासगत खर्चाचीही पार्लमेंट सभेनें नेमणूक करून दिलेली आहे त्या बाहेर त्यांस खर्च करितां येत नाहीं. तशाच त्यांच्या घरच्या सर्व मंडळीच्या नेमणुका करून टाकिलेल्या आहेत. युवराज प्रिन्स आफ वेल्स यांनीं थोड्या वर्षांमागें अर्ज केला होता कीं मातुश्री वृद्ध झाल्यामुळें आमच्याकडे बहुत थोर थोर लोक आतांशा येतात व त्यांनां मेजवान्या वगैरे देण्यास व त्यांचें आदरातिथ्य करण्यास आह्मास खर्च अधिक लागतो सबब कांहीं जास्ती नेमणूक करावी. त्या अर्जाचा पार्लमेंट सभेनें विचार करून त्यांची नेमणूक वाढवून दिली. त्याचप्रमाणें हल्लीं त्यांचे बंधू डयूक आफ कनाट यांनीं अर्ज केला आहे कीं आह्मास दीड लक्षांची आजपर्यंत नेमणूक आहे पण ती लग्न संबंधामुळें पुरत नाहीं, याजकरितां आणखी एक लक्ष रुपयांची नेमणूक जास्ती मिळावी. त्यांच्या अर्जाचा आतां विचार होणार आहे व असें ह्मणतात कीं मि. टेलर किंवा कोणी ऐरिश सभासद यांनीं हरकत आणिली नाहीं, तर त्यांचें मागणें मंजूर होईल. ही रीति पाहून आह्मांस मोठा संतोष वाटतो. व जेथें अशी राज्यरीति आहे तेथेंच त्या राज्याला उत्तम मजबुदी आहे असें आह्मी मानितों.

---

**इंदुरचे होळकर** सरकार यांनीं आपले राजधानींत कापसाचें सूत व वस्त्र करण्याची गिरणी विलायतेहून सुमार दोन लक्ष रुपये खर्चून बऱ्याच वर्षांमागें आणिली आहे तिचें काम आलीकडे चांगलें चालतें असें समजण्यांत आलें आहे. तिगस्त सालची माहिती प्रसिद्ध झाली आहे तिजवरून समजतें कीं, त्या सालीं गिरणीचे मालावर सरकारास एक लक्ष सहा हजार रुपये फायदा झाला. तिजवर कापड ९२६२८७ रत्तल भार निघालें व सूत ४९९८ रतल निघालें व त्याचा खप त्वरित होऊन लोकांच्या मागण्या शिलकीं राहिल्या असें पाहून होळकर सरकारानीं गिरणीचीं यंत्रें आणखी आणविण्याची तजवीज केली आहे हें ऐकून आह्मांस संतोष वाटतो. नेटिव संस्थानिकांमध्यें यांनींच मात्र विलायती यांत्रिक कारखाने आणून आपले राजधानींत सुरू केले आहेत याबद्दल राष्ट्रानें यांचे आभार मानिले पाहिजेत. इतर राजे लोकांस यांचें उदाहरण पाहूनही अजून तशा कामांत पडण्याची सद्बुद्धि होत नाहीं याजबद्दल आह्मांस वाईट वाटतें. देशाची स्थिति सुधारण्यास असे यांत्रिक कारखाने पुष्कळ झाले पाहिजेत. व ते आमच्या राजेलोकांकडून झाल्यास फार उत्तम. सबब परमेश्वर कृपा करून आणखी बहुत राजांचे मानसीं या गोष्टीची प्रेरणा करील तर फार चांगलें होईल.

---

**कृष्णाकुमारी काव्य**— सुमार आज दोन महिने आमचे वर्तमान पत्रांत कृष्णाकुमारी संबंधी कविता छपत आहे तिचें सौरस्य व उत्तमता वाचकांच्या लक्ष्यांत आली असेल. शाळा खात्याकडील पांचव्या पुस्तकांत भीमासिंग राजानें कृष्णाकुमारी नामक आपली कन्या विष देऊन मारविली अशी गोष्ट आहे तिजवर हें काव्य रचलेलें आहे. याचे आजचे अंकापावेतों १२९ श्लोक झाले तेव्हां आतां नुकता गोष्टीस आरंभ झाला आहे. हा वेळपर्यंत उपोद्घात झाला. त्यांत ठिकठि

र्णीं वर्णनें कशीं आलीं आहेत तीं वाचकांनीं पाहिलीं असती . प्रथमतः बागबगीच्यांचें वर्णन, नंतर वेद शास्त्रांच्या शाळांचें व तेथील अध्ययनाचें वर्णन, पुढें राजपुत्रांचे अभ्यास, नंतर उदेपुर शहराचें व तेथील व्यापाराचें वर्णन, त्या पुढें विलासी जनवर्णन इत्यादि थाट कसे उत्कृष्ट व मनोरम उतरलेले आहेत कीं, ते पाहून आमचे वाचक संतोष पावल्यावाचून रहाणार नाहींत. गेले अंकांतीलही भीमसिंग राजाचा राज्यारंभ व त्याचें ज्ञान यावरील काव्याचा मासला वाचकांचे पहाण्यांत आला असेलच, तसेंच आजच्या अंकांतील कृष्णाकुमारीचें स्वरूपवर्णनही अप्रतिम पहाण्यांत येईल. व कृष्णाकुमारीच्या चरित्रास आरंभ आतां झाला तेव्हां येथून पुढें अधिकाधिक रसाळ वर्णनें येतील व तीं वाचून पहाण्याची संधी आमचे वाचक जाऊं देणार नाहींत असें आह्मी इच्छितों.

ही उत्तम कविता सातारचे नामांकित विद्वान वेदशास्त्र संपन्न रा. रा. भाऊ दीक्षित जोसी चिपळूणकर यांनीं लोकरंजनार्थ रचली आहे यांस व यांच्या विद्वत्तेस न जाणणारे लोक त्या प्रांतीं क्वचित असतील. त्यांनीं ही कविता कृपा करून आमचे उपयोगार्थ बक्षिस दिली याकरितां आह्मी त्यांचे आभार मानितों. व वाचकही या सत्पुरुषाची योग्यता यांचे काव्यावरून जाणल्याशिवाय रहाणार नाहींत असें कल्पितों.

---

## सार्वजनिक रस्ते व खाचरें.

( Communicated. )

अलीकडे आपल्यास कांहीं मजकूर लिहून पाठविण्यास जीव भितो. कारण एक तर आपण सर्वांशीं गोड गहून आपलें काम बजाऊं इच्छिता व दुसरें नवीन प्रेस आक्टही पिंजऱ्यातील सिंव्हाप्रमाणें वर डोकें करून नजर फेकतो. तथापि जी गोष्ट रास्त व सर्व लोकांचे नफ्या तोट्याचे संबंधाची आहे ती कळविणें जरूर आहे. व कोणास न दुखवितां आपण ती रास्त रीतीनें सरकारा पुढें मांडण्यास कमी करणार नाहीं अशी आशा आहे.

पब्लिक वर्क्स खात्यांतून ज्या सडका झाल्या आहेत त्याजवरून वऱ्हाडी खाचरें जाऊं देऊं नये ह्मणून सरकारी हुकुम आहे असें समजून थोडे दिवसांपासून रस्तेवाले लोक खाचरें जाऊं देत नाहींत असें ऐकतों. ह्या संबंधानें एक पत्र नेटिवओपिनियन पत्रांत वऱ्हाडचे बातमीदारानें पाठविलें आहे. परंतु आपल्या पत्रीं आजपावेतो एक शब्दही नाहीं. तेव्हां आपण मुद्दाम स्वस्थ आहा किंवा आपल्यास माहिती नाहींसी मिळविण्याची इच्छा आहे तें कळत नाहीं. कसेंही असो. जर अशा प्रकारचा हुकुम असेलच तर त्या बाबतींत माझ्या शंका आहेत त्यांची निवृत्ती करावी ह्मणजे झालें.

१ सडकांस पैसा कोणाचा लागतो ? सरकारचे ऐन काळीचे उत्पन्नांतून किंवा लोकांवर इतर कर आहेत त्यांचे उत्पन्नांतून ? जर लोकांपासून कराचा पैसा सरकार मुद्दाम रस्त्याकरितां घेतें त्यांतून पैसा खर्च करून सडका होत असतील तर रस्त्याचा उपभोग लोकांनीं करूं नये असें ह्मणण्याचा सरकारास हक्क कसा उत्पन्न झाला?

२ खाचरांचीं चाकें बारीक असतात यामुळें सडका खराब होतात ह्मणून मनाई असेल तर कर घेतांना अमुक प्रकारच्या गाड्या जाण्याकरितां ह्या पैशानें सडका करूं असा कांहीं जाहिरनामा सरकारानें प्रसिद्ध केला होता काय? नसल्यास रस्त्याकरितां घेतलेले पैशानें रस्ते तयार करावे आणि ज्यानीं पैसे दिले त्यांस ह्मणावें कीं तुमच्या गाड्या वाईट आहेत तेणेंकरून आमची सडक वाईट होती. हा न्याय माझ्या पहाण्यांतील नाहीं.

३ सडका करून दळणवळणाचे मार्ग सुगम करावे हा जो सरकारचा हेतु त्याचा अर्थ अलीकडेस नवीन झाला आहे कीं काय? झाला असल्यास ती व्याख्या पहाण्याची माझी इच्छा आहे. विवक्षित गाड्या मात्र सडकेवरून जाव्या असा नियम केल्यानें पक्षपात होतो असें माझें मत आहे.

४ सुखसोयींचे राज्य कोणतें? लोकांस हरतऱ्हेची सोय व सर्व प्रसंगीं सुख ज्या राज्यांत मिळतें तें राज्य सुखसोयींचें असें साधारणतः मी समजतों. ह्याची जुळणी हल्लीच्या हुकुमाशीं कशी करता तें पहाण्याची इच्छा आहे.

देशांतील गाड्यांचा नमुना बदलावा व चांगल्या व्हाव्या ह्मणून सरकारचा हा हुकूम आहे असें कदाचित कोणी ह्मणेल तर माझें इतकेंच ह्मणणें आहे कीं, सरकारचा हेतु वाईट नाहीं परंतु असा हेतु बाळगण्याजोगी स्थिति देशास आली नाहीं. सर्व प्रकारची सुधारणा होऊन इतकीच गोष्ट शिल्लक राहिली आहे काय ? देशांत अद्यापि विद्यावृद्धि व्हावी तशी झाली नाहीं; लोकांस बरें वाईट काय तें अद्यापि पूर्णपणें कळूं लागलें नाहीं; सुधारणेचा मुख्य पाया ह्मणजे आपले हक्क काय, दुसऱ्याचे हक्क काय हें जाणून त्या योगानें देशांत स्वातंत्र्य यावें, तें आलें नाहीं; इतकेंच नाहीं परंतु त्याचा कोठें मागमूसही नाहीं. देशांत पाटबंधारे होऊन पाण्याच्या सोयी झाल्या नाहींत; रयतेस जुलमी लोकांपासून होणारे ताप व्हावे, तसे कमी झाले नाहींत व सर्वांहून मोठी उणीव ही कीं, न्यायखातें असावें तसें स्वतंत्र होऊन न्यायाच्या सोयी रयतेस अद्यापि झाल्या नाहींत. सुधारणेचा खरा परिणाम देशाची संपत्ती वाढणें हा होय. व एथें जर लोक आपले निर्वाहाच्या काळजींत असतां सरकारानें गाड्याचा नमुना बदलावा असें ह्मणणें थोडेंसें अडचणीचें आहे. सबब सरकारानें आपली नजर उदार करून रयतेस सार्वजनिक रस्त्याचें सौख्य द्यावें. व मध्येंच सडकेवरील कामदारांनीं गाडीवाल्यांस हाकून दिलें ह्मणजे आडवाटेनें जाण्यांतें जें त्यांनां पराकाष्ठेचें दुःख होतें तें मनांत आणून त्यांची कीव करावी- अशी सरकारास प्रार्थना आहे.

एकंदरींत कोणतेही प्रकारें हा हुकूम हल्लींच्या रेसिडेन्ट साहेबांच्या कारकीर्दींत होण्याचा संभव नाहीं असें सर्व लोक समजतात. तेव्हां खरें काय आहे याचा तपास करून आपण लोकांचें समाधान ह्या बाबदींत जरूर करावें. व हुकूम असेलच तर माझ्या प्रश्नाचे उलगडे तरी निदान आपण किंवा दुसरे सुज्ञ गृहस्थांनीं करावे.

---

## वऱ्हाड.

**कर्नल मेन साहेबांचा मृत्यू**—आह्मास लिहिण्यास फार दुःख वाटतें कीं, आमचे एथील लोकप्रिय डिपुटी कमिशनर कर्नल मेन साहेब गेले सोमवारीं सकाळीं अकस्मात मृत्यू पावले. अलीकडे ५।६ महिने यांच्या प्रकृतीस नीट नव्हतें तरी ते बात बेतानें सरकारी काम करीतच असत. उन्हाळयांत नरनाळयाच्या किल्ल्यावर ते रहाण्यास गेले होते तेथें त्यांची प्रकृति अधिक बिघडून शेवटीं एथें आले व आल्यापासून चार दिवसांत मरण पावले. हे १४ वर्षे वऱ्हाडांत असिस्टंट कमिशनर असून नुकतेच डिपुटी कमिशनर झाले होते. यांस कामाची माहिती चांगली असून काम करण्याची शैली फार चांगली होती. शिवाय यांचा स्वभाव मोठा मनमिळाऊ असून नेटिवाशीं देखील हे अत्यंत ममतेनें वागत होते. त्यामुळें यांचें मरण फार लोकांस दुःखकारक होईल. यांच्या पत्नी एथें आहेत. व एक चिरंजीव विलायतेस असून बंधू नागपुरास चीफइंजिनियर आहेत. यांच्या प्रेत समारंभाल सुमार १००० लोक होते. व पलटणी चे १०० लोकहोते. यांचे मरणादिवशीं सर्व सरकारी आफिसे व शाळा बंद ठेविल्या होत्या.

---

जुडिशियल कमिशनर साहेबांची स्वारी वाशिमास गेली.

---

मि० हार्डेन साहेबांच राजिनाम्याचे संबंधानें क्या० ग्रांट सा. आफि० फर्स्टक्लास असि० कमिशनर व क्या० थामसन सा. आफि० से० क्लास कमिशनर झाले.

---

वऱ्हाडांत सार्वजनिक मोठमोठाल्या सडकांवरून देशी खाचरें ज्यांच्या धावा लहान असतात तीं अलीशान रेसिडेंट साहिब बहादूर यांच्या हुकुमावरून जाऊं देत नाहींत व त्यामुळें लोकांची मोठी गैरसोय झाली आहे अशाबद्दल आजच्या पत्रांत बाहेरून आलेला मजकूर निबंधांच्या खालीं घेतलेला आहे तो वाचकांच्या पहाण्यांत आला असेल. आह्मी त्या विषयीं शोध करितां इतकेंच समजलें आहे कीं, प्रथमतः रेसिडेंट साहेबाचा सुमार च्यार महिन्यांपूर्वीं अशा अर्थाचा हुकूम होता कीं, वाईट प्रकारच्या गाड्यांनीं सडका खराब होतात सबब लोकांस तशा गाड्या मोडून दुसरे प्रकारच्या करण्या विषयीं समज द्यावी व तशा गाड्या सडकांवरून जाऊं देणार नाहींत असेंही लोकांस कळवावें. त्याच्या आधारें इंजिनियर खात्याकडून सडकांवरील रक्षक लोकांस हुकूम गेले व त्यांनीं लागल्याच खाचरी गाड्या सडकांवरून जाण्यांची मनई केली. पुढें या गोष्टीचा बोभाटा झाल्यावरून हल्लीं असा ठराव झाला आहे कीं, येत्या अक्टोबर महिन्या नंतर अशा प्रकारच्या दोन इंचांहून कमी धावेच्या गाड्या सार्वजनिक सडकावरून जाऊं देणार नाहींत. यासाठीं ज्यांस आपआपल्या गाड्या सुधाराव्या असें वाटेल त्यानीं सदहू मुदतींत सुधाराव्या. नाहीं पेक्षां त्यांनां दुसऱ्या- पायरस्त्यानें आपली खाचरें न्यावीं लागतील.

---

चिखलदऱ्याहून २३ वे तारखेचें पत्र आलें त्यांत लिहिलें आहे कीं, तिकडे अजून पाऊस झाला नाहीं व लोक वाट पाहून आहेत. पण आह्मास वाटतें कीं, आतां तिकडे चांगला पाऊस झाला असेल.

---

आमचे निजाम सरकार आतां शिकारीला बाहेर निघूं लागले आहेत. १४ वे तारखेस कित्येक सरदार लोक बरोबर घेऊन ते हरिणांच्या शिकारीस गेले होते असें कळतें.

---

अकोल्यास पर्जन्यानें या आठवड्यांत मोठी बहार केली. ऐन वक्तावर जसा पाहिजे तसा उत्तम पाऊस पडला. व तो रात्रीं पडून दिवसां पेरण्याला उघाडी देत गेला. नदीलाही दोन पूर आले त्यांत कालचा पूर फार मोठा होता. तसा गुदस्तांच्या साऱ्या बरसातींत मुळीच आला नव्हता.

---

येथील डिपुटी कमिशनरच्या रिकाम्या जागेवर वाशिमाहून क्या० बुलक साहेब येणार व क्या० फ्यारर साहेब वाशिमास जाणार असें वर्तमान आहे.

---

वाशीम जिल्ह्यांत व खामगाव, जळगाव, अकोट, मलकापुर या भागांत चांगला पाऊस झाल्याच्या खबरा आल्या आहेत.

---

टाइम्स पत्रामध्यें असें एक ऐकीव वर्तमान छापिलें आहे कीं, मि० पील साहेब काटेवाडचे पोलिटिकल एजंट जे हल्लीं तेथें नाहींत ते पुन्हा त्या प्रांतांत त्या जाग्यावर परत जाण्याचा संभव नाहीं. मध्य प्रांत मुंबई इलाख्यास जोडावयाचा आहे त्यावेळेस पील साहेब वऱ्हाडचे कमिशनर होतील व कर्नल बर्टन साहेब तिकडे कायम होतील असें ह्मणतात.

---

कारजाकडे एक तान्हेला मुशाफर हत्यावर मना केलें असतां पाणी प्याला ह्मणून एका शेतकऱ्यानें कुऱ्हाडीनें त्याला ठार मारिलें. तो गुन्हा रा. रा. विठ्ठल बळवंत पोलिस इन्स्पेक्टर यांनीं मोठ्या हुशारीनें पकडला.

---

गुदस्त सालीं रेलवेनें माल पुष्कळ जाऊं लागून स्टेशनावरून हजारो पोतीं शिलक पडूं लागलीं होतीं तेव्हां त्याचा खराबा होऊं नये ह्मणून त्यांवर आच्छादनें करावीं ह्मणून सरकारानें तजविजी योजिल्या होत्या त्याप्रमाणें नागपुरास ६००० रुपये खर्चून एक मोठा सोपा बांधिला त्यांत लाख मण धान्य साठलें जात होतें व चिफ कमिशनर साहेबांनीं म्युनिसिप्यालिटीकडून त्यावर एक छोटासा कर दरमहा दर पोत्यास पाव आणा प्रमाणें बसविला होता. हल्लीं त्याचे उत्पन्नाची बेरीज १७००० रुपये झाली आहे.

चीन देशची मनुष्य संख्या साडेच्यार कोटी आहे असें खानेसुमारीवरून समजलें आहे.

लाहोरास वेड्याच्या इस्पितळांत गुदस्त सालीं १०१ वेडे नवीन भरले. यांत मुसलमान पुष्कळ आहेत. व एकंदरींत गांज्यापासून वेडे झालेल्यांची संख्या अधिक आहे. त्या इस्पितळांत एकंदर वेडे ३७६ आहेत.

मोलवान पदार्थ डाकेंतून पार्सलानें पाठविण्यास शेकडा आठ आणे विम्याबद्दल देण्याचा ठराव होता तो आतां च्यार आण्याचा केला आहे. व पन्नास रुपयापर्यंत दोन आण्याचाही केला आहे. ही अधिक सोय झाली.

हिंदुस्थानांतील मिठासंबंधी एप्रिल महिन्याचें उत्पन्न सरकारास ४८ लक्ष रुपयाचें झालें.

पुणें सोलापुर रेलवेवर महामारीचा उपद्रव भयानक रीतीनें सुरू आहे. धोंड हा स्टेशनाचा गाव ३००० वस्तीचा आहे त्यांत ४०० लोक मरण पावले असें कळतें.

रतलम पासून फत्तेहाबाद पावेतो आगगाडी दहावे तारखेस सुरू होणार. तेथून मग निमच ४० कोस रहाते.

दोन वर्षांमागें एकानें च्यार आण्याची चोरी केली होती त्याला मद्रास हायकोर्टाच्या एका जडजानें जन्मपर्यंत काळे पाण्याची शिक्षा दिली होती. तिचा मद्रास सरकारानें विच्यार करून ती शिक्षा कमी केली व दहा वर्षांच्या कैदेची शिक्षा दिली असें कळतें. या चोरीचें स्वरूप कसें काय असेल तें समजत नाहीं.

पेशावरास रहाणारा मुसलमान बाहूलान यास काबुलांत पकडलें व तो कोणा परराष्ट्राकडून टेहळया आला होता असें ठरवून अमीरानीं त्यास गोळी घालून ठार मारविलें.

कमिसरीखात्याचा कांहीं खर्च कमी करण्याच्या विचारांकरितां हिंदुस्थान सरकारानें एक कमिटी नेमिली आहे ती आक्टोबर महिन्यांत कलकत्यास भरणार आहे.

अशी बातमी आली आहे कीं, रशियानें काबुलात आपला वकील ठेवावा असा प्रयत्न चालविला आहे पण तो अमिरास मान्य नाहीं. आतां रशिया त्याबाबदींत अधिक गडबड करीलतर त्याचें फळ असें होईल कीं, काबूलचा अमीर इंग्लिश सरकारचे हस्तगत होईल.

सुरतचे गुजराथी दोन वर्तमानपत्रकर्ते, एक वकील व दुसरे तीन गृहस्थ यांवरील फौजदारी मुकद्दमा माजिस्त्रटानीं सेशनकमिट केला.

रेलवेकडील मि. डयुई साहेब व त्यांचे हेड क्लार्क जनार्दन यांवर मुंबईस माजिस्त्रेटापुढें मुकद्दमा चालला होता तोही सेशनकमिट झाला.

जर्मनी व चीन यांमध्यें कांहीं बेबनाव झाल्याची आवई उठली आहे. पेकीनचा जर्मन प्रधान तेथून निघाला आहे असें ह्मणतात.

हिंदुस्थानांत गुप्त पोलिस ठेवण्याचा सरकारचा विच्यार झाला असून त्या कामावर मुख्य अधिकारी पंजाबांतील झेलम प्रांताचे पोलिस सुपरिंटेंडेंट मि. ख्रिस्टी यांस नेमणार व त्याकरितां त्यांस सिमला एथें बोलावून नेलें आहे असें अळतें मि. ख्रिस्टी यांच्या हाताखालीं या इलाख्यांतील नावाजलेले रा. ब. शिवराम पांडुरंग, रा. ब. गजानन विठ्ठल व खा. ब. अकबर अली यांस नेमल्यास या देशांत गुप्त मसलती व मंडळ्या यांची वस्ती अगदीं रहाणार नाहीं असें अह्मास वाटतें.

हिंदुस्थानांत एकंदर रेलवेची सडक ७,२७८ मैल इतकी उघडली आहे. या सर्व सडकांवर एकंदर १,३२,०४० नौकर आहेत ह्मणजे दर मैलास ८ पासून ९ पर्यंत नौकर आहेत.

गेल्याच्या मागील रविवारीं ह्मैसूर एथें भयंकर तुफान होऊन सुमार दोन इंच पाऊस पडला तेणेंकरून तेथील तळीं, विहिरी वगैरे बऱ्याच भरून गेल्या आहेत असें कळतें.

शिंदे सरकारचे राज्यांत महागाई आहे ह्मणून त्यांनीं धान्य आपले देशांतून बाहेर देण्याचें मना केलें आहे. इं. प्र.

नागपुराकडील जमीन बटाटे होण्यास चांगल्या प्रकारची आहे असें दिसतें तिकडील सरकारी शेतकीचे मुख्य यांनीं १९ शेर बटाटे लाविले होते. त्यास एकंदर खर्च पंचेचाळीस रुपये सहा आणे आला. उत्पन्न बेचाळीस मण बटाटे झाले. सदरील खर्च वजा जातां नफा एकशे चोवीस रुपये दहा आणे राहिला. या मानानें पाहिलें असतां नागपुराकडे बटाट्यांची लागवड केली असतां त्यामध्यें नफा राहील असें वाटतें.

मि० डब्ल्यू. ए. पोर्टर, मद्रास एजुकेशन खातें, यांस ह्मैसूरच्या महाराजाचे शिक्षक नेमल्याचें कळतें.

बी. ए. व लिटलगो या परीक्षेस स्त्रियांस घेण्याबद्दल कलकत्ता युनिवर्सिटीनें ठरविल्याचें कळतें. या दोन्ही परीक्षेंत पुरुषांस प्राचीन भाषांपैकीं कोणची तरी एक घ्यावी लागते. स्त्रियांनीं अर्वाचीन भाषांपैकीं कोणची तरी घ्यावी असें ठरविलें आहे.

ब्यांकीपुरापासून गयेपर्यंत रेलवे बांधण्याचा ठराव झाल्याचें मागें कळविलें. ही लैन गयेपासून नागपुरापर्यंत बांधणार अशी बोलवा आहे. ही रेलवे लैन झाल्यास मुंबई । कलकत्ता जवळ होणार आहे.

कैद्याचा धाडसपणा— कालिकत (मद्रास) एथील माजिस्त्रटाचे कोर्टांत एका मुसलमानावरील चोरीच्या खटल्याची चवकशी होत होती. चवकशी झाल्यावर माजिस्त्रट साहेब शिक्षेचा हुकूम फर्मावणार तों इतक्यांत अपराध्यानें साहेब मजकुराचे उरावर धोंडा मारला. पोलिस इतके सावध होते कीं, आरोप्यास ते कोर्टांत आणित असतां त्यानें फेंकलेला धोंडा आपल्या वस्त्रांत लपवला तें त्यांच्या नजरेस आले नाहीं.

आफ्रिका खंडाच्या दक्षिणेस इंग्रज व काफ्री लोक यांत युद्ध चाललें आहे. अजून जय कोणाचाच झाला नाहीं.

श्री० बाळा साहेब कुरुंदवाडकर हे विद्याभ्यासाकरितां पुण्यास राहिले असून डेक्कन कालेजांत जात असतात. बी. ए. ची परीक्षा होईपर्यंत त्यांचा तेथें रहाण्याचा विचार आहे.

---

## धर्मबोध.

सर्व मनुष्यें मिळून देवाचे घरीं एकच कुटुंब होत. तीं शेतकी, धंदा कला, ज्ञानसंपादन, असे अनेक व्यापार करितात व फलप्राप्तीचा विनियम करितात, त्याच्या योगें सर्वांस सुख होतें. हा विनियम करणें त्यांचा धर्म असून त्या शिवाय व्यवहार चालणेंच नाहीं. त्याप्रमाणेंच ज्या कोणास धर्म प्रेरणा होऊन तो जी शांति आणि आनंद यांचा उपभोग घेतो त्या एकट्यानेंच ती अनुभविण्याचा अधिकार नाहीं. त्यांचा वाटा त्यानें बांधवांस दिला पाहिजे. धनिकांच्या प्रमाणेंच जन याचे दायाद लेखतात. यास्तव धर्मोपदेश करणें त्याला भाग. इतर धार्मिक व्हावे ह्मणून त्यानें इच्छिल्यानें ते होणार नाहींत. पर्वतांत गार पाणी असतें पण झिरा निघाल्याशिवाय तापव्याकुलांचें तृषाशमन होत नसतें.

धर्मबोध ह्मणजे धर्माचें फक्त कथन करणे नव्हे. तो दुसऱ्यांचे मनांत आस्थेनें बिंबवून दिला पाहिजे. यास्तव हा बोध सुरस व मनोवेधक असून पौराणिक धर्म पुस्तकांतून वेंचे घ्यावे व कांहीं सुबोध गोष्टींचाही समावेश करावा. तो स्वभाषेंत असावा व ऊहापोहाचा प्रकार कमी होईल तितका बरा. देव एक आहे व तोच पूज्य हा धर्माचा पाया खराच व प्रथमतः तिकडे लक्ष देणें अवश्य तथापि याच विषयाचें उपपादन ह्मणजे सर्व धर्मकथन होत नाहीं. नानाविध नीतिपर आणि व्यवहारिक विषय धर्मोपदेशकांनीं घेतले पाहिजेत.

सर्व व्यवहारिक गोष्टींत जसी शिक्षा आणि उपदेश पाहिजे तसाच धर्मांतही पाहिजे. आणि ज्याप्रमाणे आपणास इतर विषयांमध्यें गुरू सांगेल तें श्रद्धापूर्वक ऐकणें अवश्य त्याप्रमाणेंच धर्मगुरू सांगेल तें ऐकणें अवश्य आहे. ह्या बोधास साधन धर्मकथनच आहे असें नाहीं. तो सत्समागमानें, धर्म ग्रंथावलोकनानें व सृष्टीची अलौकिक शोभा, अनिर्वाच्य शांति व भव्य विस्तार, आणि अध्यात्मयोग ह्याविषयीं सुस्थिर मनानें चिंतन, ह्यांच्या योगानेंही होतो. हा उपदेश करण्याचे निरनिराळ्या लोकांत निरनिराळे प्रकार आहेत. पण ते सर्व बहुधा विच्यारी व अनुभविक पुरुषांनीं स्थापित असल्यामुळें सुकल्पित आहेत. आह्मामध्यें कथा कीर्तन, पुराणश्रवण हे धर्म कथनाचे अनुत्तम प्रकार आहेत. कोणत्याही प्रकारें झाला तरी आपणास ग्राहक शक्ति आहेच आहे. ह्मणून आपण त्याचा सद्भावानें स्वीकार करावा. इंद्रिय विषय जाळें पसरून बसलेच आहेत, नानाविध प्रलोभक वस्तु झापा टाकण्याम टपत आहेत अशा अवस्थेंत धर्मबोधाची संधी दुर्मीळ. सत्समागम वारंवार प्राप्त होत नाहीं, आणि धर्मोपदेशक विरळा उत्पन्न होतात. धर्मसंस्थापक आणि हे उपदेशक प्रसादी पुरुष व ते आह्मा पतितांवर जगन्माउलीचा अप्रतिम प्रसाद होय. हे शुद्ध, शांत, व परोपकारी व क्षमाशील असतात आणि त्यांचा उपदेश निष्काम व गंभीर असतो. मिथ्या वाक्पांडित्यावडंबर नव्हे तर आचरण प्रबल हें नित्य लक्षांत वहातात. ते संसार तुच्छ मानित नाहींत. उलटें त्यांच्यानें होईल तितकें प्रापंचिक सुख आणि सुधारणा वाढविण्यासाठीं झटतात. पण सदा निरिच्छ राहून मुशाफिराप्रमाणें आचरतात. ह्यांचेंच नांव उपदेश व हेच उपदेशक. प्रत्येक वस्तूमध्यें स्थिरांश असता—तिला टिकाव देणारा सार असतो. तद्वत् संसारदुःखभारानें श्रांत व म्लान झालेल्यांस धर्मबोध विश्राम, उत्साह आणि आधार असतो.

प्रसंगानुरूप कोठें तरी व्याख्यानें दिलीं किंवा कर्मधर्मसंयोगानें दोन अक्षरें कानीं पडलीं ह्मणजे पुरें झालें असें नाहीं प्रत्येक कुटुंबामध्यें नित्यशः धर्मोपदेश चालला पाहिजे. जसा कित्ता तसें वळण. ज्या घरीं सद्बोध नाहीं तेथील मुलें परस्परांशीं वाघिणीच्या पोरांसारिखीं वर्ततात व तीं सर्व प्रकारें दुष्ट व नीतिभ्रष्ट निपजतात. कीर्तन पुराण सोडून तीं तमाशास जातात, भजनाबद्दल कलह व अपशब्दांचा एकच कोलाहल करून देतात.

धर्मबोधाचे पोटीं सर्व सद्बोध येतो. मनुष्याचा व देवाचा संबंध वाढत जातो मनुष्यांची एकमेकांवरील प्रीति दृढ होती. सर्व अहंता गळून जाते व आपण ईश्वराचे व जनाचे सेवक आहों असें भक्तांस वाटू लागतें, आणि ही सेवा ते उल्हासानें करितात. हे सर्व संबंध दृढ करून राखण्यासाठीं ते अधिकाधिक कथापुराणही श्रवण करितात. गांधर्व गायनापेक्षांही हा उपदेश त्यांस सुस्वर, एकेक शब्दाचें सुधेप्रमाणें कर्णद्वयानें प्राशन करितात. रससारज्ञा जिव्हा जसी भिन्नभिन्न रसांचें आस्वादन करिते तसाच त्यांचा आत्मा कर्णद्वारा विविध धर्म विषयांचें बोधामृत परिसेवितो. कोणीही धर्म सांगो तिकडे ते लोहचुंबकानें आकर्षिल्याप्रमाणें वळतात. बिलकूल उपहास न करितां विद्यार्थ्यांसारिखे नम्र होऊन ऐकून घेतात व जें त्यांच्या बुद्धीस ग्राह्य वाटेल ते आभारपूर्वक गांठीं घालितात.

वशिष्ठ, वेदव्यास, वाल्मीक इत्यादि महर्षिप्रभवापासून ग्रंथरूपी विविध महानद वाहिले, व ऋग्, यजु इत्यादि श्रुति, पाराशरादि स्मृति, उपनिषदादि अध्यात्मज्ञान, मिमांसादि षड्दर्शनीं जें तत्वशोधन महाभारत भागवत इत्यादि पुराण, व ह्या सकलांचे संवादनार्थ श्रीमद्भगवद्गीता प्रबंध हीं सर्व मिळून एक अगाध सागर बनून गेला आहे. त्यांत बोधरूप अनंत अतुल रत्नें तळीं आहेत. तीं आपापल्या बुद्धीप्रभावाप्रमाणें काढण्यास सर्वांनीं जागृत असावें, संसार चक्राच्या परिभ्रमणानें संतप्त गात्रें धर्मबोधाचें वारीच सेवन करून आत्म्यास विश्राम देतात. सु. प.

---

हें पत्र अकोल्यास एथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत खंडेराव बाळाजी फडके यानीं छापून प्रसिद्ध केलें.